संपादक
अभय कांता*
तुकाराम जाधव
प्रज्ञा दया पवार
विजय कुंजीर

कार्यकारी संपादक
देवेंद्र इंगळे । विवेक घोटाळे

संपादक मंडळ
सुरेंद्र जोंधळे । वंदना सोनाळकर । सय्यद रशिद जिलानी
विद्युत भागवत । अनिल जायभाये । विवेक चौधरी । अंजली मुळे

व्यवस्थापकीय संपादक
मल्हार पाटील

संपर्क पत्ता :
द्वारा 'द युनिक ॲकॅडमी',
चौथा मजला, गुरूकृपा कॉम्प्लेक्स,
११७९/४, शिवाजीनगर,
ज्ञानेश्वर पादुका चौक, पुणे ४११००५.
वितरण विभाग : ८००७१४५४२४
ईमेल : pwatsaru@yahoo.com
वेबसाईट : www.pvatsaru.com

मुंबई–ठाणे कार्यालय :
द्वारा द युनिक ॲकॅडमी, कार्नेशन, तलाव पाळी, हॉटेल आमंत्रणशेजारी, ठाणे (प.) दूरध्वनी : ०२२–६५२८५२३५

● वर्गणीचे दर : वार्षिक : ४५० रु., त्रैवार्षिक : १२०० रु., दशवार्षिकः ३५०० रु. वरील पत्त्यावर मनिऑर्डर, चेक किंवा डिमांड ड्राफ्टने वर्गणी पाठवावी. 'परिवर्तनाचा वाटसरू' या नावाने चेक/डिमांड ड्राफ्ट असावा.

हे पाक्षिक मालक, मुद्रक व प्रकाशक अभय गुलाबचंद कांता यांनी नर्मदा ऑफसेट, २१३, नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून २६/४, आनंदपार्क, स.नं.१३/४/५, विठ्ठलनगर, आनंदनगर, पुणे ४११०५१ येथे प्रसिद्ध केले.

मुखपृष्ठ मांडणी
मेहबूब शेख

अक्षरजुळणी
रवींद्र जगताप

मुद्रितशोधन
नरेंद्र आढाव

परिवर्तनाचा वाटसरू

वर्ष १६ वे / अंक सातवा
१६ ते ३१ ऑगस्ट २०१६

ISSN: 2250-3145

*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.

अ नु क्र म

द्वारा EPW

'डोनाल्ड ट्रम्प' यांची जिवाची मुंबई
शेखर कृष्णन ५

समान नागरी कायदा : एक निरर्थक पाठपुरावा
आलोक प्रसन्न कुमार १७

विशेष लेख

समान नागरी कायद्याची समस्या आणि राजकारण
फकरूद्दीन बेन्नूर २१

राष्ट्रवाद आणि राष्ट्रवादी
माधव दातार ३१

मनुचा मासा

शिक्षणाचे प्र.जा.तंत्र
जयदेव डोळे ४०

झरोका

संकरातून संस्कृतिसंवर्धन
नविना नजात हैदर ४६

आदरांजली

वैश्विक जननिष्ठ जाणिवेची लेखिका : महाश्वेतादेवी
किसन पाटील ५१

संवेदनेकडून संज्ञेकडे : सय्यद हैदर रझा
सुधाकर यादव ५४

कविता

प्रज्ञा दया पवार ५६

पुस्तक परिचय

बहादूर थापा आणि इतर कविता
किशोर सानप ५७

अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

द्वारा EPW

‘डोनाल्ड ट्रम्प’ यांची जिवाची मुंबई

शेखर कृष्णन

‘फोर्ब्स इंडिया’ या मासिकाच्या सप्टेंबर २०१४ च्या अंकात प्रसिद्ध झालेल्या मुलाखतीत डोनाल्ड ट्रम्प यांनी खास त्यांनाच साजेल असं असभ्य विधान केलं होतं : तुमच्याकडचं स्थावर मालमत्तेचं क्षेत्र अविश्वसनीयरीत्या स्वस्त आहे... मुंबई हे महान शहर आहे आणि तरीही तिच्या तुलनेतील इतर शहरांसारखी या शहराची किंमत लावलेली दिसत नाही. उलट दुय्यम महत्त्वाच्या शहरांपेक्षाही मुंबईची किंमत कमी ठेवलेली आहे. याचा अर्थ, गुंतवणूकदारांना इथं प्रगतीसाठी प्रचंड वाव आहे. (श्रीवास्तव २०१४.) अमेरिकी राष्ट्राध्यक्षपदासाठीच्या मोहिमेमध्ये ज्या स्तराची त्यांनी शेरेबाजी केली, तेवढा मुंबईविषयीचा त्यांचा शेरा वादग्रस्त नव्हता. पण ट्रम्प यांची ही अतिशयोक्ती भारतात मोठी बातमी बनली. वास्तविक भारतामध्ये मुंबईतील घरबांधणी बाजारपेठ देशात सर्वांत महागडी आहे. भारताच्या राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचं उदारीकरण १९९० च्या दशकामध्ये झालं, तेव्हा मुंबईतील महागड्या स्थावर मालमत्ता क्षेत्राविषयीच्या बातम्या नियमितपणे वर्तमानपत्रांच्या पहिल्या पानांवर प्रसिद्ध होत असत. अनेकदा मुंबईची तुलना भारतातील दिल्ली, चेन्नई किंवा बंगलोर अशा समकक्ष शहरांऐवजी अधिक संपन्न लंडन किंवा न्यूयॉर्क अशा जागतिक शहरांशी होते.

अमेरिकी डॉलर व भारतीय रुपया यांच्यातील विनिमय दर (एक अमेरिकी डॉलर = ६०-६२ रुपये) पाहिला, तर परकीय गुंतवणूकदाराच्या दृष्टीनं ट्रम्प यांनी केलेल्या मूल्यांकनासंबंधीच्या विधानांमध्ये काहीएक अर्थ सापडू शकतो. २०१४ साली मॅनहॅटनमध्ये स्थावर मालमत्तेचा दर प्रति चौरस फूट १२५०-१५०० डॉलरच्या दरम्यान होता आणि मुंबईत त्याच काळात मुख्य ठिकाणांच्या इथला दर रु. ४०,०००-५०,००० (किंवा ६५०-८०० डॉलर) इतका होता. या थेट तुलनेमध्ये अर्थातच

ईमेल : pwatsaru@yahoo.com

पायाभूत सुविधांमधील मोजता न येणारे भेद किंवा दोन्ही शहरांसंबंधीचे इतर मुद्दे लक्षात घेतलेले नाहीत. शिवाय तुलनात्मक शहरी उत्पन्न पातळी व अमेरिका आणि भारत यांच्यातील चलनाच्या संदर्भात प्रति एकक क्रयशक्ती समानता (पर्चेजिंग पॉवर पॅरिटी-पीपीपी) किती आहे, हेही या तुलनेत विचारात घेतलेलं नाही. क्रयशक्ती समानतेचे समीकरण जुळवून त्यानुसार गणित केल्यास मुंबईतील प्रति चौरस फुटाचा दर १८००-२५०० अमेरिकी डॉलरच्या घरात जातो. म्हणजे सर्वसाधारण नागरिकांसाठी न्यूयॉर्कच्या तुलनेत मुंबई हे शहर ५० टक्के अधिक महागडं ठरतं, असा अंदाज मध्यंतरी एका पत्रकारानं वर्तवला होता (कौल २०१४).

अर्थशास्त्रज्ञ आणि उद्योगक्षेत्राचं वार्तांकन करणारे पत्रकार यांची गणितं तूर्तास बाजूला ठेवली, तरी भारतातील सर्वांत महागड्या शहराला ट्रम्प यांनी 'अविश्वसनीयरीत्या स्वस्त' म्हटल्यासंदर्भात अधिक व्यापक प्रश्न उभा राहतो. हा प्रश्न शहरी स्थावर मालमत्तेच्या राजकीय अर्थव्यवस्थेचा आहे. किंबहुना २०१४ सालच्या अखेरीला ट्रम्प यांनी केलेल्या भारत दौऱ्यामागचं कारणच या मुद्द्याशी जोडलेलं होतं. शहरी स्थावर मालमत्तेचे घटक काय असतात? जमिनीचा ताबा घेणं, बांधकाम व इतर सामग्री व व्यवहारांवरचा खर्च, आणि नवीन बांधकामाची बाजारपेठेतली त्या जागेची प्रति चौरस फूट किंमत यांच्यातील भेदसमीकरणावरून मग ट्रम्प यांच्यासारख्या स्थावर मालमत्ता व्यावसायिकांना किती नफा मिळेल हे निश्चित होते. पण न्यूयॉर्क आणि मुंबईसारख्या बेटांवर उभ्या राहिलेल्या शहरांमध्ये जमीन किंवा भूस्तरीय जागा कमी अल्प प्रमाणात असते किंवा असलेली जागा आधीच वापरात आलेली असते, त्यामुळे सगळा नवा विकास आधी उभ्या असलेल्या बांधकामाला ध्वस्त करूनच शक्य असतो. मुंबईत यालाच 'पुनर्विकास' असं संबोधलं जातं.

गुंतवणूकविषयक बँकिंग, वित्त भांडवलशाही आणि विशेषतः मुंबईच्या बाबतीत शहरी स्थापत्य मालमत्ता, या संदर्भातील लोकप्रिय धारणेनुसार बाजारपेठीय तर्क-अंदाज लढवणं हे जुगारासारखं किंवा हव्यासी नफेखोरीसारखं असल्याचं मानलं जातं. पण न्यूयॉर्क व मुंबईसारख्या शहरांमधील राजकीय अर्थव्यवस्था व सार्वजनिक संस्कृतीवर वर्चस्व गाजवणाऱ्या स्थावर मालमत्ता विकासकांच्या व्यावसायिक आराखड्यांची गुणवैशिष्ट्यं समजून घेण्यासाठी हे नैतिक संभाषित अपुरं पडतं. जमीन विकत घेणं आणि बांधकामासाठी परवानग्या मिळवणं हे काम गलिच्छ, कष्टप्रद आणि अपरिहार्यपणे 'भ्रष्ट' असतं. मोठमोठे बिल्डर आणि गुंतवणूकदार यांचा चिवटपणा व जोखीम उचलायची क्षमता जोखणारी ही प्रक्रिया असते आणि त्याचसोबत कायद्याच्या सीमाही या प्रक्रियेत जोखल्या जातात. जमीन संपादन व बांधकामाच्या या काळोख्या अवकाशातल्या अस्थिर परिस्थितीतून नफ्याची शक्यता व संभाव्य भविष्य यांचा शोध घेऊ शकणाऱ्या तर्कबहाद्दरांसाठीच हे क्षेत्र आहे (बीअर, बिर्ला, पुरी २०१५; अप्पा दुराई २०१२). हे बलवान 'जुगारी'- उदाहरणार्थ डोनाल्ड ट्रम्प व हरेश मेहता- मुख्यत्त्वे अर्थग्रस्त, तणावग्रस्त किंवा वादग्रस्त मालमत्तांमध्ये विशेषज्ज्ञ बनलेले असतात. आधीच्या रहिवाशांना निर्वासित करणं किंवा उखडून काढणं, दीर्घ काळ चालणारे न्यायालयीन लढे सुरू करणं, कायदेशीर चौकटी आणि शहर आराखडे यांच्यात बदल होण्याची वाट पाहत राहणं, त्याचसोबत स्थानिक प्रशासनातील अधिकाऱ्यांची अपरिहार्य बदली होण्याची वाट पाहणं- या सर्व गोष्टींसाठी आवश्यक स्रोत व चिकाटी या मंडळींकडे असते. स्थावर मालमत्तेसंदर्भातील अंदाज वर्तवणं हे एकाच वेळी कायदेशीर आणि सामाजिक क्षेत्रांना स्पर्श करणारं काम आहे. यामध्ये उद्योजक अगणित शक्यता आणि अनपेक्षित भविष्याकडे लक्ष ठेवून कार्यरत असतात. बिल्डर, प्रायोजक, गुंतवणूकदार व राजकारणी- अशा विविध व्यक्ती यात गुंतलेल्या असतात आणि त्यांना विशिष्ट प्रकारची जादुई ताकद जवळ बाळगावीच लागते. सध्या काय कायदेशीर आहे आणि काय शक्य आहे, भविष्याचं कोणतं स्वप्न पाहणं शक्य आहे, या तपशिलांमधील मर्यादांशी ते 'खेळत' असतात. त्यातून मग प्रसारमाध्यमं आणि लोककल्पनेला प्रतिकात्मक आवाहन करण्याची योजना आखली जाते. या सर्व अस्थिरतेचं रूपांतर करून पुढं प्रतिमानिर्मिती करणं, नफा कमावणं आणि कायदा मोडणं (व बनवणं) इत्यादी गोष्टी यशस्वी तर्कव्यवहारात येतात.

व्यवहाराची कला

भारतातील सर्वांत महागड्या शहरामध्ये स्थावर मालमत्ता स्वस्त असल्याचं विधान ट्रम्प यांनी केलं, तेव्हा ते 'लोढा ग्रुप' या स्थानिक बांधकाम समूहासोबत नवीन भागीदारी रचण्याच्या प्रक्रियेत होते. त्यापूर्वी २०११ साली त्यांनी दुसऱ्या एका प्रायोजकासोबत मुंबईत 'ट्रम्प टॉवर' बांधण्यासाठी करार केला होता. या पहिल्या कराराच्या वाटाघाटी त्यांचा मुलगा डोनाल्ड ट्रम्प (धाकटे) यांनी केल्या होत्या. पण हा करार झाल्यानंतर लगेचच ट्रम्प यांची तेव्हाची भागीदार कंपनी 'रोहन लाइफस्केप्स' परवानग्या मिळवण्याच्या प्रक्रियेमध्ये संकटात सापडली. दक्षिण मुंबईतील चौपाटीच्या लखलखीत परिसरात ४५-६० मजली इमारत बांधण्याचा हा प्रकल्प होता. ही गगनचुंबी इमारत ज्या जागी उभी राहणार होती, तिथं आधी रुग्णालय होतं, आणि आत्ता तिथं एक घरांची वसाहत आहे. ही वसाहत पूर्वी एका ना-नफा तत्त्वावर काम करणाऱ्या सामुदायिक ट्रस्टची होती. ती २००७ साली या बिल्डरला विकण्यात आली. 'रोहन लाइफस्केप्स'चे अध्यक्ष होते ट्रम्प यांचे तेव्हाचे शिकाऊ उमेदवार हरेश मेहता. ते आता ट्रम्प यांच्या सेवेत नाहीत. 'ट्रम्प टॉवर मुंबई'साठी दोन प्लॉट एकत्र करून एक मोठा प्लॉट तयार करण्याचे मेहतांचे प्रयत्न सुरू होते. त्यांनी जागा विकत घेऊन वसाहतीतल्या सर्व इमारती जवळपास रिकाम्या करवून घेतल्या होत्या आणि 'ब्रांडिंग'विषयी ट्रम्प यांच्याशी सहमती करारही केला होता. परंतु २०१२ ते २०१५ या काळात राज्यशासन व महानगरपालिकेनंही या 'पुनर्विकासा'साठी परवानगी दिली नाही (इंडिया टुडे २०१२).

मुंबईतील स्थावर मालमत्ता 'अविश्वसनीयरीत्या स्वस्त'- नवीन व्यावसायिक संधींसाठी व आकस्मिक मूल्यासाठी उत्पादक - असल्याचा दावा ट्रम्प यांनी केला असला, तरी या क्षेत्रातही प्रचंड जोखीम आणि अस्थैर्य आहे आणि त्याचा अंदाज बांधणं वा मोजमाप करणं अशक्य आहे. सिमेंट, पोलाद व बांधकाम मजूर यांच्यावरील खर्च आणि चटई क्षेत्रासारखे काही नियम व अटी यांचं तार्किक समीकरण मांडता येऊ शकतं, त्यांचा भविष्यवेधी अंदाजही घेता येऊ शकतो, आणि स्थावर मालमत्ता विकासकांच्या व्यावसायिक आराखड्यांमध्ये त्यांची मोजदाद करता येऊ शकते. पण भाडेकरू व मालकांच्या मागण्या आणि कायदे व नियमांमधील बदल अशा काही 'ज्ञात अज्ञातां'चा अंदाज बांधता येतो, पण त्यांचं व्यावहारिक गणित मांडता येत नाही. शिवाय हे 'ज्ञात ज्ञात' व 'ज्ञात अज्ञात' यांच्यात आणि शहरी राजकारण व जागतिक अर्थव्यवस्थेतील 'अज्ञात अज्ञात' यांच्यात आणखी फरक असतो. उदाहरणार्थ- २००८ सालच्या वित्तसंकटानंतर झालेलं दीर्घकालीन गुंतवणुकीचं अवमूल्यन आणि शहरी स्थावर मालमत्तेसंदर्भातील सार्वजनिक संभाषितात होत राहणारे बदल इत्यादी. (ग्राहम २०१४).

याच काळात २०१० च्या अखेरीला मुंबईमध्ये बांधकाम सुरू असलेल्या 'आदर्श सहकारी गृहनिर्माण संस्था' या गगनचुंबी इमारतीसंदर्भात मोठा घोटाळा उघडकीस आला. दक्षिण मुंबईमध्ये समुद्रकिनारी असलेला एक भूखंड युद्धात हुतात्मा झालेल्या सैनिकांच्या विधवा पत्नींसाठी व कुटुंबांसाठी कायद्यान्वये राखीव ठेवण्यात आला होता. अनेक सत्ताधारी राजकारण्यांनी, प्रशासकीय अधिकाऱ्यांनी व त्यांच्या कुटुंबीयांनी आणि कर्मचाऱ्यांनी हा भूखंड घशात घालण्यासाठी कायद्यातील अनेक पळवाटा शोधल्या, बिगरसैनिकी व्यक्तींना या प्रकल्पात सहभागी करून घेतलं, शिवाय विकास नियमावली व पर्यावरणसंबंधी नियमांचं उल्लंघन करून वाढीव जागेत बांधकाम केलं - असा हा 'आदर्श घोटाळा' होता. महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनीही स्वतःला व त्यांच्या कुटुंबीयांना या गृहप्रकल्पात सदनिका वाटून दिल्या होत्या. घोटाळा उघडकीस आल्यावर लोकांमध्ये निर्माण झालेल्या रोषामुळे अखेर त्यांनी पदाचा राजीनामा द्यावा लागला. या घोटाळ्याचा परिणाम म्हणून २०१२ मुंबईतील बांधकाम नियमावलीमध्ये सुधारणा करून ती अधिक कठोर करण्यात आली. ठरलेल्या मर्यादांचा भंग करत बांधकाम करून त्याची विक्री करण्याचं काम या क्षेत्रातील व्यावसायिकांकडून कित्येक वर्षं सुरू होतं, त्यामुळे या नियमावलीत सुधारणा करण्याची गरज होतीच.

१९९० च्या दशकामध्ये 'उदारीकरण' आणि जागतिकीकरणाच्या पहिल्या लाटेत भारतातील शहरांची वाढ झाली. जुन्या व दुरावस्थेतल्या इमारतींच्या जागी आणि तीन दशकं शहरभर पसरलेल्या झोपडपट्ट्यांच्या

जागी नवीन बांधकाम करण्याला प्रोत्साहन देण्यासाठी नव्वदच्या दशकामध्ये मुंबईतील शहरी बांधकामाविषयक धोरणचौकटीत सुधारणा करण्यात आली. याच काळात शहरी भाडेनियंत्रण कायद्यांनी जमीनमालकांना त्यांच्या नियमित व्यवस्थापन व देखरेखीच्या कामांबद्दल नाउमेद करणं सुरू केलं. निर्मिती उद्योग व नौकायन क्षेत्र १९८० च्या दशकातच उतरंडीला लागलं होतं, तरीही वापरात नसलेल्या व अविकसित जमिनींचे मोठे पट्टे मुंबईच्या बाजारपेठेपासून दूर ठेवण्याचं काम औद्योगिक क्षेत्र व भूधारणमर्यादा नियमनाद्वारे करण्यात आलं. शहराच्या एकूण लोकसंख्येपैकी जवळपास अर्धी जनता आता 'अनधिकृत' वसाहतींमध्ये राहते, त्यांना अधिकृत निवारा उपलब्ध नाही किंवा घरासाठी आवश्यक वित्तपुरवठा ते उभारू शकत नाहीत, असं विविध अभ्यासांद्वारे स्पष्ट झालेलं आहे. 'अर्धी जनता' अशा झोपडपट्ट्यांमध्ये राहते आणि स्वतःच्या मालकीचं घर घेणं तुलनेनं संपन्नावस्थेतल्या अल्पसंख्यांनाच शक्य होतं – अशा परिस्थितीत शहरातील जुनी भाडेतत्त्वावरील निवाराव्यवस्था खालावत गेली, कारण १९५० पासून भाड्यांची रक्कम गोठवण्यात आली. त्यामुळे इमारतींची दुरुस्ती करणं खाजगी जमीनमालकांना नफादायक तर नव्हतंच, पण व्यवहार्यही वाटत नव्हतं. 'मुंबई भाडे अधिनियम १९४८'मध्ये काही मामुली दुरुस्त्या झाल्या (भाड्यात ठरावीक काळानं वाढ करण्याची परवानगी १९९९ मध्ये मिळाली.) पण मुंबईतील लाखो 'जुन्या' भाडेकरूंना बाजारपेठेपासून व राहत्या जागेतून उठवलं जाण्यापासून संरक्षण मिळावं यासाठी मतदानाची व्यवस्था ठेवण्यात आली. पण काळाचा मार्ग कोणत्याही कायद्यानं रोखता येत नाही, त्यामुळे मोडकळीस आलेल्या इमारती, कोसळणाऱ्या इमारती वाढू लागल्या, विशेषतः पावसाळ्यामध्ये या घटना नेहमीच्या झाल्या.

१९९० च्या दशकाच्या मध्यामध्ये शहर नियोजक आणि राजकारणी नेते 'पुनर्विकासा'संबंधीच्या नवीन कायद्यांच्या माध्यमातून मुंबईतील घरबांधणी समस्येबद्दल कृतिशील झाले. वसाहतोत्तर शहर धोरणातील निमसमाजवादी भाडे नियंत्रण व भूधारणमर्यादा यांच्यापेक्षा नवीन कायदे अधिक व्यवसायाभिमुख होते. राज्य सरकार आणि महानगरपालिकेनं १९९१ साली मंजूर केलेल्या नवीन कायदेशीर चौकटीनुसार अधिकचा चटई क्षेत्र निर्देशांक (एफएसआय) किंवा बांधकामासाठी व नवीन ग्राहकांना खुल्या बाजारपेठेत विक्री करण्यासाठी वाढीव जागा – देऊ करण्यात आली, जेणेकरून १९६०च्यापूर्वी बांधण्यात आलेल्या इमारतींमध्ये राहणाऱ्या जुन्या भाडेकरूंचे पुनर्वसन करणे बांधकाम व्यावसायिकांना शक्य होईल. मुंबई शहरातील अशा वास्तू सुमारे २०,०००–२५,००० आहेत. स्थानिक पातळीवर त्यांना 'कर इमारती' म्हणून ओळखलं जातं, कारण इथले भाडेकरू महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाला (म्हाडा) इमारतीच्या देखरेखीच्या बदल्यात 'कर' देत असत. या इमारतींमधली भाडी बाजारपेठीय स्पर्धेवरून ठरत नसल्यामुळे खाजगी जमीनमालकांनी कित्येक वर्षांमध्ये दुरुस्ती आणि देखरेखीकडे दुर्लक्ष केलेलं होतं.

जमीन, सामग्री व महानगरपालिकेकडून मिळवायच्या परवानग्या या प्रक्रियेतील खर्चाच्या गणितापेक्षाही या 'पुनर्विकासा'मुळे मुंबईतील शहर स्थावर मालमत्तेच्या क्षेत्रात तर्काधारित व सामाजिक दृष्टिकोन आणण्यात आला, हे विशेष होतं. जुन्या भाडेकरूंचं नवीन विकास प्रकल्पामध्ये पुनर्वसन केल्यानंतरच जुन्या इमारती व झोपडपट्ट्यांच्या पुनर्विकासाला मंजुरी मिळेल, असं या नियमांद्वारे ठरवण्यात आलं. शिवाय पुनर्विकासाची प्रक्रिया सुरू करण्यासाठी बिल्डरसोबत वाटाघाटी करून सर्व रहिवाशांनी सामुदायिक संमती द्यायला हवी, या वाटाघाटींमध्ये रहिवाशांच्या अधिकारांचं संरक्षण व मागण्यांची पूर्तता व्हायला हवी. नवीन बांधकाम झालेल्या इमारतीमध्ये पुनर्वसित भाडेकरू (आणि बहुतांश प्रकरणांमध्ये माजी जमीनमालक) हे घरांचे मालक असतील. त्यामुळे भाडेनियंत्रणासंबंधीचा वयाचा निकष गैरलागू ठरेल व जुन्या, संरक्षित भाडेपद्धती संपुष्टात आणल्या जातील. अधिकृत घरबांधणी अर्थव्यवस्थेच्या कक्षेबाहेरच्या असंरक्षित 'अनधिकृत' वसाहतींसाठी १९९६ साली राज्य सरकारनं झोपडपट्टी पुनर्वसन मंडळाची स्थापना केली. या वसाहतींमधील रहिवाशांचं प्रति कुटुंब ३००–४०० चौरस फुटांच्या नवीन सदनिकेमध्ये पुनर्वसन केल्यानंतर झोपडपट्टीच्या जमिनीचा जवळपास अमर्याद व्यावसायिक वापर करण्याचा अधिकार विकासकांना देण्याचं काम या मंडळाद्वारे करण्यात आलं. या प्रक्रियेमुळे शहरी गरीब घरबांधणी बाजारपेठेचा भाग बनले. गेल्या दोन

दशकांमध्ये झोपडपट्ट्या व करदायी इमारतींचा पुनर्विकास हे घरबांधणीचं आणि स्थावर मालमत्तेमध्ये नवीन मूल्य उत्पादित करण्याचं प्राथमिक साधन ठरलं आहे.

मुंबईतील घरबांधणी क्षेत्राच्या नूतनीकरणासाठी पुनर्विकास हा बाजाराभिमुख मार्ग बनला, पण स्थावर मालमत्तेच्या खर्चामध्ये नव्या प्रकारची अस्थिरताही यातून आली. पुनर्विकास हा 'अतिशय फसवा व जोखमीचा व्यवहार आहे', 'मन वळवण्याची ताकद... आणि रहिवाशांशी थेट वाटाघाटी करण्याची क्षमता' या गोष्टींवर या व्यवहाराची मदार आहे, असं नवीन बांधकाम व्यावसायिक सांगू लागले. 'यामध्ये भांडवली गुंतवणूक कमी लागते, आणि खुल्या जमीन बांधकामापेक्षा हा व्यवहार अधिक नफादायकही असतो. बऱ्याचशा उदाहरणांमध्ये अंतर्गत परतावा दर जास्त असतो', असं एका बांधकाम व्यावसायिकानं सांगितलं. पण हे शक्य व्हायचं असेल तर 'चांगली पत आणि प्रतिष्ठा असावी लागते आणि तळापासून काम करण्याची क्षमताही लागते', पण 'सर्वांनाच यात यश येतं असं नाही.' थेट गुंतवणुकीची उणीव आणि महागडी शहरी जमीन, या पार्श्वभूमीवर 'पुनर्विकासाच्या क्षेत्रात मानवी घटक मोठ्या प्रमाणावर सहभागी असतो.' इमारती किंवा जमिनीसंबंधीच्या व्यवहारांवर स्वाक्षरी करण्याकरता भाडेकरूंना किंवा रहिवाशांना विविध सवलती द्याव्या लागतात, यामध्ये बांधकाम कालावधीमध्ये तात्पुरता निवारा देण्यापासून ते नवीन विकासप्रकल्पामध्ये वाढीव जागा आणि नकद रक्कम व इतर वित्तीय सवलती द्याव्या लागतात (गोखले २०११).

सराईत खेळाडू

ट्रम्प (धाकटे) यांनी २०११ साली हरेश मेहतांसोबत करार केल्याला काही महिने उलटल्यानंतर भविष्यातील ट्रम्प टॉवरविषयीच्या काही नकारात्मक मुद्द्यांवर स्थानिक प्रसारमाध्यमांमध्ये बातम्या प्रसिद्ध झाल्या. 'रोहन लाइफस्केप्स'नं विकत घेतलेल्या दोन इमारतींपैकी एक इमारत शतकभर आधी बांधण्यात आली होती आणि वसाहतवादी मुंबईमध्ये सुरुवातीच्या रहिवाशांपैकी एक असलेल्या पाठारे प्रभू जातीच्या सदस्यांना निवारा म्हणून तिचं बांधकाम झालं होतं. पाठारे प्रभू विश्वस्त निधीच्या मालकीच्या या इमारतीत २६ दीर्घकालीन भाडेकरू होते, याच जातीचे सदस्य असलेल्या या मंडळींना त्यांच्या पाचशे चौरस फुटाच्या जागेसंबंधी कायदेशीर संरक्षण होतं. या इमारतीचे मालक कित्येक वर्षांपूर्वी बदलले असले, तरी हे रहिवासी एकाच दरानं भाडं देत होते. 'रोहन लाइफस्केप्स'नं २०१० पर्यंत वाटाघाटी करून यातील बहुतांश जागा पुनर्विकासासाठी विकत घेतल्या आणि हरेश मेहता किंवा त्यांचे कुटुंबीय यांची नावं संचालक म्हणून असलेल्या दुसऱ्या काही नाममात्र कंपन्यांचा वापर या कामामध्ये केला. (जेमिडील्स २०१२.)

परंतु तळमजला अधिक तीन मजले असलेल्या या मोडकळीस आलेल्या इमारतीमधील एका कुटुंबानं कंपनीशी व्यवहार करायला नकार दिला होता आणि सगळ्या सवलती व त्यानंतर घर सोडायची प्रक्रिया फेटाळून लावली होती. चौपन्न वर्षीय श्रीमती स्मिता पानवलकर व त्यांचे पती आणि भाऊ अतुल राव यांनी हा विरोध केला होता, या संदर्भात प्रसिद्ध झालेल्या एका इंग्रजी बातमीचा मथळा होता : 'वन लेडी स्टँड्स इन द वे ऑफ ट्रम्प टॉवर मुंबई.' 'इमारतीतल्या इतर २५ भाडेकरूंनी बाहेर पडायचा निर्णय घेतला, ती त्यांची निवड होती. विकासकानं आम्हाला बाहेर पडण्यासाठी पैसे देऊ केले, पण आम्ही ते नाकारले. नवीन इमारतीत आम्हाला सदनिका द्यायला हवी, असं आम्ही त्याला सांगितलं', असं राव यांनी पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केलं. (सीएनएन ट्रॅव्हल २०११.) 'विकास नियंत्रण नियमावली ३३ (७)चा भंग हा विकासक करत आहे. प्रकल्पाचं काम संपेपर्यंत भाडेकरूंना तात्पुरता निवास देणं आणि काम पूर्ण झाल्यावर त्याच जमिनीवर कायमस्वरूपी घर पुरवणं विकासकाला बंधनकारक आहे. पण आजतागायत त्यानं आमच्याशी काहीही करार केलेला नाही... आम्हाला इथं राहायचं आहे, (पण) ट्रम्प टॉवरमध्ये सदनिका तर सोडाच, त्यांनी अजून आम्हाला पर्यायी निवासही देऊ केलेला नाही.' (मुंबई मिरर २०११.)

जुन्या इमारतींच्या 'पुनर्विकासा'संदर्भात विविध नियमभंगांच्या प्रकरणांमध्ये सरकारनं चौकशी सुरू केली, त्यात अधिकाऱ्यांनी असा निष्कर्ष काढला की, 'रोहन लाइफस्केप्स'नं पाठारे प्रभू इमारती पाडण्याची परवानगी विकास नियंत्रण नियम ३३ (७) अंतर्गतच मागितली

होती. (मुंबईतील पुनर्विकासासाठी याच नियमाचा आधार सर्वाधिक घेतला जातो.) म्हाडानं २०११ साली केलेल्या चौकशीत असं आढळलं की, पुनर्वसनासाठी पात्र असलेल्या २६ भाडेकरूंपैकी २२ बनावट होते; जुन्या भाडेकरूंच्या जागी मेहतांच्या हस्तकांना आणून ठेवण्यात आलं होतं. २०१४ पर्यंत, पहिल्या मजल्यावरच्या पानवलकर-राव यांचा अपवाद सोडून बाकीच्या सर्व २६ सदनिका व कुटुंबांना विकत घेण्यात आलं. 'विकास नियंत्रण नियम ३३(७)नुसार, मूळ भाडेकरूंच नव्या इमारतीत पुनर्वसन होत नाही तोपर्यंत सवलती देण्याची कोणतीही परवानगी देता येत नाही', असं म्हाडाच्या एका अधिकाऱ्यानं म्हटलं होतं. (जेमिडील्स २०१२.) 'रोहन लाइफस्केप्स'ला २००७ साली इमारत विकताना पाठारे प्रभू विश्वस्त संस्थेला देण्यात आलेली पुनर्विकासासंबंधी परवानगी म्हाडानं मागं घेतली. प्रकल्पाला व्यावसायिकदृष्ट्या व्यवहार्य बनवण्यासाठी वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक आणि खुल्या बाजारपेठेत विकण्याकरिता वाढीव जागेचं बांधकाम करण्याची मुभा-हे फायदेही साहजिकच अशक्य बनले.

प्रक्रियेतील त्रुटी व एका भाडेकरू कुटुंबाचा प्रतिकार एवढीच कारणं 'ट्रम्प टॉवर मुंबई'च्या विकासकांना अडचणीची ठरली नव्हती. 'रोहन लाइफस्केप्स' व हरेश मेहता यांनी पाठारे प्रभू विश्वस्त निधी संस्थेच्या इमारती व शेजारची जागा २००७ साली विकत घेऊन त्या जागेची मालकी मिळवली होती (ज्या जमिनीवर हे बांधकाम उभं होतं तिचं खतावणीखत हा आणखी वेगळा मुद्दा झाला), परंतु या दोन्ही जागा गतकालीन वसाहतवादी 'बॉम्बे इम्प्रुव्हमेंट ट्रस्ट'च्या (बीआयटी) एका जुन्या 'योजने'च्या कक्षेमध्ये येत होत्या. आपल्या खाजगी मालकांसाठी 'ह्यूजेस रोड' बांधून विसावं शतक उजाडेपर्यंत त्या रस्त्याला लागून जागा आखून घेणं, या कामासाठी ही जमीन बीआयटीनं विकत घेतली होती.

पुढील तपासात तर असंही आढळलं की, मंजुरीसाठी सादर करण्यात आलेल्या बांधकाम आराखड्यातही अनेक नियमभंग करण्यात आले होते. आग प्रतिबंधक नियमांचा गैरवापर करून विक्रीयोग्य जागा वाढवण्याचा प्रयत्न विकासकानं या आराखड्यात केला होता. जुन्या 'करदायी' इमारतींच्या पुनर्विकासासंबंधीच्या नियमांनुसार, पुनर्वसित भाडेकरूंच्या नव्या सदनिकेचं चटई क्षेत्र ७५३ चौरस फुटांपेक्षा अधिक ठेवता येत नाही. पण, पूर्वीच्या प्रस्तावित ट्रम्प टॉवरमध्ये प्रत्येक 'लक्झरी फ्लॅट' सोळाशे चौरस फुटांचा आणि इमारतीचा अख्खा मजला व्यापणारा होता. शिवाय, प्रत्येक मजल्यावर आणखी तीन हजार चौरस फुटांची जागा 'बचाव क्षेत्र' म्हणून ठेवण्याचं काम बिल्डरनं केलं होतं. ही जागा आगीपासून संरक्षणासाठी असल्याचं आराखड्यात दाखवण्यात आलं होतं. आगीपासून संरक्षणासाठीची ही जागा नंतर विक्रीच्या वेळी सदनिकेच्या चटई क्षेत्रामध्ये समाविष्ट करण्याची क्लृप्ती बिल्डर अनेकदा करत असतात. किंबहुना, 'रोहन लाइफस्केप्स'नं २०१२ साली ट्रम्प यांच्यासोबत भागीदारी केली तेव्हाही ४,५०० चौरस फुटांच्या सदनिकेची उघड जाहिरात केली होती.

शिकाऊ उमेदवार

हरेश मेहता हे व्यक्तिमत्त्वही डोनाल्ड ट्रम्प यांच्याइतकंच रंगीबेरंगी आहे. जुन्या मुंबई शहरात सर्जिकल सामग्रीचं लहानसं दुकान चालवणाऱ्या एका सनातनी गुजराती मध्यमवर्गीय कुटुंबात हरेश यांचा जन्म झाला. मालमत्तेविषयी अंदाज बांधणं, त्याचसोबत महालक्ष्मी रेसकोर्सवर घोड्यांवर पैसे लावणं, इत्यादी जोखमीची आकर्षणं तरुण वयातच त्यांना मोहवू लागली होती. ट्रम्प यांच्यासोबत त्यांनी केलेला करार प्रसारमाध्यमांमध्ये गाजू लागल्यानंतर २०११ साली त्यांनी 'रेसिंग वर्ल्ड इंडिया'ला एक मुलाखत दिली होती, त्यामध्ये त्यांनी त्यांच्या स्वनिर्मित नशिबाविषयी तपशीलवार कथन केलं होतं- 'पहिल्यांदा मी घोड्यांना पाहिलं तेव्हाच मी त्यांच्या प्रेमात पडलो. रुबाबदार पद्धतीनं दौडणारे घोडे पाहून मी प्रचंड रोमांचित झालो. या रुबाबदार सुंदर प्राण्यापासून मी दूर राहू शकणार नाही हे मला तत्काळ जाणवलं, कारण त्यांचा माझ्या मनावर खोलवर प्रभाव पडला होता.' ऐंशीच्या दशकाच्या सुरुवातीला भारताची बंदिस्त निमसमाजवादी अर्थव्यवस्था प्रबळ होती, तेव्हा हरेश यांना त्यांच्या कौटुंबिक व्यवसायाचा कंटाळा आला. त्यामुळे त्यांनी फोटोकॉपी यंत्रं मुंबईत आयात करायचा व्यवसाय सुरू केला, त्या काळात हे नवीन उपयोगी तंत्रज्ञान भारतभर पसरू लागलं होतं. 'अनेक वर्षं मी त्या व्यवसायात होतो, पण कालांतरानं नफा कमी होत गेला.

कोणत्याही व्यवसायात... मी नियोजित जोखीम घेण्यास तयार असतो, पण त्यात नफ्याचं प्रमाणही तितकं जास्त असायला हवं, असं मला कायम वाटत आलेलं आहे. माझ्या स्पर्धक वृत्तीचं हे एक सूत्रच आहे.'

स्थावर मालमत्तेच्या व्यवसायातील मेहतांची पहिली गुंतवणूक त्यांच्या वडिलांच्या एका मित्राच्या मार्फत झाली. रेसकोर्सवरच येणाऱ्या पारेख यांच्यासाठी मेहतांनी एक इमारत विकली. ऐंशीच्या दशकात अशा अनेक नफादायी गुंतवणुकींची मालिकाच सुरू झाली, पुढं नव्वदीमध्ये मुंबईची स्थावर मालमत्ता बाजारपेठ आणि मध्यमवर्गीय जागतिक अर्थव्यवस्थेसाठी खुले झाले, तेव्हा ही मालिका वेगानं सुरू राहिली. 'अनुभवानं मला या व्यवसायातले कंगोरे कळत गेले आणि भाड्याच्या मालमत्ता, नोंदणी कायदे व प्राथमिक बांधकाम नियमावली यांच्याशी कशा वाटाघाटी करायच्या हे मला समजत गेलं. मी मालमत्ता विकत घेत गेलो आणि वर्षं जातील तसं त्यांचं मूल्य वाढत गेलं, नफ्याचं प्रमाणही वाढत गेलं. पण तरी प्रामाणिकपणे सांगायचं तर– 'रोहन लाइफस्केप्स' आताची उंची गाठणार आहे, असं अगदी चार वर्षांपूर्वीही मला कोणी सांगितलं असतं तर मी त्याकडे शंकेच्या नजरेनंच बघितलं असतं. पण विशिष्ट बाजारपेठांवरच लक्ष केंद्रीत करणं हे माझं आधीपासूनचंच धोरण आहे, आणि उरलेला तपशील–त्या वाक्प्रचारासारखं बोलायचं तर– आता इतिहास बनला आहे.'

गुंतवणुकीचं संगोपन करण्याच्या स्वतःच्या निष्ठेबद्दल मेहतांना अभिमान वाटतो. स्पर्धा जिंकण्यात पटाईत असलेल्या आपल्या घोड्यांच्या तबेल्याविषयी बोलताना ते म्हणाले, 'मालकाच्या भूमिकेतून माझं माझ्या घोड्यांवर आणि शर्यतींवर कसोशीनं लक्ष असतं. जवळपास रोजच्या रोज या घडामोडींची माहिती ठेवणं कायमच उपयोगी पडतं. पण किती मालकांना यासाठी वेळ देता येतो? अनेक घोडे विकत घेऊन, त्यातले काही जिंकत असल्याचा आनंद घेणारे काही मालक मला माहीत आहेत; पण त्यांची पुढची खरेदी चुकीची ठरते आणि मग एखाददिवशी ते शर्यतीच्या बाहेरच पडलेले असतात... घोडा विकत घ्यायचा असेल तर तबेल्यात खूप वेळ घालवण्याचीही तयारी असावी लागते, पण बहुतांश मालक स्वतःच्या वैयक्तिक कामकाजामध्ये गुंतून पडलेले असल्यामुळे त्यांना असा वेळ देता येत नाही.' मेहतांनी तर आपल्या मालकीच्या घोड्यांची पैदास करण्यासाठीही पुढाकार घेतला. त्यांच्या मित्रानं उत्तर भारतात उभारलेल्या एका पैदास केंद्रात मेहतांनी आपले घोडे ठेवले होते, जेणेकरून इतर 'बड्या स्पर्धकां'पेक्षा उत्कृष्ट स्पर्धक त्यांच्याकडे कायम उपलब्ध असतील (मल्ल्या, २०११).

आपले घोडे शर्यतीत राहावेत, यासाठी मेहता जी चिकाटी दाखवायचे, तीच शेवटी ट्रम्प टॉवरच्या वादात (ट्रम्प यांनी प्रकल्पातूनच माघार घेतल्यानंतर) त्यांच्या मदतीला आली. पाठारे प्रभू इमारतीतील जुन्या भाडेकऱ्यांकडून सदनिका विकत घेऊन बनावट भाडेकरू तयार करण्याच्या प्रकरणात सरकारी चौकशी सुरू झाली, टिकून राहिलेल्या एकमेव भाडेकरू स्मिता पानवलकर यांनी जागा सोडण्यास किंवा 'रोहन लाइफस्केप्स'ला विकण्यास प्रतिकार केला, या घटनाक्रमामुळे २०१४ सालापर्यंत मेहतांचे या शर्यतीवर लावलेले पैसे पाण्यात गेले. हा प्रकल्प सुरू राहावा याकरिता अधिकाऱ्यांचं मन वळवण्यासाठी धाकटे ट्रम्प मुंबईत येऊन गेले, त्यांनी राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांचीही भेट घेतली, पण याचा काहीही उपयोग झाला नाही. त्यामुळे २०१३ वर्षाच्या मध्यात ट्रम्प यांनी 'रोहन लाइफस्केप्स'सोबतच्या करारातून माघार घेतली आणि 'ट्रम्प टॉवर मुंबई'साठी नवीन भागीदार व जागा यांचा शोध सुरू केला. (अशर, २०१३; बाबर, २०१३.)

त्यानंतर हरेश मेहता व त्यांच्या कंपनीनं प्रशासनाला खोटं पाडण्याचे प्रयत्न सुरू केले. हे प्लॉट ज्या जमिनीवर आहेत तिच्या अंतिम मालकीवर दावा सांगणाऱ्या सरकारविरोधात मेहतांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. प्रस्तावित बांधकाम आराखड्यावर शेरा देताना २०१३ साली बृहन्मुंबई महानगरपालिकेनं स्पष्टपणे सांगितलं होतं की, ही जमीन गतकालीन बीआयटीच्या 'गामदेवी योजना क्रमांक ४'अंतर्गत येते, परिणामी ती महानगरपालिकेची भाडेकराराची मालमत्ता ठरते, त्यामुळे त्या जागेवर कोणत्याही विकासकामांना मंजुरी देण्यापूर्वी बृह्नमुंबई महानगरपालिकेला परतावा देणं आणि 'ना हरकत प्रमाणपत्र' घेणं बंधनकारक आहे. परंतु 'रोहन लाइफस्केप्स'नं महानगरपालिकेविरोधात दाखल केलेल्या याचिकेत असा दावा करण्यात आला होता की, या

जमिनीवरची मुक्त मालकी पाठारे प्रभू विश्वस्त निधी संस्थेकडे होती. संस्थेनं ही जागा विकासकाला २००७ साली विकली आणि पुनर्विकासासाठी भाडेकरूंची सहमती मिळवण्यात आली, त्यामुळे संबंधित जागेवर नवीन बांधकाम करण्यासाठी आवश्यक परवानग्या व अधिकृत मालकी कंपनीकडे आहे.

पण २००७ ते २०१० या काळामध्ये इमारतीतील एक अपवाद वगळता सर्व भाडेकरूंनी 'रोहन लाइफस्केप्स'नं विकत घेतल्याची वस्तुस्थिती मात्र याचिकेत नोंदवलेली नव्हती. उलट, इमारत मोडकळीस आलेली असल्यामुळे ती धोकादायक बनली आहे, त्यामुळे भाडेकरू तात्पुरत्या निवासासाठी दुसऱ्या ठिकाणी गेलेले आहे, परिणामी बिल्डरनं पुनर्विकास करण्याची निकड तातडीची आहे, असं याचिकेत म्हटलं होतं. 'संबंधित मालमत्ता.. (बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या) मालमत्ता विभागाची नाही, तर पाठारे प्रभू विश्वस्त निधीच्या अखत्यारीतील मोकळी जमीन आहे, आणि याचिकाकर्त्यांनी तिचे विकास अधिकार घेतलेले आहेत. त्यामुळे ही मालमत्ता 'गामदेवी योजना क्रमांक चार'मध्ये येत असल्याचा दावा करून प्रतिवादी पक्षानं याचिकाकर्त्यांकडून 'ना हरकत प्रमाणपत्रा'ची मागणी करणं ही चूक/त्रूट आहे, हे वरील तपशिलावरून स्पष्ट होतं.' (मुंबई उच्च न्यायालय, २०१४). वसाहतवादी जमीन रेकॉर्डची बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारित झालेली दुरवस्था, शिवाय बांधकामासाठी 'ना हरकत प्रमाणपत्र' देताना प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून दाखवली जाणारी नरमाई, या पार्श्वभूमीवर बिल्डरनं उभा केलेला कायदेशीर युक्तिवाद यशस्वी होण्याची शक्यता होती. 'रोहन लाइफस्केप्स'नी दावा केल्यानुसार ही पाठारे प्रभू विश्वस्त निधी संस्थेची खाजगी मुक्त मालमत्ता नसून, सरकारनं विकत घेऊन भाडेकरारावर दिलेली ही जमीन आहे, असं महानगरपालिकेनं सिद्ध केलं, तरच याचिकाकर्त्यांचा दावा फोल ठरवणं शक्य होईल.

जागेसंबंधीची जटीलता

भारतीय कायदेशीर व्यवस्थेमध्ये जमिनीचा मालकी हक्क निश्चित करण्याची प्रक्रिया अनेक कायदेशीर गुंतागुंतींनी भरलेली असते, कारण कोणत्याही सरकार-निर्देशित नोंदणीद्वारे प्रमाणित नोंदणी सिद्ध करता येत नाही, त्यामुळे न्यायालयात आव्हान मिळत नाही तोपर्यंत ती स्वीकारार्ह राहते. न्यायालयात गेल्यावर संबंधित पक्ष कागदोपत्री पुराव्यांद्वारे दावे करून मालकीचा वाद निकाली लावू पाहतात. (आपल्या भावी गगनचुंबी इमारतीच्या जागेमध्ये मिसळू पाहिलेली) शेजारची जागा मात्र बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून भाडेकरारावर घेण्यात आलेली मालमत्ता असल्याचं 'रोहन लाइफस्केप्स'नं मान्य केलं. पण विश्वस्त संस्थेची इमारत गतकालीन बीआयटीनं पाठारे प्रभू समुदायाला मुक्त करारावर दिली होती, असा दावा त्यांनी केला. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला वसाहतवादी शहर नियोजकांनी गामदेवी वसाहत व ह्युजेस रोड बांधल्यानंतर पाठारे प्रभू जातीच्या सदस्यांना घर पुरवण्याच्या दानकार्याकरिता संबंधित विश्वस्त संस्थेला बीआयटीनं ही जमीन देऊ केली, असं या दाव्यात म्हटलं होतं.

उच्च न्यायालयातील आपल्या याचिकेसोबत 'रोहन लाइफस्केप्स'नं १९०९ सालचा विश्वस्त निधी हक्क करार व पाठारे प्रभू विश्वस्त संस्थेचे नोंदणीकृत मालमत्ता कार्ड जोडलं. बीआयटीनं शतकभरापूर्वी पाठारे प्रभू संस्थेला ही जमीन मुक्त करारावर दिली, असं या कागदपत्रांमध्ये नोंदवलेलं होतं. यासोबतच मालकीहक्क सिद्ध होण्यासाठी वकिलांची पुस्ती जोडणारी कागदपत्रंही कंपनीनं जोडली होती. पण 'हस्तांतरण' म्हणून ओळखला जाणारा दस्तावेज त्यांच्याकडे नव्हता. महानगरपालिकेच्या संग्रहातून हे महत्त्वाचे कागदपत्र शोधण्याची विनंती कंपनीनं माहितीच्या अधिकाराखाली बृहन्मुंबई महानगरपालिकेला केली. 'तत्कालीन बीआयटी संस्थेच्या विश्वस्तांनी १९११ साली पार पाडलेल्या हस्तांतरणाची कागदपत्रं सखोल शोध घेऊनही दुर्दैवानं सदर संस्थेला सापडू शकली नाहीत, असं याचिकाकर्ता नमूद करू इच्छितो. परंतु सदर मालमत्तेचे मालक आपणच आहोत, हे सिद्ध करण्यासाठी आवश्यक कागदपत्रं सदर संस्थेकडे (पाठारे प्रभू विश्वस्त निधी) आहेत.' (मुंबई उच्च न्यायालय २०१४.)

प्रत्यक्षात, बीआयटीचा वसाहतोत्तर वारसदार असलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालमत्ता विभागाकडे अशा कोणत्याही हस्तांतरणाचे किंवा संबंधित दस्तावेजाचे कागदपत्रं उपलब्ध नाहीत, असं मला स्वतंत्रपणे केलेल्या संशोधनात आढळलं. ट्रम्प टॉवरच्या

जागेमध्ये जे प्लॉट मिसळवण्याचा प्रयत्न मेहतांनी केला होता, त्या प्लॉटच्या उत्पत्तीचा धांडोळा घेतल्यास मुंबईच्या व्यावसायिक इतिहासातली उद्यमशीलताही उलगडत जाते. सरकारी दफ्तरामध्ये 'प्लॉट ९०' अशी नोंद असणारी शेजारची जागाही 'रोहन लाइफस्केप्स'नं ताब्यात घेतली होती. या जागेवर पूर्वी 'अजिंक्य हॉस्पिटल' या नावाचं एक रुग्णालय होतं. बीआयटीनं रस्ताबांधणीच्या वेळी स्थानिक जमीनदार शांताराम नारायण दाभोळकर यांची एक जागा ताब्यात घेतली तेव्हा त्यांना नुकसान भरपाई म्हणून भाडेतत्त्वावर ही जागा देण्यात आली. शां. ना. दाभोळकर हे नारायण वासुदेव दाभोळकरांचे पुत्र. नारायण दाभोळकरांनाही घोड्यांबद्दलच्या प्रेमातूनच त्यांचे सुरुवातीचे व्यावसायिक संपर्क मिळत गेले आणि तिथून पुढं दाभोळकर कुटुंबामध्ये औद्योगिक वारसा सुरू झाला, असं शांताराम यांचे पणतू नोंदवतात. एकोणिसाव्या शतकात मुंबई बंदरावरचा व्यापार फोफावत असताना 'पेनिन्सुलर अँड ओरिएन्टल' (पी अँड ओ) जहाज कंपनीला अन्नसामग्रीचा पुरवठा करून नारायण दाभोळकर श्रीमंत बनले. ते ब्रिटिश सैन्यातील एका कप्तानाच्या पत्नीला घोडदौड करण्याचं प्रशिक्षण देत असत, तिच्या माध्यमातूनच त्यांनी हे पुरवठादाराचं काम मिळवलं (आरास २०१६). बीआयटीनं केलेल्या आराखड्यामधील ह्युजेस व हार्वे हे रस्ते (सीताराम पाटकर मार्ग व पंडिता रमाबाई मार्ग, अशी या रस्त्यांची आताची नावं आहेत.) दोन्ही बाजूंनी समांतरपणे जात असलेल्या जागेवर वासुदेव दाभोळकरांनी खाजगी बंगला व गेस्टहाउस, बाग, तबेला, मंदिर व कौटुंबिक प्रार्थनास्थळ असं बांधकाम केलं होतं. ही सर्व मालमत्ता त्यांच्यानंतर शांताराम दाभोळकर यांच्याकडे आली होती. (दाभोळकर २०१४.)

ब्रिटिशांनी १८९६ साली प्लेगच्या साथीच्या पार्श्वभूमीवर 'शहराची साफसफाई करायला' बीआयटीची स्थापना केली होती. गर्दी झालेल्या झोपडपट्ट्यांचा पुनर्विकास करून स्वच्छ वसाहत बनवण्याचा हेतू त्यामागं होता. या प्रक्रियेमध्ये १८९४ च्या भूमी संपादन अधिनियमाद्वारे शांताराम दाभोळकरांची जमीनही बीआयटीनं ताब्यात घेतली. या जमिनीसंदर्भात नुकसान भरपाईचं 'प्रकरण' प्राधान्यानं विचारात घेतलं जाईल, अशी सूचनाही देण्यात आली.[१] वसाहतवादी मुंबईतील महत्त्वाचे जमीनदार व प्रभावी व्यक्तिमत्त्व असलेल्या दाभोळकरांचे आजोबाही प्लेगनंच मृत्युमुखी पडले होते. ब्रिटिशांनी बीआयटीच्या विश्वस्तांमध्ये दाभोळकरांचा समावेश केला. त्यामुळे प्राधान्यक्रमावरील क्षेत्रांसंबंधीच्या आणि शहर नियोजनासंबंधीच्या धोरणांवर प्रभाव टाकण्याजोगं पद त्यांना मिळालं. बीआयटी गामदेव योजना क्रमांक चार अंतर्गत संपादन करायच्या जागांचा अनुक्रम प्रकरणं २६, २७ व २८ असा ठेवण्यात आला. यातील प्रकरण २७ मधील जागेची पुनर्रचना करण्यात आली आणि तीच जागा ९९९ वर्षांच्या भाडेकरारावर दाभोळकरांना देण्यात आली. ही जागा 'प्लॉट ९०' म्हणून ओळखली जाते.

या जागेवर पूर्वी उभं असलेलं 'अजिंक्य हॉस्पिटल'ही मुळात दाभोळकरांच्याच मालकीचं होतं. ती इमारत कौटुंबिक मालमत्तेत गेस्ट-हाउस म्हणून वापरली जात होती. नवीन रस्ताबांधणी योजनेमध्ये 'प्लॉट ९०' बनलेल्या या प्रकरणापेक्षा 'प्रकरण २६' वेगळं होतं. बीआयटीच्या लवादानं १९०३-१९०८ या काळात ही जागा पाठारे प्रभू जातीच्या सदस्यांना कायमस्वरूपी देऊ केली. या जातीची स्मशानभूमी व धर्मशाळा असलेली जागा हार्वे रस्त्याच्या कामासाठी संपादित केल्याची भरपाई म्हणून ही दुसरी जागा देण्यात आली होती. सक्तीच्या संपादनाची नोटीस मिळाल्यानंतर १८९९ साली पाठारे प्रभू समुदायानं त्याविरोधात निषेधाचा आवाज उठवल्याचंही बीआयटीच्या दफ्तरात नोंदवलेलं आहे. 'धार्मिक संवेदनांमध्ये हस्तक्षेप करण्याचा हा प्रकार आहे', असं सांगण्यात आल्यानंतर या प्रकरणाचा 'विशेष विचार' करण्यात आला व त्यानुसार सहमती प्रस्थापित करण्यात आली. रस्त्याला जागा करून देण्यासाठी पाडण्यात आलेल्या इमारतींची पुनर्उभारणी करण्यासाठी खास निधी देण्यासारख्या काही तरतुदी करण्यात आल्या. सर्व प्रकरणं मिटवण्यात आली आणि रस्ता बांधण्यासाठी आणखी एक जागा एका घोडे विक्रेत्याकडून ताब्यात घेण्यात आली. त्याचं नाव होतं शहाबुद्दीन गुर्ते. त्याला १९०३ साली बीआयटीकडून मोठी रक्कम नुकसानभरपाई म्हणून मिळाली. अखेर १९०७-०८ पर्यंत वसाहतीच्या पुनर्विकासासाठी आवश्यक वाटाघाटी सौहार्दामध्ये पूर्ण करण्यात वसाहतवादी सरकारला यश आलं आणि बीआयटीकडून भाडेकरारावर मिळणारी जमीन स्वीकारण्यासाठी पाठारे प्रभू जातीचा एक धर्मदाय

विश्वस्त निधी नोंदवण्यात आला.[२]

हा प्लॉट विश्वस्त निधी संस्थेच्या मालकीचा नसला तरी बीआयटीनं तो कायमस्वरूपी त्यांना दिलेला होता, असं सरकारी दफ्तरातील नोंदींवरून स्पष्ट होतं. १९०९ चा धर्मादाय विश्वस्त करार आणि 'रोहन लाइफस्केप्स'नं आपल्या मुक्त मालकीच्या समर्थनासाठी पुरावा म्हणून सादर केलेलं करारपत्र (वाचायला अतिशय अवघड होईल अशा लेखी कागदांची खराब झेरॉक्स पुराव्यांना परिशिष्ट म्हणून जोडलेली होती), या कागदपत्रांमध्येही असं स्पष्टपणे म्हटलं आहे की, विश्वस्तांना 'या जमीन मालमत्तेची पुनर्रचना करण्याचा किंवा ती भाड्यानं देण्याचा वा विकण्याचा अधिकार नाही.' बीआयटीच्या जुन्या दफ्तरांमध्ये तर असंही नोंदवलेलं आहे की, १९०८ च्या करारानुसार ही जमीन पाठारे प्रभू समुदायानं धर्मदाय आणि/किंवा धार्मिक कामांसाठीच वापरावी. म्हणजे विश्वस्त संस्थेच्या इमारती २००७ साली 'रोहन लाइफस्केप्स'ला विकण्याचा व्यवहारच आधीच्या कराराचा व त्यातील नियमांचा भंग करणारा होता.

ही जमीन बीआयटीकडे किंवा बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे मालकी तत्त्वावर होती की जमिनीच्या मालकाशी केलेल्या भाडेकरारावर होती, हा वेगळा मुद्दा आहे. (महानगरपालिकेच्या कागदपत्रांनुसार ती भाडेतत्त्वावर नव्हती.) पण पाठारे प्रभू धर्मदाय विश्वस्त संस्थेनं विकासकाला जमीन विकण्याच्या व्यवहाराची अधिकृतता मात्र शंकेच्या भोवऱ्यात अडकते, हे नक्की. पण संस्थेनं ही मालमत्ता सात वर्षांपूर्वीच 'रोहन लाइफस्केप्स'ला विकून टाकली. प्रचंड चर्चेत असलेल्या प्रस्तावित ट्रम्प टॉवरच्या जमिनीसंबंधी उत्खनन करणाऱ्या चौकस पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देण्यास मात्र हे विश्वस्त सरळ नकार देतात. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जमीन मालकीला आव्हान देणाऱ्या 'रोहन लाइफस्केप्स'च्या याचिकेवरील सुनावणीनंतर उच्च न्यायालयानं काम थांबवण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे पाठारे प्रभू संस्थेची इमारत पाडण्याची व ट्रम्प टॉवर उभारण्याची प्रक्रिया २०१४ च्या अखेरीलाच थांबवण्यात आली.

स्पर्धेचा शेवटचा टप्पा

शहरी जमिनीचा वापर व पर्यावरण यासंबंधी नियंत्रणाची जबाबदारी असलेल्या इतर सरकारी विभागांनी मुळात या बांधकाम आराखड्यांना मंजुरीच कशी दिली, असे प्रश्न आता सरकारी तपास अधिकाऱ्यांकडून उपस्थित केले जात आहेत. समुद्रकिनाऱ्यापासून पाचशे मीटर अंतरावरच्या दोन प्लॉटचं स्थान, पश्चिम दिशेला असलेला अरबी समुद्र-अशा परिस्थितीत ही जागा राष्ट्रीय पातळीवरच्या किनारा नियंत्रण क्षेत्रामध्ये मोडते. केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयानं १९९१ साली केलेल्या राष्ट्रीय कायद्यानुसार अशी जागा पर्यावरण संरक्षक क्षेत्रात येते आणि तिथल्या नवीन बांधकामांची उंची व रचना यांवर कठोर नियंत्रण ठेवले जाते किंवा त्यांच्यावर प्रसंगी बंदीही आणली जाते. शिवाय शहराच्या दीर्घकालीन विकास आराखड्यामध्ये या दोन जागा गेली कित्येक दशकं भविष्यातील 'केंद्रीय बेट द्रुतगतीमार्गा'साठी राखीव ठेवण्यात आल्या होत्या. त्यामुळे बांधकामासाठी त्यांतील किती भाग वापरता येईल यावरही मर्यादा होती, कारण यातील काही भाग बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या भविष्यातील द्रुतगतीमार्गाच्या बांधकामाला पूरक म्हणून रिकामा ठेवणं आवश्यक होतं.

केंद्र सरकारनं २०११ साली किनारा नियंत्रण क्षेत्राचे नियम सैल केले आणि संरक्षित क्षेत्र पाचशे मीटरहून शंभर मीटरपर्यंत खाली आणलं, त्यामुळे भारताच्या किनारपट्टीवरील शहरांना बांधकामासाठी वाढीव जागा मिळाली. २०१५ मध्ये तर मुंबईच्या किनारपट्टीवरील काही भाग किनारा नियंत्रण क्षेत्रातून पूर्णच वगळण्यात आले. मध्य व दक्षिण मुंबईतील दोन वसाहती या खरं तर किनारपट्टीवर नसून खाडीजवळच्या जमिनीवर असल्याचा युक्तिवाद बिल्डरांच्या एका गटानं उच्च न्यायालयानं केल्यानंतर ही कार्यवाही झाली होती (नायर २०१५). ट्रम्प टॉवरसाठीची प्रस्तावित जागा दक्षिण मुंबईत मरिन ड्राइव्ह व बॅक बे आगाराला लागून आहे, त्यामुळे न्यायालयाच्या निकालानुसार तीही आता किनारा नियंत्रण क्षेत्राच्या अंतर्गत येत नाही. पूर्वनियोजित केंद्रीय बेट द्रुतगतीमार्गही रद्द करून त्याच्या जागी सुधारीत दीर्घकालीन बृहन्मुंबई विकास आराखड्यानुसार नवीन किनारी रस्ता बनवण्यात येईल. यामध्ये अरबी समुद्रातून बोगद्याद्वारे वाहतूक केली जाईल. २०१४ साली नव्यानं सत्तेत आलेल्या राज्य व केंद्र सरकारांनी या आराखड्याला मंजुरी दिली आहे. या किनाऱ्याला समुद्र आगार ठरवण्यासाठीची कायदेशीर

पुनर्विभागणी–परिणामी किनारपट्टीवरील मूल्यवान मालमत्तेला नियंत्रण क्षेत्राच्या कठोर बांधकाम नियमांपासून मिळालेली मुक्ती, आणि किनारी रस्ता विकासाठी घोषणा यांमुळे अनेक बिल्डरांच्या व किनारपट्टीवरील मालमत्तांच्या मालकांच्या योजना व्यवहार्यही ठरल्या आहेत आणि त्यांच्या संभाव्य नफ्याचं प्रमाण कल्पनेपलीकडे वाढलं आहे.

नियोजन आणि पर्यावरण यांसंबंधीच्या नियमांमधील या व्यापक बदलांच्या मदतीनं हरेश मेहता यांनी संकटांमधून स्वतःची सुटका करून घेतली. बृहन्मुंबई महानगरपालिकेविरोधात 'रोहन लाइफस्केप्स'नं केलेल्या याचिकेची दखल घेत उच्च न्यायालयानं २०१५ साली कायदेशीर तहकुबी व काम थांबवण्याची नोटीसही मागं घेतली. काही महिन्यांपूर्वी असं निदर्शनास आलं की, स्मिता पानवलकर व त्यांच्या कुटुंबीयांनीही जुन्या पाठारे प्रभू इमारतीतली सदनिका रिकामी केली आहे. ही इमारतही अर्ध्याहून अधिक पाडून झाली आहे. २०१५ वर्षाच्या मध्यात मेहता यांनी एका वित्तविषयक वर्तमानपत्राशी बोलताना सांगितलं, 'आम्हाला हा प्रकल्प सुरू ठेवायचा आहे आणि जोपर्यंत परिस्थिती सुधारत नाही तोपर्यंत बांधकामासाठी आवश्यक निधी उभा करण्यापुरतीच जागा विकण्याचा विचार आम्ही करू... आम्ही बांधकाम सुरू करून विक्रीची प्रक्रियाही सुरू करू, पण त्याच्या औपचारिक उद्घाटनाचं काही नियोजन आम्ही सध्या केलेलं नाही' (नंदी २०१५). गेल्याच महिन्यात दुसऱ्या एका वित्तविषयक वर्तमानपत्रात आलेल्या वार्तांकनानुसार, बांधकाम सुरू असलेल्या गगनचुंबी इमारतीसंबंधीचा आपला आधीचा आराखडा मेहतांनी पुनरुज्जीवित केला आहे आणि 'रेडियस डेव्हलपर्स' या स्थानिक कंपनीशी नवा करारही केला आहे. 'रोहन लाइफस्केप्स जमीन देऊ करेल, परवानग्या घेईल आणि रेडियस डेव्हलपर्स प्रकल्पाची अंमलबजावणी व बाजारातील विपणनाचं काम करेल.' (इकॉनॉमिक टाइम्स २०१६.)

मार्च २०१६ मध्ये मेहता यांनी त्यांची नवीन व्यावसायिक योजनाही स्पष्ट केली–'भविष्यकाळात एकमेकांमध्ये कामाची वाटणी करून घेतलेले मोजकेच विकासक असणार आहेत. जमीन मोकळी करून घेणारे, परवानग्या मिळवणारे विकासक असतील आणि नंतर वित्तीय बळावर आणि विकासात्मक कौशल्याच्या जोरावर या प्रकल्पांची अंमलबजावणी करणारे विकासक असतील.' (नंदी २०१६.) ट्रम्प यांच्यासोबतच्या कराराचा गाजावाजा होत असताना 'रेसिंग वर्ल्ड इंडिया'ला दिलेल्या मुलाखतीत मेहता म्हणाले होते त्याप्रमाणे, 'यश वा अपयश हे स्पर्धेचा भाग आहेत. टिकून राहणं जास्त महत्त्वाचं आहे. आनंद मिळवण्यासाठी तुम्ही स्पर्धेत उतरलेले असता. त्याच्या बदल्यात तुम्ही जर विजयी डाव खेळू शकलात, तर त्या क्षणाचा आनंद लुटा. काळ फारसा साथ देत नसेल, तर तेही खिलाडूपणे स्वीकारायला हवं. असा विचार केला तरच आपल्याला सर्वाधिक प्रिय असलेल्या स्पर्धेत आपण टिकून राहू शकतो.' (मल्ल्या २०११).

●

(एशिया रिसर्च इन्स्टिट्यूट, नॅशनल युनिव्हर्सिटी ऑफ सिंगापूर इथं १२–१३ मे २०१६ या काळात 'कन्स्ट्रक्टिंग एशिया : मटेरिआलिटी, कॅपिटल अँड लेबर इन द मेकिंग ऑफ अॅन अर्बनायजिंग लँडस्केप' या शीर्षकाखाली सदर निबंध पहिल्यांदा सादर करण्यात आला. या कार्यशाळेचे आयोजक एली अशेर एलिनॉफ व मालिनी सूर यांचे व बृहन्मुंबई महानगरपालिकेचे उपायुक्त (सुधारणा) चंद्रशेखर डी. चोरे यांचे आभार निबंधलेखक मानू इच्छितो.)

टिपा :

१. झोपडपट्टी पुनर्वसन मंडळाची स्थापना १९९६ मध्ये, म्हणजे बॉम्बे इम्प्रुव्हमेंट ट्रस्टच्या सुमारे (बीआयटी) एक शतकानंतर झाली. वसाहतवादी काळात १८९६–१८९८ मध्ये स्थापन झालेल्या बीआयटीप्रमाणेच आता या मंडळाकडे झोपडपट्ट्यांनी 'बळकावलेल्या' खाजगी मालकीच्या जमिनी सक्तीनं ताब्यात घेण्याचे कायदेशीर अधिकार आहेत.

२. 'प्रोसिडिंग्ज ऑफ द ट्रस्टीज फॉर द इम्प्रुव्हमेंट ऑफ द सिटी ऑफ बॉम्बे' या (१८९९–१९०८, बृहन्मुंबई महानगरपालिका मालमत्ता विभाग दफ्तरखाना) दस्तावेजातील ठराव आणि नोंदींवर हा विभाग आधारलेला आहे.

संदर्भ

Appadurai, Arjun. "The Spirit of Calculation." *Cambridge Anthropology* 30, no. 1 (March 1, 2012): 3–17.

Aras, Abodh. "Straying Around: Datta Temple at Chowpatty – A Dabholkar Family Heritage." Accessed May 11, 2016. http://strayingaround.blogspot.com/2008/12/datta-

temple-at-chowpatty-dabholkar.html.

Ashar, Sandeep. "Trump Walks out of Super-Lux Girgaum Project after Setback." *Mumbai Mirror*, August 10, 2013. http://www.mumbaimirror.com/mumbai/cover-story/Trump-walks-out-of-super-lux-Girgaum-project-after-setback/articleshow/21740481.cms

Babar, Kailash. "Trump Inks Pact with Lodha for Central Mumbai Project." *The Economic Times*. September 17, 2013. http://articles.economictimes.indiatimes.com/2013-09-17/news/42148571_1_rohan-lifescapes-donald-trump-panchshil-realty.

Bear, Laura, Ritu Birla, and Stine Simonsen Puri. "Speculation Futures and Capitalism in India." *Comparative Studies of South Asia, Africa and the Middle East* 35, no. 3 (January 1, 2015): 387–91.

Bombay High Court Writ Petition (L) 1399 of 2014, Rohan Developers v. Municipal Corporation of Greater Mumbai and ors.

CNN Travel (2011) "One Lady Stands in the Way of Trump Tower Mumbai." *CNN Travel*, June 27, 2011. http://travel.cnn.com/mumbai/life/trump-tower-mumbai-193857.

Dabholkar, Chaitanya. "Family Histories." Accessed October 5, 2014. https://sites.google.com/site/chaitanyadabholkar/Home/family-histories.

Economic Times (2016). "Radius Developers, Rohan Lifespaces in JV for SoBo's Hughes Road Project." *The Economic Times*, April 22, 2016. http://economictimes.indiatimes.com/wealth/real-estate/radius-developers-rohan-lifespaces-in-jv-for-sobos-hughes-road-project/articleshow/51948720.cms.

Gemideals (2012). "Donald Trump Tower in Mumbai in Problem." *Gemideals: Your Platform for Best Real Estate Deals*, January 14, 2012. http://www.gemideals.com/blog/2012/01/donald-trump-tower-in-mumbai-in-problem/.

Gokhlay, Madhavi. "The Redevelopment Itch." *Construction World*, April 2011. http://www.constructionworld.in/News.aspx?nId=MpHhXI1nBvQubIgUqm3wkw==.

Graham, David A. "Rumsfeld's Knowns and Unknowns: The Intellectual History of a Quip." *The Atlantic*, March 27, 2014. http://www.theatlantic.com/politics/archive/2014/03/rumsfelds-knowns-and-unknowns-the-intellectual-history-of-a-quip/359719/.

India Today (2012). "Brihanmumbai Municipal Corporation May Revoke Permission to Trump Tower." *India Today*, January 12, 2012. http://indiatoday.intoday.in/story/trump-tower-project-donald-trump-rohan-lifescapes-mumbai/1/168484.html.

Kaul, Vivek. "Trump's Wrong: How the Big Mac Burger Tells Us Mumbai Real Estate Ain't Cheap." *Firstpost Firstbiz*, September 14, 2014. http://firstbiz.firstpost.com/real-estate/trumps-wrong-how-the-big-mac-burger-tells-us-mumbai-real-estate-aint-cheap-99419.html.

Mallya, Mahendra. "Haresh Mehta – Master of the Game!" *Racing World India*, March 2011. http://racingworldindia.com/horseracing/content/view/878/114/.

Nair, Shalini. "Builders Rush to Get Nod for Projects in CRZ after Apex Court Order." *The Indian Express*, January 5, 2015. http://indianexpress.com/article/cities/mumbai/builders-rush-to-get-nod-for-projects-in-crz-after-apex-court-order/.

Mumbai Mirror (2011). "Woman Who Won't Let Donald Trump Mumbai." *Mumbai Mirror*, June 24, 2011. http://www.mumbaimirror.com/mumbai/cover-story/Woman-who-wont-let-Donald-trump-Mumbai/articleshow/16139163.cms.

Nandy, Madhurima. "Cash-Starved Developers Tie up with Bigger Rivals to Fund Projects." *Live Mint*, March 17, 2016. http://www.livemint.com/Companies/PFdjxi9gxNT1nfwukpkZIP/Cashstarved-developers-tie-up-with-bigger-rivals-to-fund-pr.html.

Nandy, Madhurima. "Delayed Realty Projects in Mumbai Set for Takeoff." *Live Mint*, July 10, 2015. http://www.livemint.com/Companies/HM351MNG4ZqZD1N3duE8tO/Delayed-realty-projects-in-Mumbai-set-for-takeoff.html.

Srivastava, Samar. "Mumbai's Real Estate Is Unbelievably Cheap: Donald Trump." *Forbes India Magazine*, November 28, 2014. http://forbesindia.com/article/real-issue/mumbais-real-estate-is-unbelievably-cheap-donald-trump/38605/1.

राज्यपातळीवरील राजकारणाचा जिल्हा पातळीवर अभ्यास कसा करता येईल, स्थानिक राजकीय संदर्भ आणि त्यांचा राज्य आणि देशाच्या पातळीवरील राजकारणाशी कसा संबंध येतो आणि जिल्हा हे राजकीय-आर्थिक अभ्यासाचे एकक (युनिट) कशाप्रकारे अभ्यासले जाऊ शकते याची विस्तृत मांडणी या पुस्तकात केली आहे.



लातूर जिल्ह्याची राजकीय प्रक्रिया

(राजकीय, सामाजिक, आर्थिक वाटचाल)

विवेक घोटाळे-दत्ता भिसे

पाने : २२१ । किं. : २०० रु.

The UNIQUE academy

द युनिक ॲकॅडमी

वास्तू चेंबर्स, शिरोळे रोड, फर्ग्युसन कॉलेजसमोर,
पुणे ४११००४. दू. ०२०२५५३०९५०

द्वारा EPW

समान नागरी कायदा : एक निरर्थक पाठपुरावा



आलोक प्रसन्न कुमार

तोंडी तलाकच्या संवैधानिक वैधतेबद्दल प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी याचिका शायरा बानो या मुस्लीम महिलेने सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल केली आणि पुन्हा एकदा देशामध्ये 'समान नागरी कायदा' लागू केला जाऊ शकतो का, ह्या विषयाची चर्चा सार्वजनिक वर्तुळात सुरू झाली. अशा प्रकारच्या वादांमध्ये भारतातील विविध धर्मांवर आधारित नागरी कायद्यांमध्ये अस्तित्वात असलेल्या अगणित प्रश्नांवर समान नागरी कायदा हे एकमेव उत्तर आहे, असे गृहीत धरूनच चर्चा केली जाते. समान नागरी कायदा ह्या संकल्पनेला सातत्याने भारतातील न्यायालये, महिला हक्कांसाठी काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था आणि एका प्रमुख राजकीय पक्षाचा पाठिंबा मिळाला आहे. आणि तरीही हे सगळे एक प्रकारचे आभासी वास्तव आहे, हे लक्षात घ्यायला हवे.

समान नागरी कायद्याबाबत अत्यंत आग्रही भूमिका मांडणाऱ्या त्याच्या खंद्या समर्थकांचे याबाबतचे दावे मात्र पोकळ स्वरूपाचे आढळून येतात. समान नागरी कायद्याचे स्वरूप मात्र एखादा ठरावीक प्रश्न सोडवण्यासाठी मांडण्यात आलेल्या घाऊक उपायापुरतेच मर्यादित राहिले आहे. सर्वोच्च न्यायालयाकडून गेल्या चार दशकांमध्ये याच पद्धतीचा अवलंब करून समान नागरी कायद्याबद्दलची भूमिका स्पष्ट करण्यात आली आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निकालांचा इतिहास

१९८५ साली *शहा बानो आणि इतर विरुद्ध मुहम्मद अहमद खान* (१९८५ परिच्छेद ३२) या खटल्यामध्ये सर्वप्रथम सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारपुढे राष्ट्रीय एकात्मता अबाधित ठेवण्यासाठी समान नागरी कायदा लागू करण्याची मागणी केली होती. वास्तविक या खटल्यातील कायदेशीर गुंतागुंत लक्षात घेता, सर्वोच्च न्यायालयाने केलेली ही मागणी पेचात टाकणारी ठरली. वास्तविक या खटल्याचा निकाल देताना

ईमेल : alok.prasanna@vidhilegalpolicy.in

न्यायालयाने गुन्हेगारी कायदा १०७३ च्या कलम १२५ बाबतचा अर्थ उलगडणेच केवळ अपेक्षित होते, जेणेकरून प्रत्येक धर्माच्या नागरी कायद्याला न ओलांडतादेखील ह्या कायद्यातील तरतुदी सर्व जाती-धर्मातील समुदायांसाठी लागू करणे शक्य होईल.[१] त्यानंतर काही आठवड्यांच्या अंतराने न्यायालयाने हाच मुद्दा वेगळ्या संदर्भात मांडला. *जोर्डन दिंगडेह विरुद्ध एस. एस. चोप्रा* १९८५ या खटल्यामध्ये एक ख्रिश्चन महिला आणि पंजाबी पुरुष यांच्या घटस्फोटाच्या खटल्यामध्ये निकाल सुनावताना न्यायालयाने या भूमिकेचा पुनरुच्चार केला होता. अशा प्रकारच्या घटस्फोटाच्या खटल्यांमध्ये कोणत्या कायद्याच्या आधारावर निकाल द्यावा हा पेच असल्याचे न्यायालयाने म्हटले होते.

यानंतर १९९५ साली म्हणजे तब्बल एका दशकानंतर एका जनहित याचिकेला उत्तर देताना सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा एकदा केंद्र सरकारपुढे समान नागरी कायदा लागू करण्याची विनंती केली. *सरला मुद्गल, अध्यक्ष कल्याणी आणि इतर विरुद्ध भारतीय संघराज्य* १९९५ या जनहित याचिकेमध्ये, हिंदू पुरुष केवळ दुसऱ्यांदा विवाह करण्यासाठी पहिल्या पत्नीला घटस्फोट न देता, दुसऱ्या विवाहापुरता इस्लाम धर्म स्वीकारताना दिसून येतात, असा प्रश्न उपस्थित केला गेला होता. न्यायालयाने दिलेल्या निकालामध्ये संपूर्ण भर हा दुसऱ्यांदा विवाह करण्यासाठी इस्लाम धर्म स्वीकारणाऱ्या हिंदू पुरुषांना इस्लाम धर्म स्वीकारण्यापासून कसे रोखता येईल यावर देण्यात आला होता. मात्र सर्व कायदेशीर बाबी आणि गुन्हेगारी कलमे यांच्या पलीकडे जाऊन हा प्रश्न सोडवण्यासाठी समान नागरी कायदा कशा प्रकारे मदतीचा ठरेल यावर मात्र न्यायालयाने स्पष्ट भूमिका घेण्याचे टाळले. याउलट, या खटल्यामध्ये निकाल देताना, समान नागरी कायद्याची रचना हिंदू नागरी कायद्यावर आधारित असावी असा निर्वाळादेखील न्यायालयाकडून करण्यात आला.

२००० साली लिली थॉमस व इतर वि. भारतीय संघराज्य या खटल्यामध्ये पुन्हा एकदा सर्वोच्च न्यायालयाने समान नागरी कायद्याबाबतची भूमिका स्पष्ट केली. यामध्ये निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने थेटपणे सांगितले की, न्यायालय समान नागरी कायद्याच्या अंमलबजावणीची सक्ती करू शकत नाही. मात्र समान नागरी कायद्याची गरज आणि त्याचे महत्त्व वेळोवेळी अधोरेखित करण्याचा अधिकार मात्र न्यायालयाने बाळगून ठेवला आहे. *जॉन वलमत्तम आणि इतर विरुद्ध भारतीय संघराज्य* २००३ या खटल्यामध्ये वहिवाटीच्या हक्कांसाठीच्या खटल्यामध्ये निकाल सुनावतानादेखील न्यायालयाने याच भूमिकेचा पुनरुच्चार केला होता.

यानंतर पुन्हा एकदा एका दशकानंतर एबीसी वि संघराज्य (NCT Of Delhi) २०१५ या खटल्यामध्ये पुन्हा एकदा एका ख्रिश्चन मुलाच्या पालकत्वाच्या खटल्यासंदर्भात उद्भवलेल्या प्रश्नावरून न्यायालयाने समान नागरी कायद्याचे महत्त्व विषद केले. आणि हा कायदा लागू न केल्यामुळे उद्भवणाऱ्या प्रश्नांबाबत हळहळ व्यक्त केली. या खटल्यामध्ये केवळ पालकत्वासंबंधित कायद्यामध्ये दुरुस्ती करून भागणार नाही, तर समान नागरी कायदा अस्तित्वात असता तर हा प्रश्न जास्त प्रभावीपणे सोडवता आला असता अशी भावना न्यायालयाकडून व्यक्त केली गेली.

क्वचित प्रसंगी न्यायालयाकडून यापेक्षा अत्यंत विरोधी भावनेचे मतदेखील व्यक्त करण्यात आले आहे. सरला मुद्गल खटला, तसेच प*न्नालाल बन्सीलाल पित्ती आणि इतर विरुद्ध आंध्रप्रदेश राज्यसरकार आणि इतर* १९९५ या खटल्यांमध्ये न्यायमूर्ती सहाय यांचे विधान महत्त्वाचे ठरते. त्यांच्या मते, समान नागरी कायदा लागू व्हावा असे अत्यंत गरजेचे आणि हिताचे ठरेल असे वाटत असेल, तरीदेखील जोपर्यंत या कायद्याबाबत राष्ट्रीय पातळीवर एकमत तयार होत नाही, तोपर्यंत हा कायदा लागू करता येणार नाही.

'समानतेबाबत'...

या सर्व निकालांच्या अभ्यासावरून एक गोष्ट मात्र स्पष्ट होते. ती म्हणजे न्यायालयालाच अजूनपर्यंत समान नागरी कायद्याचे खरे स्वरूप काय आहे आणि

बारामती प्रतिनिधी

वसंत घुले
भ्र. ९४२२५११००६

कसे असावे याबद्दल पुरेशी स्पष्टता नाही. न्यायालयापुढे नागरी कायद्यांबद्दल कोणताही पेचप्रसंग उभा राहिला की त्यावर उतारा म्हणून न्यायालयाकडून वेळोवेळी समान नागरी कायद्याची शिफारस केली गेल्याचा इतिहास आहे. जणू काही भारतातील विविध धार्मिक नागरी कायद्यांमध्ये लग्नसंस्थेसंदर्भातील प्रश्न अथवा कालबाह्यता असे कोणतेच प्रश्न अस्तित्वात नसून केवळ समानतेशी संबंधितच प्रश्न आणि अडचणी अस्तित्वात आहेत. या सर्व खटल्यांमध्ये न्यायालयाने सातत्याने कलम ४४ चा आधार घेतलेला दिसून येतो. जणू काही कलम ४४ हेच समान नागरी कायद्याच्या जवळ जाणारे सर्वात प्रभावी कलम आहे.

वास्तविक कलम ४४ हे अत्यंत त्रोटक स्वरूपाचे कलम आहे. यामध्ये सरकारने संपूर्ण राष्ट्रासाठी समान नागरी कायदा लागू करावा अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा संविधानातील इतर कोणत्याही भागामध्ये समान नागरी कायदा या विषयाचा उल्लेखदेखील आढळून येत नाही. याउलट संविधानाच्या कलम ३७१अ आणि कलम ३७१ग अनुसार जोपर्यंत नागालँड आणि मिझोरामच्या विधानसभा मंजुरी देत नाहीत तोपर्यंत स्थानिक संस्कृती आणि चालीरीतींशी संबंधित, संसदेने पारित केलेला कोणताही कायदा, या राज्यांत लागू करता येणार नाही. आसाम, मेघालय, मिझोरम आणि त्रिपुरा या राज्यांतील प्रादेशिक आणि स्थानिक संस्थांना त्या राज्यातील विविध समाज आणि संस्कृतींशी संबंधित कायदे आणि नियम आखण्याचे स्वातंत्र्य परिशिष्ट सहाअंतर्गत देण्यात आले आहे. त्यामुळे संसदेमध्ये जर समान नागरी कायदा पारित केला गेलाच, तर तो संपूर्ण भारतामध्ये खासकरून, ईशान्येकडील राज्यांमध्ये लागू करता येणार नाही.

संवैधानिक समितीकडेसुद्धा कलम ४४ ची (त्या काळचे कलम ३५) निर्मिती करताना, समान नागरी कायद्याबाबत पुरेशी स्पष्टता होती असा दावा करता येत नाही. वास्तविक समान नागरी कायद्याचे समर्थक म्हणवणाऱ्या नेत्यांचे दावे अगदीच वरवरचे होते.[२] समान नागरी कायद्यामधील प्रस्तावित कायदादुरुस्तीला विरोध दर्शवताना बाबासाहेब आंबेडकर यांनी हा कायदा आणि त्यातील तरतुदी बंधनकारक करता येणार नाहीत, हा कायदा लागू करणे अथवा न करणे हे दोन्ही पर्याय उपलब्ध असावेत, असे मत मांडले होते. (भारत सरकार १९९९). यावरून अशा निष्कर्षाप्रत येण्यास वाव आहे की आंबेडकरांच्या मनात, विशेष विवाह कायदा १९५४ प्रमाणे कायदा असावा, ज्याअंतर्गत भारतीय व्यक्तीला भारतीय कायद्यामध्ये राहून विवाह करता येईल, तसेच ती व्यक्ती भारतीय वारसा हक्क कायदा १९२५ च्या अंतर्गत कायदेशीर संरक्षणदेखील मिळवू शकेल.

वास्तविक पाहता 'हिंदू कोड बिल' असा दावा करते की, या बिलामधील सर्व तरतुदी ह्या सर्व हिंदूंसाठी समान स्वरूपाच्या आहेत. मात्र हे बिलसुद्धा कौटुंबिक कायद्यामधील काही मूलभूत बाबींबद्दल समान स्वरूपाचे नाही, हे लक्षात घ्यायला हवे. काही ठरावीक समुदायांमध्ये लग्नसंस्थेचा टिकाऊपणा काही ठरावीक रूढी आणि परंपरा यांच्यावर अवलंबून आहे.[३] केरळ आणि तामिळनाडूमधील[४] काही समुदायांमधील कुटुंबांसाठी वारसाहक्क कायद्याचे वेगळे नियम लागू होतात.[५] काही समुदायांमध्ये नागरिक दत्तक घेण्यास पात्र आहेत की नाहीत, हेदेखील काही ठरावीक रूढी आणि त्याच्या वापरावर अवलंबून असते. भारतातील भटक्या जातींना हिंदू अल्पसंख्याक आणि पालकत्व कायदा, १९५६ मधील तरतुदी लागू होत नाहीत.[६] म्हणजेच सर्व हिंदूंना हिंदू कोड बिलातील सर्व तरतुदी लागू पडतात, हा दावा अतिशय फसवा आहे, हे लक्षात येते. सर्व हिंदूंना या बिलाअंतर्गत समान कायदेशीर स्थान मिळत नाही. याचा परिणाम म्हणजे अनेक स्थानिक रूढी आणि संस्कृती या बिलाखेरीजही अबाधित राहिल्या आहेत.

पोर्तुगीज दिवाणी प्रक्रिया कायदा १९३९ हे याबाबत गाजलेले उदाहरण. हा कायदा जरी गोव्यामधील सर्व धार्मिक समुदायांसाठी लागू असला, तरी तो सर्वांसाठी समान स्वरूपाचा नाही, ही बाब लक्षात घ्यायला हवी. या कायद्यामध्ये कॅथलिक ख्रिश्चन वगळता इतर समुदायांसाठी वेगळ्या तरतुदी आढळतात. हा कायदा हिंदूंमधील दुसऱ्या विवाहालादेखील मर्यादित स्वरूपात मान्यता देतो. (नोरोन्हा २०१४)

समान नागरी कायदा खऱ्या अर्थाने समानतेच्या पातळीवर न्यायचा असल्यास पुढीलप्रमाणे बदल घडणे अपेक्षित आहे. लग्नसंस्थेला मान्यता मिळण्यासाठी ठरावीक धार्मिक संस्कारांच्या पूर्ततेची अट रद्द करण्यात

यावी, संलग्न मालमत्तेची अट रद्द करावी, वारसाहक्काने मिळालेल्या मालमत्तेवर हक्क सांगताना धर्म परिवर्तित केलेले आणि न केलेले हा फरक ग्राह्य धरला जाऊ नये.

जर या स्वरूपातील समान नागरी कायदा हा अपेक्षित अथवा हवाहवासा नसेल, तर या कायद्याकडून कोणत्या प्रकारची समानता अपेक्षित आहे, हे समजून न घेताच या कायद्याचा आग्रह धरण्यासारखे होईल. विविध धर्मांच्या अस्तित्वात असलेल्या नागरी कायद्यांमधील असमानता नाहीशी करणे हे या कायद्याचा आग्रह धरण्यामागचे एक प्रमुख कारण सांगितले जाते. मात्र समान नागरी कायदा लागू करण्याऐवजी त्या त्या धर्मांच्या नागरी कायद्यातील त्रुटी दूर करणे, ह्या पर्यायाचा विचार केला जाऊ शकतो.

ह्या कायद्याचे समर्थक, न्यायालये, संवैधानिक समिती या सर्वांच्यामते हा कायदा समाजातील लिंगभेद दूर करण्यासाठी, तसेच राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने अतिशय गरजेचा आहे. मात्र असे ठाम प्रतिपादन करतानादेखील, या कायद्याचे नेमके स्वरूप कसे असावे याबाबत मात्र, कोणालाच पुरेशी स्पष्टता नाही, असे दिसून येते. अशा वेळी आपण या कायद्याची तुलना लुईस कॅरोलच्या त्या सुप्रसिद्ध कवितेतल्या स्नार्कशी करू शकतो. कॅरोलच्या बहादूर सैनिकांप्रमाणे आपल्या हातात समान नागरी कायद्याच्या नावाने असलेला कागदही पूर्णपणे कोरा आहे. कायद्यापर्यंत जाऊ शकणारा असा कोणताच नकाशा त्यावर दिसत नाही. मुस्लीम स्त्रियांच्या हक्कांबद्दल थोडीफार प्रतिपादने करण्यातून अथवा बहुपत्नीत्वाच्या विरोधात बोलण्यातून या कायद्याची रूपरेषा हाती येत नसते. समान नागरी कायद्याच्या समर्थकांकडे या कायद्यासंबंधी कसलाही सुस्पष्ट आराखडा नसण्यामुळे स्नार्कप्रमाणे समान नागरी कायदा हा एक बुजम बनतो, जो त्याच्या शोध घेणाऱ्यांनाच गायब करत जातो!

●

(EPW, Vol. 51, Issue No. 25, 18 Jun, 2016)

(अनु. : **नेहा महाजन)**

Notes

1. See, for instance, *Bai Tahira A V Ali Hussain Fissalli Chothia and Another* (1979) and *Fuzlunbi v K Khader Vali and Another* (1980).
2. Speeches of Alladi Krishnaswami Iyengar and K M Munshi (GoI 1999).
3. Section 7 of the Hindu Marriage Act, 1955.
4. Section 17 of the Hindu Succession Act, 1956.
5. Section 10 of the Hindu Adoptions and Maintenance Act, 1956.
6. Section 3 of the Hindu Minority and Guardianship Act, 1956.

References

ABC v The State (NCT of Delhi) (2015): SCC, SC, 10, p 1.

Bai Tahira A v Ali Hussain Fissalli Chothia and Another (1979): SCC, SC, 2, p 316.

Carroll, Lewis (1950): "The Hunting of the Snark," Poets of the English Language, W H Auden and N H Pearson (eds), New York: Viking Press, viewed on 13 June 2016, http://www.poetryfoundation. org/poems-and-poets/poems/det ail/43909.

Fuzlunbi v K Khader Vali and Another (1980): SCC, SC, 4, p 125.

GoI (1999): "Constituent Assembly Debates (Proceedings)," Vol 7, 23 November 1948, Lok Sabha Secretariat, Government of India, viewed on 13 June 2016, http://164.100.47.132/LssNew/constituent/vol7p11.html.

John Vallamattom and Another v Union of India (2003): SCC, SC, 6, p 611.

Jordan Diengdeh v S S Chopra (1985): SCC, SC, 3, p 62.

Lily Thomas, Etc, Etc v Union of India and Others (2000): SCC, SC, 6, p 224.

Madhukalya, Amrita (2016): "Meet Shayara Bano, the Woman Who Wants to Ban Triple Talaq," Daily News and Analysis, 26 April, viewed on 13 June 2016, http://www.dnaindia.com/india/report-meet-shayara-bano-the-woman-who-wants-to-ban-triple-talaq-2206111.

Mohd Ahmed Khan v Shah Bano Begum and Others (1985): SCC, SC, 2, p 556.

Noronha, Frederick (2014): "Goa's Civil Code Has Backing of BJP, but It's Not Truly Uniform," Scroll. in, 9 June, viewed on 13 June 2016, http://scroll.in/article/666255/goas-civil-co d ehas-backing-of-bjp-but-its-not-truly-uniform.

Pannalal Bansilal Pitti and Others v State of Andhra Pradesh and Another (1996): SCC, SC, 2, p 498.

Sarla Mudgal, President, Kalyani and Others v Union of India and Others (1995): SCC, SC, 3, p 635.

समान नागरी कायद्याची समस्या आणि राजकारण

फकरुद्दीन बेन्नूर

गेल्या वर्षभरात किंवा थोडे आधीपासून 'समान नागरी कायद्या'चे ढोल वाजविले जात आहेत. मागील वर्षी न्यायाधीशांनी तो का लागू केला जात नाही, याची विचारणा केलेली होती. विधी आयोगाचे विचारमंथन चालू आहे. विशेष म्हणजे केंद्रीय कायदा मंत्रालयाने विधी आयोगाला 'समान नागरी कायदा' तयार करण्याबाबतची शक्यता पडताळून पाहण्याची सूचना केली आहे. एका अहवालानुसार मोदीप्रणित कायदामंत्र्यांनी संसदेत एका प्रश्नाला उत्तर देताना त्यांचे सरकार अशा कायद्याची शक्यता पाहण्यासाठी अनुकूल आहे असे म्हटले आहे. हे ढोल बडविणे उत्तर प्रदेशातील निवडणुका जवळ आल्यानंतर चालू झाले आहे. भाजप (रा. स्व. संघ) यांचे राजकारणाचे टार्गेट हे ३७० कलमामुळे मिळणारा काश्मीरचा विशेष दर्जा रद्द करून काश्मीरचे 'हिंदुकरण' करणे, तिथल्या मुसलमानांवर सूड उगवणे किंवा फाळणीची जबाबदारी त्यांच्यावर ढकलून त्यांना पाकिस्तानात हाकलून देणे; श्रीराम मंदिराची उभारणी करणे आणि समान नागरी कायदा करणे, हा तीन कलमी कार्यक्रम राहिला आहे. हे मुद्दे निवडणुकांच्या तोंडावर उपस्थित करण्याची त्यांची रणनीती आहे. त्यामागे भारतावर पूर्ण (टोटल) सत्ता मिळविणे आणि जनतेचे ब्राह्मणी हिंदुत्ववादीकरण करणे हे दोन हेतू राहिले आहेत.

त्यापैकी दोन टार्गेट पूर्ण होण्याच्या मार्गावर आहेत. बाबरीच्या उद्ध्वस्तीकरणाने त्यांनी दोन गोष्टी साध्य केल्या आहेत. एक श्रीराम मंदिराचा मुद्दा पक्का केला आहे. दुसरे म्हणजे धार्मिक ज्वर वाढवून सर्वसामान्य जनतेत मुस्लीमविरोधी मानसिकता तयार केली आहे. रचित जमातवादी इतिहासाला अधिकृत केले आणि मुस्लीम कसे इतिहासकाळापासून हिंदूंचे शत्रू होते असे मत तयार केले आहे. काश्मीरचे गेल्या काही वर्षांपासून जे हिंदुकरण चाललेले होते, ते पक्के करण्याएवढी सत्ता प्राप्त केली आहे.

ईमेल : pwatsaru@yahoo.com

आता 'समान नागरी कायद्या'चा मुद्दा हाती घेतला आहे. वातावरण तापवून निवडणुका जिंकणे आणि पाकिस्तानने जसे इस्लामीकरण करून धार्मिक राज्याची निर्मिती केली, लोकशाही उद्ध्वस्त करून हुकूमशाही आणली. तसे संघ-भाजपला करायचे आहे. भारतातील धर्मनिरपेक्ष-घटनात्मक लोकशाही आणि उदारमतवादी समाज नष्ट करून नवहिंदुत्ववादी एकचालकानुवर्ती हुकूमशाही आणायची आहे. मोदींची पावले त्याचे दिशेने निघाली आहेत.

मुळात आपल्या राज्यघटनेच्या ४४ व्या कलमात 'समान' हा शब्द नाही, तर 'युनिफॉर्म' हा शब्द आहे. 'कॉमन' म्हणजे समान कायदा, 'युनिफॉर्म' म्हणजे 'एकसारखा' कायदा. हा शब्द डॉ. आंबेडकरांनी सहज टाकलेला नाही. त्यात त्यांचा एक महत्त्वाचा हेतू आहे. त्यावर शेवटी लिहिले जाईल. राज्यघटनेतील शब्द कसाही बदलता येत नाही! समान नागरी कायदा ही रचनाच राज्यघटनेच्या आशयाशी विसंगत आहे, म्हणजे घटनाविरोधी किंवा राज्यघटनेच्या बाह्य आहे. कारण 'कॉमन' आणि 'युनिफॉर्म' यांचा अन्वयार्थ वेगळा आहे. 'कॉमन' म्हणजे 'सामाईक' किंवा 'सर्वसामान्य', 'सार्वजनिक', 'कॉमन सिव्हिल कोड' याचा अर्थ होतो की, सर्व धार्मिक जाती-जमातीसाठी 'एकच सामाईक कायदा', त्यांच्या त्यांच्या धर्माच्या तरतुदी किंवा धार्मिक विधी, परंपरा यांच्याऐवजी नवीन सामाईक नागरी कायदा तयार करणे. म्हणजेच हिंदू (ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर जमाती), मुस्लीम (शिया, सुन्नी, दाऊदी बोहरा इ.), बौद्ध, शीख, जैन, पारशी यांचे विवाह, विवाहाचे विधी, घटस्फोट, विवाहाचे संस्कार, बायका करण्याचे स्वातंत्र्य, काडीमोडाचे विधी, वारसा हक्क, स्त्रियांचे हक्क वगैरे नाकारून नवीन 'सामाईक' नियमावली लागू करणे होय.

'कॉमन' म्हणजे 'सामाईक नागरी कायदा' करण्यासाठी भारतातील राज्यघटनेने ग्राह्य धरलेले सहा धार्मिक संप्रदाय मुस्लीम, ख्रिश्चन, बौद्ध, शीख, जैन, पारशी या प्रमुख जमातींचे तसेच त्या धार्मिक जमातीतील प्रमुख पंथांचे मुख्य आणि सर्वमान्य धर्मगुरूंना केंद्र सरकारला सर्वांना मान्य असणारा समान नागरी कायदा ठरविण्यासाठी बोलवावे लागेल. समान नागरी कायदा फक्त मुसलमानांसाठी होऊ शकत नाही. इतर धर्मीयांचे व्यक्तिगत कायदे, स्त्रियांना न्याय देणारे आहेत काय? मग 'खाप पंचायती', 'ऑनर किलिंग', जातीबाहेर जाऊन प्रेमविवाह करण्याला विरोध, पंजाबमध्ये जाट-पंजाबी शेतकरी कुटुंबांत मालमत्तेची विभागणी होऊ नये म्हणून कुटुंबात जेवढे पुरुष असतील, त्यांच्यासाठी बिहार किंवा राजस्थानमधून एकच महिला, पत्नी म्हणून आणणे, मिताक्षर, दायभाग कायदे पद्धती, त्या सर्व गोष्टी 'न्याय्य' आणि स्त्रियांना समान दर्जा देणाऱ्या आहेत काय? ऑनर किलिंग, खाप पंचायती राज्यघटनाविरोधी आहेत. मग त्यांना देशद्रोही म्हणून का जाहीर केले जात नाही?

दुसरी समस्या म्हणजे आपल्या राज्यघटनेनुसार भारतातील सर्व धार्मिक जमाती, अल्पसंख्याक, धर्मपंथ यांना आपल्या धर्माप्रमाणे धर्मपालन आणि धार्मिक व्यवहार करण्याचा मूलभूत हक्क आहे. त्यांच्या संमतीशिवाय त्यांच्यावर कायदा लादता येणार नाही. तसे केल्यास तो घटनेचा भंग ठरेल. समान नागरी कायदा हा केवळ मुसलमानांसाठीच असू शकत नाही. केवळ मुस्लीमच त्यांच्या महिलांवर अन्याय आणि अत्याचार करतात काय? बाकीचे सर्व धुतल्या तांदळासारखे स्वच्छ आणि रामशास्त्री प्रभुणेंचे अवतार आहेत काय?

१९९३ ची मुंबईची दंगल, गुजरातमधील मनुष्यसंहार, मुझफ्फरपूर आणि शामलीच्या घडविलेल्या दंगली, गोमांसाचं निमित्त करून केलेले अत्याचार या सर्व ठिकाणी मुस्लीम स्त्रियांवर बलात्कार आणि अत्याचार करण्यात आले. त्यावेळी मौन धारण करणारे मौनीबाबा मोदी आणि भाजप सरकार यांना हे अत्याचार दिसले नाहीत. किंबहुना मुस्लीम स्त्रियांवर केलेले अत्याचार त्यांना अत्याचारच वाटत नाहीत, असं म्हणावे काय? आणि निवडणुका आल्यानंतरच त्यांना आता समान कायद्याचा पुळका का आला?

असे म्हटले जाऊ शकते की, आपल्या घटनेनुसार संसद सार्वभौम असल्याने संसदेला असा कायदा करण्याचा हक्क आहे. 'युनिफॉर्म'ऐवजी 'समान' हा शब्द घालणे म्हणजे घटनादुरुस्ती करणे होय. घटनादुरुस्तीची एक वेगळी प्रक्रिया आहे. काही तरतुदींसाठी राज्य विधानसभांचे दोनतृतीयांश बहुमत लागते. तेव्हा ही गोष्ट एवढी सोपी नाही. परंतु तसे ढोल बडवायला काय जाते? हो ना? तसेच भारताच्या संसदेचे (लोकसभेचे) स्वरूप काय आहे? लोकसभा पूर्णपणे 'पक्षीय' राजकारण करणारी असून सारासार विचार करणारी नाही.

गेल्या काही दशकांपासून निवडून येणारे तथाकथित

लोकप्रतिनिधींचे स्वरूप वादग्रस्त आहे. राजकीय पक्षांनी गुन्हेगार प्रवृत्तीचे, दलाल, कॉर्पोरेट कंपन्यांचे प्रतिनिधी, जात-जमातवादाचे राजकारण करणारे, तसेच धर्मांध प्रवृत्तीचे प्रतिनिधी निवडून आणले आहेत. संसद ही अशा लोकांचा आखाडा बनलेली आहे. मोदीप्रणीत भाजपबहुल संसद (लोकसभा) ही 'संघवाक्यम प्रमाणम' झाली आहे. त्यांनी लादलेला निर्णय सर्वधर्मीयांना मान्य होणार आहे का, हा यक्षप्रश्न आहे.

समान नागरी कायद्याची चर्चा आणि राजकारण किमान गेली चाळीस वर्षे चालू आहे. कोणत्याही पक्षीय सरकारने त्यासंबंधीचा खर्डा किंवा मसुदा (ड्राफ्ट) आतापर्यंत तयार केलेला नाही. त्यासंबंधी फक्त राजकारण चालू आहे. मुसलमानांना देशद्रोही ठरविण्याचे कारस्थान चालू आहे असा मसुदा भाजपप्रणीत लोकसभेने तयार केला, तर त्याचे स्वरूप काय राहील? विशेषतः लोकसभेतील 'भडकावू' राजकारण करणारे मंत्री, खासदार, योगी, साध्वी यांनी तयार केलेला 'मसुदा' काय असेल याची कल्पना केल्यास त्याचे (मसुद्याचे) स्वरूप आपल्या लक्षात येईल! कायद्याच्या प्रक्रियेनुसार (लोकसभा) संसदेच्या विषय-नियामक समित्या असतात. कोणत्याही प्रस्तावित विधेयकाचा मसुदा त्याच तयार करतात. विषय-समित्यांचे सभासद संसदेचे सभासदच असतात. मोदीप्रणीत भाजपचे राजकारण एकांगी आणि संघमय झालेले आहे. अशा परिस्थितीत 'भारतीय संस्कृती' किंवा 'राष्ट्रीय-संस्कृती' म्हणजे हिंदू राष्ट्रीयत्वाच्या काळात ब्राह्मणी-हिंदुत्ववादी संहिता, समान नागरी कायदा म्हणून लागू केले जाण्याची शक्यता नाकारता येणार नाही. कारण 'राष्ट्रीयत्व' म्हणजे ब्राह्मणी धार्मिक संस्कृतीच्या अभिव्यक्तीचे प्रतिपादन या प्रचाराचा हा कालखंड आहे. आणि या हिंदुत्ववाद्यांचे मुख्य टार्गेट आणि राष्ट्रीयत्वाचा मुद्दा भारतातील मुसलमान आणि ख्रिश्चन आहेत. त्यांच्या 'परकीयीकरणावर' त्यांचा राष्ट्रवाद आधारित आहे.

म्हणून तर वंदे मातरम, लव्ह जिहाद, गोमाता, भारतमाता की जय या सर्वांचा वापर करून दंगली घडविल्यानंतर आता ते त्यांचा जुना अजेंडा, 'समान नागरी कायद्याचे राजकारण' याच्याकडे वळले आहेत. त्यांनी 'बांगलादेशीयांची घुसखोरी' हा मुद्दा वापरूनच आसाममध्ये सत्ता मिळवली. तत्पूर्वी मुजफ्फरपूरच्या दंगली घडवून उत्तर प्रदेशातील लोकसभेच्या जागा मिळविल्या. आता कैरानातील मुस्लिमांचा तथाकथित अत्याचार आणि समान नागरी कायदा हे त्यांच्यापुढील निवडणुका जिंकण्याची रणनीतीचे मुख्य मुद्दे आहेत.

हे निवडणुका जिंकण्याचे जसे राजकारण आहे, तसेच भारतातील हिंदू बहुसंख्याकांचे जमातवादीकरण करण्याचे (कम्युनलायझेशन) महत्त्वाचे साधन आहे. ३७० वे कलम, दहशतवाद, रामजन्मभूमीची मुक्तता, रथयात्रा इ. प्रतीके वापरूनच संघ-भाजपने ब्राह्मणी हिंदुत्ववादीकरण वाढवत नेले आहे. समान नागरी कायद्याच्या आग्रहामागे हे दोन्ही हेतू स्पष्ट आहेत. त्यांच्या दृष्टीने काश्मीरचा प्रश्न जसा हिंदुकरणाचा आहे, समान नागरी कायद्याचा प्रश्न हाही हिंदुकरणाचाच आहे. प्रस्तावित समान नागरी कायद्याची त्यात अंतर्भूत असलेल्या सर्व बाबींचा समावेश असलेली 'संहिता'च नसताना कायदा करण्याच्या गोष्टी केल्या जात आहेत. मग हा प्रश्न आताच निकडीचा का झाला? म्हणजे संघ-भाजपने आता एक नवीन फंडा बाहेर काढला आहे. 'देशद्रोही', 'देशभक्त' ठरविण्याचा आणि 'समान नागरी कायद्याचा!' कोणीही शासनाविरुद्ध बोलले, तर तो देशद्रोही ठरतो. कायद्याची बात केली, तर देशद्रोही. आणि देशप्रेमाचे सर्टिफिकेट कोण देत आहेत? ज्यांनी स्वातंत्र्यलढ्यात ब्रिटिशधार्जिणे धोरण स्वीकारले होते, ज्यांचे स्फूर्तिस्थान असणाऱ्यांनी माफीनामा लिहून दिला होता, ज्यांनी बॅ. जीनांच्या खूप आधी द्विराष्ट्रवादाचे बीज रोवले होते, म्हणजे मुस्लीम हे स्वतंत्र राष्ट्र असल्याचा प्रचार केला होता, सध्या जे राज्यघटनेचा पदोपदी भंग करीत आहेत, घटना पायदळी तुडविणारी द्वेषमूलक भाषणे करीत आहेत, हे इतरांना देशभक्तीचे सर्टिफिकेट द्यायला निघाले आहेत. समान नागरी कायद्याच्या ढोल बडविण्यामागे मुस्लिमांना पूर्णपणे देशद्रोही ठरविण्याचे कारस्थान आहे. कारण देवबंद, तत्सम इतर धर्मपीठे, ऑल इंडिया मुस्लीम पर्सनल लॉ बोर्ड वगैरे पुन्हा जोरदार विरोध करणार आणि मुसलमानांच्या झुंडी त्यांना बळी पडणार. मग हे जोरदारपणे देशद्रोहाचे ढोल बडविणार, दंगली घडवणार आणि मते संघटित करणार.

नाही तर त्याचा आग्रह एवढ्या निकडीने करण्याचे कारण काय होते? मुस्लीम महिलांवर आकाश कोसळले आहे काय? दररोज वीस-पंचवीस हजार पुरुष चार बायका

करून लोकसंख्येत भयंकर वाढ करीत आहेत काय? मुस्लीम व्यक्तिगत कायद्यापुढे न्यायालये हतबल झालेली आहेत काय? मुस्लीम स्त्रियांवर मुस्लीम पुरुष अत्याचार करीत आहेत काय? उलट सर्वोच्च न्यायालयासहित सर्व न्यायालये वाढत्या प्रमाणात तलाकविरोधी निर्णय देत आहेत. एकतर्फी तलाक मोठ्या प्रमाणात अमान्य करीत आहेत. दहा हजार रुपयांपासून महिना चाळीस हजार रुपये एवढी 'पोटगी' तलाक मंजूर केल्यानंतर नवऱ्याने द्यावी असे निर्णय १९८६ पासून दिले जात आहेत. दुसरे लग्नही बेकायदेशीर ठरवीत आहेत. देशात वेगवेगळ्या ठिकाणी मुस्लीम महिलांच्या संघटना कामाला लागल्या आहेत. एका महिला संघटनेने पन्नास हजार मुस्लीम स्त्रियांच्या सह्या गोळा करून त्रिवार तलाकची तरतूद रद्द करण्याचा अर्ज केला आहे. 'त्यांची मागणी समान नागरी कायद्याची नाही, तर व्यक्तिगत कायद्यामधील तोंडी तलाकची तरतूद इस्लामबाह्य ठरविण्याची आहे.' (इंडियन एक्स्प्रेस, २७ जुलै २०१६, पा. ६.) आपल्या न्यायालयांनी केवळ तलाकविरोधी निर्णयच दिलेले नाहीत, तर धार्मिक पीठांनी 'दारूल कझा' या नावाने जी समांतर निवाडा समित्या नेमल्या होत्या, त्यांचे निर्णय हे कायदेशीर नाहीत असाही निर्णय दिलेला आहे. मौलवीचा फतवा केवळ एक मत असून तो कायदेशीर निर्णय नाही, असा निकाल दिला आहे. पोथीनिष्ठ उलेमांना विरोध करण्यासाठी 'महिला शरियत न्यायालये' स्थापन केली आहेत. (फ्रंटलाइन, ८ ऑगस्ट २०१४, सगनिक दत्ता यांचा लेख, पा. ४३.) जिल्हा न्यायालयापासून ते सर्वोच्च न्यायालयापर्यंत तोंडी तलाकविरुद्ध निर्णय दिले जात आहेत. अडचण एकच आहे. महिला न्यायालयात गेल्याखेरीज न्यायालयांना निर्णय देता येत नाहीत. परंतु या गोष्टी जनतेसमोर येत नाहीत. कारण आपली प्रसारमाध्यमे पूर्णपणे जमातवादी झालेली आहेत. त्यांना नेहमी मुस्लीमविरोधी बातम्या देण्यातच रस असतो.

या प्रक्रियेतील महत्त्वाची गोष्ट, म्हणजे या मुस्लीम महिला संघटनांनी एक मुख्य मुद्दा उचलला आहे. तो म्हणजे तोंडी तलाकमधला बदल कुराणाच्या कायद्याच्या प्रकारात झाला पाहिजे. त्यांचा सवाल आहे की, सर्व व्यक्तिगत कायदे त्यांच्या त्यांच्या धर्मग्रंथांवर आधारलेले आहेत आणि प्रत्येकाचा आपल्या धर्मानुसार धर्माचरण करण्याचा मूलभूत हक्क आहे. मग याला मुस्लीम स्त्रियाच का अपवाद केल्या जात आहेत? प्रत्येक धर्माचे व्यवहार आणि आचरणाचे विधी धर्मग्रंथाधिष्ठित आणि वेगवेगळे असताना सामाईक व्यक्तिगत कायदा (कॉमन पर्सनल लॉ) कसा लादता येणार? कोणता धार्मिक समूह आपली अस्मिता (ओळख) विसरायला तयार होईल? हे डॉ. आंबेडकरांना माहीत होते, म्हणून त्यांनी एकसारखा (युनिफॉर्म) नागरी कायदा हा शब्दप्रयोग राज्यघटनेत ठेवला. त्यांनी एकसारखा (युनिफॉर्म) 'व्यक्तिगत कायदा' असे म्हटलेले नाही. 'नागरी कायदा' असे म्हटलेले आहे. नागरिकांमध्ये स्त्री-पुरुष दोन्हीही अभिप्रेत आहेत. म्हणजे स्त्री-पुरुषांसाठी एकसारखा कायदा असा अर्थ आहे. डॉ. आंबेडकरांचे मत होते की, भारतातील सर्वधर्मीयांचे कायदे आणि रूढी स्त्रियांवर अन्याय करणारे आहेत. त्यांचे राजकारण केवळ अस्पृश्योद्धारासाठी नव्हते, तर भारतीय समाजापर्यंत दुर्बल घटकांच्या 'मुक्तीचे राजकारण' होते. दुर्बल घटकांत त्यांनी स्त्रिया, वृद्ध, अपंग, मुले आणि अवर्ण जमाती यांचा समावेश केलेला आहे. म्हणून त्यांनी एकसारखा कायदा म्हणजे स्त्री व पुरुषासाठी एकसारखा कायदा हे सूचित केलेले आहे. त्यात स्त्रियांवरील लिंगभाव-भेद नष्ट करण्याचा विचार आहे.

सर्वधर्मीयांसाठी एकसारखा कायदा हे त्यात अभिप्रेत नाही, आणि नव्हते. कारण कोणत्याही धार्मिक लोकसमूहावर परिस्थिती, ऐतिहासिक प्रक्रिया, समूहांतील गटागटांतील संबंध, त्यातून येणाऱ्या रूढी-परंपरा, वेगवेगळ्या काळात आणि प्रसंगात धर्माचार्यांनी लावलेला अन्वयार्थ यांचे परिणाम असतात. जेथे निरनिराळ्या प्रदेशातला एक धार्मिक समूह एकसारखा असत नाही, तेथे वेगवेगळ्या धार्मिक जमाती आणि त्यांचे धार्मिक कायदे एकसारखे कसे असतील? हे डॉ. आंबेडकरांना चांगले माहीत होते. म्हणून नागरी (सिव्हिल) कायद्यातील स्त्री-पुरुषांना एकसारखा कायदा, ही त्यांची कल्पना होती. सर्व धार्मिक रचना समान नसल्याने एकेका धार्मिक समूहांतील स्त्री-पुरुषांसाठी एकसारखा म्हणजे न्यायावर आधारित हे त्यांना अभिप्रेत होते. म्हणून समान नागरी कायदा म्हणजे सर्वधर्मीयांसाठी समान कायदा हा प्रचलित समज चुकीचा आहे, तो राज्यघटनेला अभिप्रेत नाही.

ब्राह्मणी धार्मिक-राजकीय अभिजनांनी प्रस्थापित केलेले हजारो वर्षांचे प्रभुत्व, सर्व तळागाळातील

समाजघटकांवर लादलेली गुलामगिरी, इतरांच्या संस्कृती आणि सामाजिक इतिहासाचे अपहरण करून, त्यांचे केलेले ब्राह्मणीकरण हे डॉ. आंबेडकरांना चांगलेच माहीत होते. या ब्राह्मणीकरणाचा आणि विषमतेचा डॉ. आंबेडकरांना विदारक अनुभव प्रत्यक्षात आला होता. असे असताना सर्वधर्मीय लोकसमूहासाठी समान नागरी कायदा करण्याची परवानगी राज्यघटनेतून दिली तर कोणाचा कायदा सर्वांवर लादला जाईल, हे त्यांना नीट माहीत होते. कारण घटना समितीत काम करताना त्यांना प्रतिगामी आणि सनातनी विचारांच्या सभासदांना तोंड द्यावे लागले होते. संविधान सभेचा सांस्कृतिक विचारांचा कलही त्यांनी अनुभवला होता. म्हणून त्यांनी एकेका धार्मिक समूहांगर्तत एकसारखा न्याय देणारा कायदा करावा, ही संकल्पना मांडली. एकेका धार्मिक समूहांतर्गत सुधारणा करणे, स्त्रियांना न्याय आणि समता मिळवून देणे किती कठीण आहे हेही माहीत असल्याने ४४ वे कलम मार्गदर्शक तत्त्वामध्ये टाकले आणि प्रबोधनाच्या मार्गाने संबंधित लोकसमूहाची संमती मिळवावी, हे सूचित केले. घटना समितीतील हिंदू आणि मुसलमान सभासदांची भाषणे वाचली, तर हे स्पष्ट होते. हिंदू कोड बिलाच्या वेळी त्यांना भारतातील सर्व हिंदू धर्मगुरू आणि रा. स्व. संघासारख्या ब्राह्मणी अभिजनवादी संघटना यांच्या प्रचंड विरोधाला सामोरे जावे लागले. हिंदू कोड बिलाला विरोध करणारेच आता हा प्रचार करीत आहेत.

मग प्रश्न असा येतो की, मुस्लीम महिलांना न्याय आणि समता देणारा, पुरुष वर्चस्ववादी जाचापासून मुक्त करणारा एकसारखा व्यक्तिगत कायदा करायला नको का? तो करणे अत्यंत गरजेचे आहे. भारतातील मुसलमानांचा शरियत कायदा हा कुराणाचा कायदा आहे. तो चिरंतन असून बदलता येत नाही, हे भारतातल्या धर्माचार्यांचे म्हणणे आहे. म्हणून त्यांचा तोंडी तलाक रद्द करण्याला विरोध आहे. त्यासाठी ते देशात गोंधळ घालत असतात. त्यांचे म्हणणे बरोबर आहे का?

मुस्लीम व्यक्तिगत कायद्यापुढील पेचप्रसंग

याआधी राज्यघटनेतील ४४ व्या कलमाचे स्वरूप आणि समस्या मांडण्याचा प्रयत्न केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असलेला लिंगभाव-न्याय (जेंडर जस्टिस) आणि तथाकथित 'समान' नागरी कायद्याच्या मागणीबद्दलचे राजकारण यांची चर्चा केली. मुस्लीम महिलांना न्याय आणि समता देणारा, पुरुष वर्चस्ववादी जाचापासून मुक्त करणारा, एकसारखा व्यक्तिगत कायदा करायला नको का? म्हणजे तोंडी दिलेला तलाक आणि मनमानी दुसऱ्या विवाहाची प्रथा दुरुस्त व्हायला नको का? व्हायला पाहिजे, तर मग अडचण कोणती आहे?

भारतातील देवबंद, तत्सम बाकीची धर्मपीठे, तथाकथित उलेमा कौन्सिल, ऑल इंडिया पर्सनल लॉ बोर्ड, तथाकथित तज्ज्ञ उलेमा (धर्मगुरू) यांचे प्रतिपादन आहे की, या तरतुदी इस्लामची 'शरियत' आहेत. शरियत कुराणप्रणीत असल्याने आणि अल्लाहचा हुकूम असल्यामुळे बदलता येत नाही आणि कोणालाही बदलण्याचा अधिकार नाही. त्या 'चिरंतन' आणि पूर्णपणे 'बंधनकारक' आहेत. अल्लाहचा कायदा स्त्रियांवर अन्याय करणारा कसा राहील? तो बदलता किंवा दुरुस्त करता येणार नाही. तो 'तलाक-ए-बिदा' (अयोग्य तलाक) असला, तरी तोंडी तलाक दिला की तो अंतिम (फायनल) होतो!

म्हणून मुस्लीम स्त्रियांच्या तरतुदीबाबत प्रश्न उठविला किंवा 'एकसारखा नागरी कायद्याची' गोष्ट केली की वरील संघटनांचा विरोध सुरू होतो, आंदोलने घडविली जातात. वस्तुस्थिती काय आहे? भारतातील मुसलमानांचा तथाकथित शरियत कायदा हा कुराणबरहुकूम नाही, तर ब्रिटिशांनी संहितीकरण (कोडिफिकेशन) केलेला १९३७ चा शरियत कायदा आणि १९३९ चा विवाह कायदा आहे. म्हणजे शरियतच्या नावाने तो ब्रिटिशांनी केलेला कायदा आहे. इस्लामी कायद्याचे तज्ज्ञ ताहीर महमूद यांनी 'मुस्लीम पर्सनल लॉ, विकास पब्लिशर्स, १९७७, 'पर्सनल लॉज क्रायसिस', ताहीर महमूद, मेट्रोपॉलिटन बुक्स, दिल्ली, १९८६ - या पुस्तकातून दाखवून दिले आहे की, ब्रिटिश न्यायालये मुस्लिमांच्या व्यक्तिगत कायद्यासंबंधी खटले चालविताना, मोगल राजवटीत तयार केलेल्या इस्लामी कायद्याच्या संहिता 'हिदाया' आणि 'फतवा-ए-आलमगीर' यांचा वापर करीत असत. या दोन्ही संहितांमधील इस्लामी कायदे तेराव्या शतकापासून ते सतराव्या शतकापर्यंतच्या काळात तज्ज्ञ धर्मगुरूंनी वेळोवेळी जी तत्त्वे विकसित केली, शरियतचे अर्थ लावले, त्यांचे संकलन आहे. ताहीर महमूद यांनी म्हटले आहे की, ब्रिटिश न्यायाधीशांनी 'हिदायत' तरतुदींचा अर्थ लावताना त्यांचेही (डिस्ट्रॉरशन) वेडेवाकडे अर्थ लावलेली उदाहरणे आहेत.

ब्रिटिशांनी १९३७, १९३९ चे कायदे करीत असताना वापरलेला आधार जसा 'हिदाया' आणि त्यांचा अन्वयार्थ आहे, तसेच भारतातील सरंजामदार, जमीनदार, अशरफ वर्ग आणि त्यांचे प्रतिनिधित्व करणारे मौलवी, ब्रिटिशांनी नेमलेले काझी यांच्या सल्लामसलतीनुसार केलेले ते कायदे आहेत. (पाहा : ताहीर महमूद, मुस्लीम पर्सनल लॉ) म्हणून तर पोस्टाने पत्र पाठवून तलाक, टेलिफोनवरून तलाक, पत्नीच्या गैरहजेरीत किंवा तिला माहेरी घालवून दिलेला तलाक, एका बैठकीत एकाच दमात तीन वेळा उच्चारून दिलेला त्रिवार तलाक, तलाकचा एकतर्फी घेतलेला निर्णय, दारूच्या नशेत दिलेला तलाक अशा कोणत्याही तरतुदीचा कुराणात उल्लेख नाही; तर मग भारतातला जो प्रचलित मुस्लीम तलाकचा कायदा आहे, तो कुराणाची शरियत कसा? तो चिरंतन आणि न बदलणारा कसा?

इस्लामी कायदेशास्त्रातील जे चार मुख्य प्रवाह आहेत ते इमाम हंबल, अबू हनीफा, इमाम शाफई, मलिकी यांसारख्या त्या त्या काळातील तज्ज्ञ धर्मवेत्त्यांनी तत्कालीन परिस्थितीप्रमाणे अर्थ लावून दिलेल्या निर्णयाच्या संहिता आहेत. काहींनी अन्वयार्थ शब्दशः लावलेला आहे, काहींनी त्यांच्यासमोर आलेल्या समस्येची उकल करण्यासाठी अर्थ बदलला आहे, काही ठिकाणी कालसापेक्षता आहे, तर काही ठिकाणी कर्मठ, पुरुष वर्चस्ववादी दृष्टिकोन ठेवून दिलेला निर्णय आहे. किंबहुना भारतात प्रस्थापित झालेला मुस्लीम व्यक्तिगत कायदा पूर्णपणे पुरुष वर्चस्ववादी मानसिकतेची रचना आहे. तो कुराणबरहुकूम कायदा नाही. ही गोष्ट भारतातील मुस्लिमांची धर्मपीठे, मुस्लीम पर्सनल लॉ, नामवंत उलेमा यांना माहीत नाही काय? सर्वांना याची कल्पना आहे. परंतु इस्लाम इब्न तिमिया, इमाम गझाली, शेख अहमद सरहिंदी, शाह वलीउल्लाहसारख्या प्रगाढ धर्मपंडितांनी इस्लामी कायद्यासंबंधाने काही तत्त्वे प्रस्थापित केली आहेत. त्यापैकी दोन मुख्य तत्त्वे आहेत : (१) तकलीद आणि इज्तेहाद. तकलीद म्हणजे ज्येष्ठ उलेमांनी प्रस्थापित केलेला किंवा लावलेला कुराणाचा अर्थ, हाच अधिकृत आणि अंतिम मानावा. त्याच्याबाहेर जाण्याची परवानगी लोकांना नसते. शाह वलीउल्लानी सांगितले आहे की, 'अर्थ लादण्याचा अधिकार उलेमांनाच आहे. सर्वसामान्य लोकांना नाही.' म्हणून पूर्वसूरींनी लावलेला अर्थच भारतातील सर्व उलेमा स्वीकारताना दिसून येतील. इमाम गझालींनीच इज्तेहाद म्हणजे कालसापेक्ष व परिस्थितीसापेक्ष अर्थ लावण्याचे दरवाजे बंद झाले आहेत, असा निर्णय दिला होता.

वास्तविक 'इज्तेहाद' म्हणजे कालसापेक्ष व परिस्थितीसापेक्ष अर्थ लावण्याचा अधिकार खुद्द पैगंबरसाहेबांनी लोकांना दिलेला आहे. ते हदीसमध्ये नमूद केलेले आहे. असे असताना तकलीदच्या नावाखाली उलेमांनीच तो हक्क सर्वसामान्य लोकांपासून हिरावून घेतलेला आहे. शाह वलीउल्लाहनी 'इज्तेहाद'ची परवानगी दिली, त्याचा पुरस्कारही केला. परंतु मूळ कुराणाच्या सातव्या-आठव्या शतकात जो अर्थ लावला गेला होता, तो स्वीकारावा असे म्हटले. म्हणजे अठराव्या, एकोणिसाव्या, विसाव्या शतकांतील प्रश्नांची उत्तरे सातव्या आणि आठव्या शतकांतील अर्थाप्रमाणे लावली जावी, हा विचार पुढे रूढ केला. परिणामी उलेमा सातव्या ते तेराव्या शतकाच्या मानसिकतेतच आहेत.

दुसरी वादग्रस्त गोष्ट म्हणजे ते ब्रिटिशांनी केलेल्या कायद्याला 'तकलीद'चे बंधन लावून तो कायदा कुराणप्रणीत शरियत आहे असे म्हणत आहेत. यामध्ये पुरुषी वर्चस्ववादी मनोवृत्ती आणि मध्ययुगीन ट्रायबल मानसिकता आहे. वास्तविक इस्लामच्या प्रेषितसाहेबांनी कुराणातील आदेशांद्वारे आणि त्यांनी स्वतः दिलेल्या निर्णयातून भटक्या बदायुनी टोळी संस्कृती बदलून, त्यांना सामाजिक जाणिवा, समता, बंधुत्व आणि पुरुषीवर्चस्वमुक्त व्यवस्था यांच्याकडे नेण्याचा प्रयत्न केलेला होता. महिलांना स्वायत्त हक्क आणि समता प्रदान केली. विवाह एकतर्फी न ठेवता स्त्री-पुरुष यामधील पवित्र करारावर निश्चित केला. कुराणात त्यांना मिसाकन-गलीजा म्हणजे पवित्र करार म्हटले आहे. मूळ कुराणमध्ये एकतर्फी तोंडी तलाक नाही. कुराणानुसार तलाकची परिस्थिती उद्भवली तर तलाकच्या निर्णय घेण्याआधी पती आणि पत्नीकडून दोन दोन किंवा त्यांच्या मतानुसार साक्षीदार (लवाद) मध्यस्थ नेमले जातील. त्यांच्या उपस्थितीत दोघांनी आपापली बाजू मांडावयाची असते. पतीने तलाक देण्याची कारणे द्यावी लागतात. पत्नी आपली बाजू मांडते. साक्षीदार समेट घडविण्याचा प्रयत्न करतात. समेट न झाला, तर तलाक उच्चारता येतो. परंतु त्याची अंमलबजावणी होत नाही. तो 'पहिला तलाक' मानला जातो. दुसऱ्या महिन्यात भेटायचे ठरते. तोपर्यंत

पत्नी महिनाभर पतीबरोबर राहते. दुसऱ्या महिन्यात तीच पद्धती अवलंबिली जाते. समेट न झाल्यास 'दुसरा तलाक' होतो. तिसऱ्या महिन्यापर्यंत पत्नी तिथेच राहते. समेट न झाल्यास तिसरी बैठक घेण्यात येऊन दिलेला 'तिसरा तलाक' अंतिम आणि कायदेशीर मानला जातो. कोणत्या कारणासाठी तलाक दिला जाऊ शकतो, त्याची कारणेही नमूद केली आहेत. तेव्हा वाटेल तेव्हा, वाटेल त्या कारणासाठी किंवा खोटे आरोप ठेवून पुरुष तलाक देऊ शकत नाहीत. तेव्हा भारतातील दिले जाणारे तोंडी तलाक, एकतर्फी तलाक कुराणाचा आदेश भंग करणारे आहेत. ही कुराणप्रणीत शरियत नाही.

त्रिवार एकतर्फी तलाकचे उदाहरण पैगंबरसाहेबांचे एकनिष्ठ सहकारी खलिफा उमरसाहेबांच्या काळातले. सातव्या शतकातले आहे. त्यांनी 'विशेष परिस्थितीत' एकतर्फी त्रिवार तलाक मान्य केला होता. सातव्या शतकातील काही भागातील बदायुनी पुरुष 'पौरुष अहंकारी' होते. तलाक मागणाऱ्या बायकांना किंवा त्यांच्या तलाकला विरोध करणाऱ्या बायकांच्या जिवाला धोका होता किंवा त्यांना विद्रूप केले जाण्याची शक्यता होती. या परिस्थितीत स्त्रियांचा बचाव करण्यासाठी त्यांनी हा निर्णय दिला होता. ब्रिटिशप्रणीत कायदे आणि भारतातील धर्मपीठे यालाच शरियतचा कायदा म्हणतात! ते हे लक्षात घेत नाही की खलिफा उमरसाहेबांचा निर्णय 'परिस्थिती'जन्य होता. त्याला ते 'तकलीद'चा नियम लावत आहेत. त्या नियमाला 'तकलीद'चा नियम लागू न करता, बहुसंख्य मुस्लीम देशांनी त्यात बदल केले आहेत. दुरुस्त्या केल्या आहेत.

भारतातदेखील काही इस्लामी पंथांनी आणि धर्मपंडितांनी एकतर्फी तलाक अमान्य केला आहे. ऑल इंडिया मुस्लीम मजलीसे मशारतचे संस्थापक मौ. जफरूल इस्लाम खान यांनी एका बैठकीत त्रिवार तलाक घेणाऱ्या पुरुषास चाबकाने फोडून काढण्याची शिक्षा द्यावी असे म्हटले आहे. (फ्रंटलाइन, २४ जून २०१६.) मुस्लीम लॉ बोर्डाने म्हटले आहे की, खलिफा उमर यांच्या आदेशाच्या 'शब्दा'ऐवजी 'आशय आणि हेतूंचा' विचार करून वागावे. 'अल हदीस' पंथीयांच्या मते, एका बैठकीत दिलेला त्रिवार तलाक हा एकदाच दिलेला तलाक होतो. भारतातील इस्लामी पंडितांवर सौदी अरेबिया, आखाती देश, शाह वलीउल्लाह यांचा मोठा प्रभाव असल्याने ते तकलीदचेच पुरस्कर्ते आहेत. कालसापेक्ष बदलाची मानसिकता तयार झालेली नाही. वरील पाच-सहा इस्लामी देश सोडले तर जगातील बहुसंख्य मुस्लीम राष्ट्रांनी आपल्या व्यक्तिगत कायद्यात दुरुस्त्या केल्या आहेत. (ताहीर महमूद, मुस्लीम पर्सनल लॉज् इन इस्लामिक कंट्रीज, ॲकॅडमी ऑफ लॉ अँड रिलिजन, न्यू दिल्ली, १९८७.)

म्हणजे तथाकथित मुस्लीम व्यक्तिगत कायदा हा कुराणातील मूळ तरतुदींनुसार नाही. तो कुराणातील तत्त्वे आणि त्यामधील आशय यानुसार नाही. ऐतिहासिक प्रक्रियेत धर्माचार्यांनी लावलेला अन्वयार्थ आहे. तो कायदा कुराण शब्दप्रामाण्यावरही आधारित नाही. भारतातील धर्मपीठे आणि उलेमा यांना याची कल्पना निश्चितच आहे. परंतु त्यांना पितृसत्ताक पुरुष वर्चस्ववादी जीवनपद्धती टिकवून ठेवायची आहे.

दुसरे कारण म्हणजे त्यामधील बदलांना मान्यता दिली, तर हिंदुबहुल शासनसंस्था आणि त्यांचे राजकीय पक्ष भारतातील इस्लामी संस्कृतीचा गाभाच बदलून टाकतील, ही भीती त्यांना आहे. कारण स्वातंत्र्यपूर्वकाळापासून राष्ट्रवादाच्या ब्रिटिश प्रायोजित राष्ट्रवादाच्या सिद्धान्तामुळे धर्म आणि धार्मिक संस्कृती हा घटक अस्मिता किंवा सामूहिक ओळख यांचा मुख्य घटक बनला. १९८० पासून हिंदुत्ववादी राजकारणाने त्याचा झंझावाती प्रचार चालू ठेवला आहे. म्हणून त्यांचा बदलाला विरोध आहे. सध्या मुस्लीमविरोधाचे वातावरण खूप चिघळलेले आहे. इस्लामच्या प्रत्येक गोष्टीला विरोध चालला आहे. इस्लामची जास्तीत जास्त बदनामी करण्याचे प्रयत्न चाललेले आहेत. म्हणून विरोध आहे.

भारतातल्या प्रत्येक जाती-जमातीतले व्यक्तिगत कायदे धर्मावर आधारित आहेत. त्यांचे त्यांचे धार्मिक विधी आहेत. तेव्हा सर्वांसाठी समान नागरी कायदा कसा होईल? सध्या जे पार्लमेंटचे 'स्वरूप' आहे, ते सूडाचे राजकारण आहे, या परिस्थितीत बहुमताच्या जोरावर काहीही केले जाऊ शकते. डॉ. आंबेडकरांना माहीत होते की, फाळणीच्या राजकारणामुळे आणि बहुसंख्याकवादामुळे मुस्लीमविरोधी वातावरण आहे. म्हणूनच मार्गदर्शक तत्त्वात ही तरतूद करण्यात आली. आणि 'युनिफॉर्म सिव्हिल कोड' हा शब्दप्रयोग ठेवण्यात आला. मुख्य प्रश्न 'जेंडर जस्टीस'चा म्हणजे भारतातील स्त्रियांना गुलामगिरीतून

म्हणजे पुरुष वर्चस्ववादी संस्कृतीमधून मुक्त करण्याचा होता म्हणून मार्गदर्शक तत्त्वांच्या माध्यमातून का होईना, स्त्री आणि पुरुषांच्या कायद्यात 'युनिफॉर्मिटी' आणण्याची तरतूद केली.

मुस्लीम व्यक्तिगत कायद्यापुढे आपली न्यायालये हतबल झाली आहेत काय? त्यांचे हात पूर्णपणे बांधले गेलेले असून मुस्लीम विवाहित स्त्रिया पूर्णपणे बेदखल आहेत काय? परिस्थिती नेमकी उलटी आहे. देवबंद, जमियत-उलेमा हिंद, मुस्लीम पर्सनल लॉ बोर्ड इत्यादींच्या विरोधाला न जुमानता न्यायालये मुस्लीम स्त्रियांना न्याय देणारे निर्णय देत आहेत. हा प्रकार १९८६ पासून चाललेला आहे. तत्पूर्वी आणि नंतरदेखील न्या. कृष्णा अय्यर यांच्या निर्णयाच्या आधारे सी. आर. पी. सी. १२५ प्रमाणे निर्णय दिले गेले आहेत. १९८६ चा 'मुस्लीम महिला घटस्फोटअंतर्गत महिला हक्क संरक्षण कायदा' घरगुती हिंसेपासून महिला संरक्षण अधिनियम या कायद्याचा आधार घेऊन निर्णय दिले जात आहेत. वास्तविक राजीव गांधी यांच्या काळात झालेला १९८६ चा महिला हक्क संरक्षण कायदा या सर्व वादापासून दूर राहून मुस्लीम महिलांना न्याय देणाऱ्या प्रयत्नांमधील महत्त्वाचा टप्पा होता. सय्यद शहाबुद्दीन यांनी त्यावेळी एक महत्त्वाचे स्टेटमेंट केले होते. ते म्हणाले होते की, हा कायदा म्हणजे मुस्लीम व्यक्तिगत कायद्याच्या कोडीफिकेशनचा प्रारंभ आहे. परंतु भारतातील तथाकथित पुरोगामी, मुस्लीम स्त्रियांसाठी छाती बडवून घेणारे काँग्रेसविरोधी राजकारणी, महाराष्ट्रातले समाजवादी आणि या कायद्याकडे काँग्रेसच्या पराभवाचे शस्त्र म्हणून पाहणारे हिंदुत्ववादी यांनी प्रचंड गदारोळ माजविला. मुस्लिमांचा अनुनय करणारा कायदा म्हणून आरडाओरडा केला. घाबरून राजीव गांधींनी बाबरी मशिदीचे कुलूप तोडून आणि शिलान्यास चळवळीला पाठिंबा देऊन भाजपचा अनुनय करण्याचा प्रयत्न केला. या सर्व गदारोळात त्या कायद्याची विधायक बाजू जनतेपुढे आलीच नाही. या सर्वांना त्या कायद्यामध्ये मुसलमानांचा अनुनय दिसला, बाबरी मशीद आणि शिलान्यासात दिसला नाही, असे आहे यांचे पुरोगामित्व! पुरोगामित्व म्हणजे काँग्रेसला विरोध! मग पाठिंबा कोणाला?

मुसलमानी कायद्यात विवाह हा दोन व्यक्तींमधील करार आहे. कुराणानुसार निकाहनाम्यात कराराच्या अटी असतात. स्त्रीला अटी घालण्याचा अधिकार दिलेला आहे. हिंदू कायद्यात विवाह हा धार्मिक विधी आहे. कॅथॅलिकांमध्येही तसेच आहे. हे बदलून त्यांना हिंदू विधी लावणार का? तर सर्वांचे विवाहाचे विधी रद्द करणार का? कुराणातील बहुपत्नित्वाची तरतूद हा 'कायदा' नाही, ती विशेष परिस्थितीत दिलेली 'सवलत' आहे. त्याच्या गैरवापराबद्दल मौनीबाबा मोदीप्रमाणे सगळी इस्लामी धर्मपीठे मौन बाळगून आहेत.

'समान'(?) नागरी कायद्याबद्दल आणि तलाकबद्दलची लगीनघाई गेल्या वर्षापासून चालू झाली आहे. दररोज हजारो मुस्लीम पुरुष चार बायका करून हिंदूंच्या पुढे जात आहेत काय? खोट्या जनगणना अहवालांनी, विधानांनी आकडेवारी फुगविली, तरी ते कधीच बहुसंख्याक होऊ शकणार नाहीत. तसेच मुस्लीम स्त्रियांवर आकाश कोसळले आहे काय? त्यांना न्याय देणारा कोणीच राहिला नाही काय? आपली न्यायालये हतबल झाली आहेत काय? २०१५ आणि २०१६ मधील 'फ्रंटलाइन'चे अंक पाहिल्यास, मुस्लीम स्त्रिया न्यायासाठी करीत असलेला संघर्ष आणि त्यांना न्यायालयांची मिळत असलेली साथ स्पष्ट होईल. 'वाटसरू'च्या १ ते १५ जुलै २०१६ च्या अंकात मुस्लीम स्त्रियांसाठी कायद्याने लढा देणाऱ्या फ्लाविया ॲग्नेस यांचा लेख महत्त्वाचा आणि पक्षपाती न्यायाधीश व प्रसारमाध्यमे यांचे पितळ उघडे पाडणारा आहे. त्याचा परामर्श घेण्यापूर्वी गेल्या सहा-सात वर्षांपासून ज्या मुस्लीम महिला संघटना आणि काही प्रमुख विचारवंत, जी मागणी करीत आहेत त्याचा थोडक्यात विचार करू. पन्नास हजार स्त्रियांच्या सह्यांनी जी मागणी करण्यात आली आहे, ती मागणी काय आहे? त्यांचे म्हणणे आहे की, एका बैठकीतला त्रिवार तलाक घेण्याचा जो १९३७ चा शरियत अंमलबजावणीचा कायदा आहे, तो रद्द करून कुराणप्रणीत अटींच्या चौकटीतला कायदा करावा. त्यांची मागणी आहे की दुसरी बायको करण्याच्या मनमानी सवलतीमुळे पहिल्या पत्नीवर अन्याय होतो. त्यावर बंधने घालावीत. वर नमूद केलेल्या पाच-सहा मुस्लीम सत्ताधाऱ्यांची राज्ये सोडून, बाकीच्या सर्व मुस्लीम राष्ट्रांत त्रिवार एकतर्फी तलाक आणि बहुपत्नित्वावर बंधने घालण्यात आली आहे. या महिला संघटना आणि असगर अली इंजिनियरसारख्यांचे म्हणणे आहे की, इस्लामच्या चौकटीत ह्या दुरुस्त्या करता येतात. असगर अली इंजिनियर

यांनी दुरुस्तीचा मसुदा उलेमा कौन्सिल आणि पर्सनल लॉ बोर्ड यांना सादर केला होता. त्यांनी तो मसुदा धुडकावून लावला. त्यात त्यांचे हितसंबंधही आहेत आणि अस्मितेचे राजकारणही आहे. त्यात घरगुती हिंसा, पोटगी व मुलांचा ताबा, हे मुद्देही होते आणि आहेत. एक महाराष्ट्रातील मुस्लीम सत्यशोधक मंडळ आणि त्यांच्या विचारांची काही माणसे सोडली, तर तथाकथित समान नागरी कायदा लादण्याची मागणी कोणाचीही नाही. बाकीच्या सर्वांना एकतर्फी तोंडी तलाक आणि 'इद्दत' सीमित पोटगी बदलून हवी आहे. वर म्हटल्याप्रमाणे या दुरुस्त्या कुराणाच्या प्रकाशात करता येतात.

फ्लाविया ॲग्नेस यांच्या म्हणण्याप्रमाणे काय परिस्थिती आहे? त्यांच्या म्हणण्यानुसार, तोंडी तलाक अवैध ठरवलेल्या हजारो खटल्यांचे दस्तऐवज उपलब्ध आहेत. विविध न्यायालयीन निकालांचे संदर्भ उपलब्ध असतानादेखील मुस्लीम महिलांच्या बाजूने दिलेल्या अनेक निर्णयांना बाजूला ठेवून (म्हणजे लपवून) चुकीचा प्रचार प्रसारमाध्यमे, काही तथाकथित स्वयंसेवी संस्था, काही हिंदुत्वधार्जिणे न्यायाधीश, कायदेपंडित व मंत्री करताना दिसून येत आहेत. ॲग्नेस यांचे म्हणणे आहे की, झटपट प्रसिद्धी मिळविण्यासाठी केलेला हा बनाव आहे. मला यात आणखी दोन हेतू दिसतात – (१) समान नागरी कायद्याच्या निमित्ताने मुस्लिमांना 'देशद्रोही' किंवा तथाकथित 'राष्ट्रीय प्रवाहा'त सामील होण्यास नकार देणारे ठरविणे. म्हणून त्यांना 'परकीय' ठरविणे. (२) भाजपला म्हणजे रा. स्व. संघाला अपेक्षित ब्राह्मणी सांस्कृतिक मूल्ये त्यांच्यावर लादणे.

मुस्लीम महिलांच्या बाजूने न्यायालयांनी दिलेले निर्णय आणि संरक्षण यांचा थोडक्यात परामर्श घेऊया. २००२ साली आपल्या सर्वोच्च न्यायालयाने शमीम आरा वि. भारतीय संघराज्य या खटल्यात त्रिवार तोंडी तलाक ग्राह्य धरला जाणार नाही, असा ऐतिहासिक निर्णय दिला होता. त्याच खटल्यात पुढे म्हटले होते की, तोंडी तलाकच्या विरुद्ध पत्नीने न्यायालयात तक्रार केली, तर तिला शह देण्यासाठी पती न्यायालयात घटस्फोटाची याचिका दाखल करू शकत नाही. 'तलाकला मान्यता हवी असेल तर तो कुराणाच्या तरतुदीनुसारच मागायला पाहिजे.' न्यायालयाने म्हटले होते, 'ज्या दिवशी पत्नीला पती जाहीर निवेदनाद्वारे घटस्फोट देतो आणि तो बंधनकारक ठरतो, अशी कोणतीही रीत कोणत्याही धर्मामध्ये आहे, असे आमच्या पाहण्यात नाही.' सर्वोच्च न्यायालयाचे हे म्हणणे कोणी लक्षात घेईल का? याची चर्चादेखील पुरेशी झाली नाही. सर्वोच्च न्यायालयाचा हा निकाल लक्षात घेऊन उच्च न्यायालयांनी तो वापरला तर तलाकला अधिमान्यता हवी असेल तर कुराणच्या तरतुदी पूर्ण करणे बंधनकारक राहील. आता १९३७ च्या तथाकथित शरियत कायद्यातील प्रस्तुतता कोठे राहिली आहे? सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय हा 'जज्मेड लॉ' मानला जातो.

२००२ साली मुंबई हायकोर्टाने दगडू पठाण वि. रहिमबी पठाण या खटल्याचा दिलेला निकाल महत्त्वाचा आहे. या निकालानुसार मुस्लीम पतीला स्वतःच्या मर्जीने लग्न नाकारण्याचा कोणताही अधिकार नाही. हा निकाल देताना न्यायालयाने कुराणचा संदर्भ दिला आहे. आपल्या बेकायदा मागण्या नाकारल्याबद्दल पत्नीला धडा शिकविण्यासाठी तिने छळाबद्दल तक्रार केली तर तो तिला तलाक देऊ शकत नाही. न्यायालयाने म्हटले आहे की, त्याने असे केल्यास कुराणानुसार त्याचे ते कृत्य हराम ठरेल. मित्रांनो, आपले काय म्हणणे आहे या निकालाबद्दल?

२००४ साली देखील मुंबई हायकोर्टाने तसाच निकाल दिला आहे. (नाजमूनबी वि. सिकंदर रहिमान). २००७ मध्ये दिलशाद बेगम वि. अहमद खान पठाण या खटल्यातील अपीलात मुंबई हायकोर्टाने निकालात म्हटले की पतीने मशिदीमध्ये साक्षीदारासमोर तलाक दिला तरी त्याला कायदेशीर तलाक म्हणता येणार नाही. कारण तलाक घेण्याचे निकष : तलाकची कारणे, मध्यस्थांची नियुक्ती, समेट करण्याचे प्रयत्न यांची पतीने पूर्तता केलेली नाही. तरी त्याने पत्नीला नांदवण्यामध्ये असमर्थता दर्शविली किंवा पोटगी देण्यास नकार दिला, तर पतीला आपल्या नावावरील एकतृतीयांश जमीन पत्नीच्या नावावर करावी लागेल. २००७ मध्ये रियाझ फातिमा वि. मुहम्मद फातिमा खटल्यात पतीने दावा लावला की पत्नीला तलाक दिला असल्याने ती पोटगीसाठी पात्र ठरत नाही. अपिलात दिल्ली हायकोर्टाने तलाकची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण न केली गेल्याने पतीचा दावा नामंजूर केला. कोर्टाने तलाकची ठोस कारणे, साक्षीदाराची उपस्थिती, मध्यस्थांचे प्रयत्न, इद्दतची रक्कम दिल्याचे पुरावे नसल्याने दावा रद्द केला. २०१६ मध्ये तसाच निकाल मुंबई हायकोर्टाने दिला.

अशी अनेक उदाहरणे ॲग्नेस यांनी दिली आहेत. त्यांचे म्हणणे आहे की, आजपर्यंत अनेक कायदेपंडितांनी तोंडी तलाक अवैध ठरविण्यात यावा यावर विपुल लिखाण केले आहे. हे लिखाण करताना न्यायालयांनी प्रत्यक्षात मुस्लीम महिलांच्या बाजूने दिलेले निकाल पद्धतशीरपणे दुर्लक्षित केले आहेत.

असे शेकडो निर्णय न्यायालयांनी दिलेले असताना, म्हणजे एकतर्फी निकाल त्रिवार तोंडी तलाकची प्रक्षिप्त प्रथा (कायदा?) रद्द ठरविला असताना, २०१५ मध्ये न्या. अनिल आर. दवे आणि आदर्श गोयल यांनी पुन्हा एकदा समान नागरी कायद्याचा पुनर्विचार व्हावा असे म्हटले! या दोन्ही न्यायाधीशांना सर्वोच्च न्यायालयासहित, वेगवेगळ्या हायकोर्टांनी तथाकथित त्रिवार तोंडी तलाकचा कायदा अवैध ठरवून (कुराणाच्या आधारे) महिलांच्या बाजूने दिलेले निकाल यांची माहिती नव्हती काय? किंवा ते 'जज्मेड लॉ' मानत नाहीत का? वरील सर्व न्यायालयांच्या निकालामुळे तोंडी आणि एकतर्फी त्रिवार तलाक मोडीत निघाला आहे, हे लपवून त्यांना राजकारण करावयाचे आहे, असे म्हटले तर चुकीचे होईल का?

वास्तविक भारतातील सर्वांना समान नागरी कायदा म्हणजे सिव्हिल लॉज एकसारखाच आहे. फौजदारी कायदाही सर्वांना लागू आहे. १९३७ च्या ब्रिटिश कायद्याचा आधार घेऊन मुस्लीम अशरफ पुरुष वर्चस्ववादी राजकारणी, त्यांचे राजकीय पक्ष, धर्मपीठे, उलेमा यांनी सततचे स्वतंत्र अस्मितेचे राजकारण केले, तसेच हिंदूबहुल पार्लमेंट आणि मंत्रिमंडळे यांच्या बहुलवादी निर्णयाचा एकतर्फी धसका घेऊन त्यांनी बदलांना कायम विरोध केला. या राजकारणात कुराणमधील मूळ तरतुदी आणि स्त्रियांना दिलेले स्वातंत्र्य यांची अक्षम्य उपेक्षा केली. हे त्यांचे राजकारण कुराणविरोधी म्हणजे 'हराम' होते आणि आहे. त्यामुळे हा प्रश्न निर्माण झाल्यासारखे वातावरण तयार होते. शाहबानो खटल्यानंतर निर्माण झालेला गदारोळ आणि वाद लक्षात घेऊन राजीव गांधींच्या काळात १९८६ चा मुस्लीम महिला संरक्षण कायदा संमत केला गेला. भाजप आणि बाकीच्या विरोधी पक्ष आणि प्रसारमाध्यमे यांनी त्या कायद्यावर एकांगी हल्ला चढवून वातावरण तापविले आणि काँग्रेसचा पराभव केला. हे घडले नसते, तर तलाकसंबंधीच्या कायद्यात आणखी दुरुस्त्या केल्या जाण्याची शक्यता होती. आपल्या न्यायालयांनी एकतर्फी तलाक मोडीतच काढला आहे. तसेच घरगुती हिंसा, पोटगीविषयी संरक्षण देणारे कायदे आणि त्यानुसार दिलेले निकाल उपलब्ध आहेत, याची माहिती सर्वसामान्य मुस्लिमांना नसते. ते काझी किंवा मौलवीचा शब्दच अंतिम मानून चालतात. म्हणून समस्या निर्माण झाली आहे.

जर तथाकथित एकतर्फी तोंडी तलाकचा कायदा न्यायालयांनी रद्द ठरविला असेल, तर (कारण सर्वोच्च न्यायालय आणि हायकोर्टाचे निर्णय कायदेच ठरतात.) आपले मंत्री, विधी आयोग, भाजप आणि संघपरिवार समान नागरी कायदा करण्याची भाषा व प्रचार का करीत आहेत? भाजपच्या हातात दोनतृतीयांश बहुमत आले म्हणून काय करायचे आहे त्यांना?

समान नागरी कायद्याचा प्रचार मुस्लीम विरोधाचे राजकारण करून संपूर्ण भारतावर ताबा मिळविण्यासाठी आहे. काँग्रेसनेही प्रारंभापासून मुस्लिमांची मते मिळविण्यासाठी त्याचा प्रचंड गैरवापर केला आहे. समान नागरी कायद्याचा प्रश्न राजकीय पक्षांच्या हातातील मते मिळविण्याचे साधन आहे. लव्ह जिहादपासून भारतमाता की जय ही सर्व हत्यारे वापरून झाली. आता मुस्लिमांमुळे हिंदू जगणे धोक्यात (कैराना) आणि (मलेरकोटला) अलीगढ मुस्लीम विद्यापीठाचे अल्पसंख्याक आरक्षणाचे प्रकरण आणि समान नागरी कायद्याची मागणी हे मुस्लीम विरोधाच्या भात्यातील बाण बाहेर काढले गेले आहेत.

शेवटचा एकच मुद्दा. या सर्व गदारोळापासून व प्रचारापासून दूर राहून, जागृत नसलेल्या मुस्लीम महिलांना न्याय कसा मिळवून द्यायचा हा प्रश्न आहे. त्यासाठी काही ठोस मार्ग अवलंबावे लागतील – (१) माझ्या लेखात फ्लाविया ॲग्नेस यांनी नमूद केलेले ते तीन कायदे (वाटसरू, १ ते १५ जुलै २०१६) आणि आपल्या न्यायालयांनी दिलेले निर्णय (ॲग्नेस यांनी तेही दिले आहेत.) यांची माहिती प्रसारित करण्याची यंत्रणा उभी करणे (जिल्हानिहाय). यासाठी विधायक दृष्टी असणाऱ्या स्वयंसेवी संघटनांनी पुढे येणे किंवा नव्या संघटना स्थापन करणे. (२) समान नागरी कायद्याचा मुद्दा वापरून राजकारण करणाऱ्या घटकांशी प्रतिवाद करणे. (३) महिलांचे आणि सर्वसामान्य मुसलमानांचे प्रबोधन करणे. ●

राष्ट्रवाद आणि राष्ट्रवादी

माधव दातार

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आता ६८ वर्षे उलटली असली, तरी राष्ट्रवाद म्हणजे काय आणि राष्ट्रवादी कोणास म्हणावे हा चर्चा विषय व्हावा या बाबत कोणास आश्चर्य वाटले, तरी 'सबका साथ सबका विकास' ही घोषणा देऊन सत्तारूढ झालेल्या भारतीय जनता पक्षास राष्ट्रवाद हा विषय सतत सार्वजनिक चर्चेचा मुद्दा बनविण्याची गरज का वाटते हा तेवढाच कुतुहलाचा मुद्दा आहे. मात्र या हे दोन्ही मुद्दे परस्परांशी संबंधित असल्याने अनेकांना यापैकी कशाचेच फारसे आश्चर्य वाटणार नाही! एक तर आजवर 'हिंदुत्व' हा आपल्या राजकारणाचा केंद्रीय मुद्दा बनविण्याचा भाजपाने सातत्याने प्रयत्न केला आहे. पण वर्तमान परिस्थितीत अयोध्येत राममंदिर उभारणी करणे यासारखा प्रच्छन्न धार्मिक मुद्दा निवडणुका जिंकण्यास फारसा उपयोगी पडणार नाही अशी जाणीव झाल्याने विकासाचा मुद्दा केंद्रस्थानी ठेवून निवडणुका जिंकल्यावरही कथित सांस्कृतिक राष्ट्रवादाचा मुद्दा अधिकृतपणे पक्ष आणि सरकार यांच्या कार्यक्रमपत्रिकेवर न आणता तो इतर मार्गाने चर्चेत राखण्याचे पक्षाचे प्रयत्न सातत्याने चालू आहेत. प्रथम घरवापसी, नंतर गोहत्या बंदी आणि गोमांस भक्षण आणि आता भारत माता की जय म्हणायचे का नाही हा मुद्दा पुढे आणला जात आहे. हे आणि असे विविध मुद्दे विविध राज्यातील निवडणुकांच्या तोंडावर उपस्थित करण्यात येत असल्याने या मुद्द्यावर समाजाची विभागणी करतानाच बहुसंख्य लोकमत आपल्या बाजूने वळविण्याचा प्रयत्न या प्रकारांमागे दिसून येतो. जवाहरलाल नेहरू विद्यापीठात जी घटना घडली तिचे तात्कालिक परिमाण सध्याच्या चर्चेला कारणीभूत ठरले असले तरी या विविध घटनांमधील समान धागा बहुसंख्याकवादाचा पुरस्कार असाच राहिला आहे. या विविध प्रकारांत बहुसंख्य (हिंदू) आणि मुस्लीम, ख्रिश्चन असे धार्मिक गट आणि या

ईमेल : mkdatar@gmail.com

मुद्द्यांवर भिन्न मते असणारे इतर लोक (यांना डावे किंवा मार्क्सवादी असे म्हणण्याचा नवा प्रघात आहे!) अशी विभागणी करण्याचे प्रयत्न सतत होत आहेत. या विविध प्रश्नांवर अशी विभागणी कल्पिण्याची कल्पना अर्थातच तर्कदुष्ट आहे. जवाहरलाल नेहरू विद्यापीठात वादग्रस्त घोषणा दिल्या गेल्या. त्यामुळे सांस्कृतिक राष्ट्रवादाचा मुद्दा हिंदू धर्मनिरपेक्ष अशा शुद्ध स्वरूपात उत्पन्न होतो असे भासवले जाते आणि 'भारतमाता की जय' हा नारा देण्यास ज्यांचा विरोध आहे ते अर्थातच अराष्ट्रीय, राष्ट्रविरोधी ठरतात असे दाखवले गेले. त्यातच आपल्या मानेवर सुरी ठेवली तरी आपण 'भारतमाता की जय' असे म्हणणार नाही असे काहींनी नमूद केल्याने ही घोषणा देणे हा राष्ट्रभक्तीचा एकमेव निकष ठरू शकतो का हा प्रश्न उपस्थित होतो. त्यामुळे वर्तमान काळात राष्ट्रवादाचे नेमके स्वरूप आणि राष्ट्रवादी ठरण्यास कोणत्या पूर्वअटी ठरवता येतात हे मुद्दे चर्चाविषय ठरतात. शिवाय राष्ट्राबाबत सामान्य जनतेच्या मनात प्रेम, आदर आणि अभिमान अशा संमिश्र भावना असल्याने हे मुद्दे उपस्थित करत आपल्या राजकीय विरोधकांना अराष्ट्रीय घोषित करून जनमत त्यांच्या विरोधी बनविण्याचा प्रयत्न अयोग्य असला तरी तो असफल बनविण्यासाठी राष्ट्र आणि राष्ट्रवादी याबाबतच्या आपल्या कल्पना स्पष्ट करून घेणे आवश्यक ठरते. निवडणुकांची एक फेरी नुकतीच संपली असल्याने आता कदाचित असा विचार करणे सोपे जाईल.

घरवापसी

घरवापसीचा म्हणजे मुस्लीम किंवा ख्रिश्चन अशा बिगर हिंदू समूहांचा हिंदू धर्मप्रवेश हा मुद्दा प्रत्यही कथित धर्मस्वातंत्र्याच्या स्वरूपात मांडला जातो. आपण कोणत्या धर्माचे पालन करायचे हा मुद्दा फक्त संबंधित व्यक्तीच्या राजीखुशीचा असावा, असला पाहिजे या मुद्द्याला कोणाचाच – मग तो कोणत्याही धर्माचा असो – विरोध असणार नाही. पण घरवापसीचा कार्यक्रम अशा व्यक्तिगत निर्णयाबाबत नव्हताच. सरकारी सोयी/सवलतींचे आमिष दाखवत बिगर हिंदू समूहांना हिंदू बनविण्याचा कार्यक्रम धर्मस्वातंत्र्यात कसा समाविष्ट होऊ शकतो असा प्रश्न या संदर्भात उत्पन्न होतो. शिवाय सर्व हिंदूंचा घरवापसीला पाठिंबा आहे असे गृहीत धरता येत नाही. आज भारतात जे बिगर हिंदू धर्मीय आहेत त्यापैकी कितींनी बळजबरीने धर्मांतर केले असा विचार केला, तर अशा लोकांचे प्रमाण अल्प असल्याचे आढळून येईल. उलट जातिव्यवस्थेवर आधारित हिंदू धर्मात प्रेम आणि सहानुभूती किंवा समानता या आधारावर योग्य (न्याय्य) वागणूक मिळत नसल्याने हिंदू धर्माचा त्याग करण्यास प्रवृत्त झालेल्यांची संख्या लक्षणीय आहे. ग्रामीण भागात शिक्षण आणि आरोग्य या सेवा पुरविण्याचे जे प्रयत्न ख्रिस्ती मिशनऱ्यांनी केले त्यामुळेही दुर्लक्षित समाजघटकांतील काहींनी ख्रिस्ती धर्मात प्रवेश केला असेल. या प्रयत्नांना ब्रिटिश सरकारचा (सुरुवातीच्या काळात उघड पण नंतर छुपा) पाठिंबा असला तरी ज्यांना हिंदू एकतेचा कार्यक्रम महत्त्वाचा वाटतो त्यांनी दुर्लक्षित समाजघटकांना असह्य वाटणारी परिस्थिती बदलवण्याचे प्रयत्न करण्याऐवजी आता गरीब बिगर हिंदू जनतेस (म्हणजे मुसलमान व ख्रिश्चन धर्मीयांना) विविध सरकारी सोयीसवलती यांचे आमिष किंवा सरकारी सत्तेचा धाकदपटशा दाखवून घाऊक प्रमाणात हिंदू बनविण्याच्या घरवापसीसारख्या कार्यक्रमाची आखणी करण्याचे समर्थन धर्मस्वातंत्र्य या कल्पनेच्या आधारे करता येत नाही. धर्मस्वातंत्र्याचा अर्थ धर्मास स्वातंत्र्य असा नसून नागरिकांना त्यांच्या राजीखुशीने हवा तो धर्म स्वीकरण्याचे व तो बदलण्याचेही स्वातंत्र्य असणे असा आहे. त्यामुळे सरकार पक्षाचा उघड किंवा छुपा पाठिंबा असलेला घरवापसीचा कार्यक्रम धर्मस्वातंत्र्य कल्पनेशी सुसंगत तर ठरत नाहीच, तर त्याला हरताळ फसणारा ठरतो. भूतकाळात आमिषे दाखवून किंवा धाक दाखवून हिंदू लोकांना आपल्या धर्मात ओढण्याचे प्रकार अयोग्य होते असे मानले की त्याच निकषावर घरवापसीसारखे कार्यक्रमही अयोग्यच ठरतात. त्याचा राष्ट्रवादाशी कांहीच संबंध असू शकत नाही.

गोमांस भक्षण

अनेकांना गोहत्या बंदीचा मुद्दा धार्मिक वाटेल. गोहत्या बंदीचा पुरस्कार हिंदू धर्मपंडितांनी अनेकदा केला असला तरी त्याला बहुसंख्य हिंदूंचा पाठिंबा असेलच असे खात्रीपूर्वक मानता येत नाही. हिंदुत्वाची तात्त्विक मांडणी करणाऱ्या वीर सावरकर यांचा तर गोपूजेलाही पाठिंबा नव्हता. गाय हा उपयुक्त पशू आहे, अशीच त्यांची धारणा होती. अलीकडे शासकीय पातळीवर गोहत्या बंदीचा मुद्दा शेतीसंवर्धनाच्या संदर्भात मांडला जातो. शेती आणि पशुसंवर्धन या अंगाने केलेली ही मांडणी फक्त गाय व

गोवंश यांच्यापुरतीच का मर्यादित असावी असा युक्तिवाद करता येईल. पण तो फारसा उपयुक्त नाही; कारण भाकड जनावरांचे पोषण कसे करायचे हा वास्तविक प्रश्न सर्व शेतकऱ्यांसमोर – फक्त मुसलमान शेतकऱ्यांसमोर नव्हे – असतो व त्यात गोहत्या बंदीच्या कायद्याने अडथळाच निर्माण होतो. ही बाब अलीकडेच महाराष्ट्र विधानसभेत एका भाजपा आमदाराने शेतकऱ्यांच्या समस्यांवर बोलताना नमूद केली होती हे अनेकांच्या स्मरणात असेल. गोहत्या बंदीचे कायदे अनेक राज्यांत अस्तित्वात असले तरी या कायद्यात अलीकडे केलेल्या बदलांमुळे आता गोमांस साठवणे आणि त्याची विक्री या बाबीही या कायद्याच्या कक्षेत आणल्याने या कायदयास नवी धार मिळाली असून गोमांस भक्षण हा मुद्दा वादविषय बन(व)ला आहे.

कोणी काय खावे ही बाब व्यक्तिगत आवड/निवड यावर अवलंबून असते आणि असली पाहिजे. गाय, बैल, म्हैस या पशूंचे मांस खाण्याची पद्धत मोठ्या समाजघटकांत रूढ आहे व त्यात सर्व धर्मीयांचा समावेश होतो. इतर मांस प्रकारांच्या तुलनेत या पशूंचे मांस कमी किमतीला उपलब्ध असल्याने ते भक्षण करणाऱ्यांत गरीब लोकांचा वाटा जास्त असावा यांत काहीच नवल नाही. गोमांसभक्षण करण्यास कायदयाने बंदी आल्यावर या समाजघटकांच्या आहारातील घटक मूल्यांवर होणारा अनिष्ट परिणाम हा स्वतंत्र पण महत्त्वाचा मुद्दा आहे. पण व्यक्तिस्वातंत्र्याच्या एकाच मुद्द्यावर या कायद्यावर आक्षेप घेता येतो. या संदर्भात अकबर बादशहाने ठरावीक दिवशी इतर धर्मीयांच्या भावनेचा आदर करत गोहत्या करू नये अशा आज्ञेचा हवाला दिला जातो तो गैरलागू आहे. एक तर विविध धर्मीय नागरिकांच्या भावनांचा आदर करण्यासाठी केवळ गाय/बैलच नव्हे तर सर्व पशूंच्या हत्येला आळा घालण्यासाठी ठरावीक दिवशी कत्तलखाने बंद ठेवण्याची पूर्वापार जुनी पद्धत आहे. तिचा गोमांसभक्षण बंदीशी काहीच संबंध नाही. दुसरी बाब अशी की सर्व नसले तरी हिंदू समाजाचा मोठा भाग गायीबाबत पूज्य भाव बाळगत असल्याने सार्वजनिक ठिकाणी गाय मारण्यावर निर्बंध आहेत आणि ते योग्य मानावे लागतात. सार्वजनिक ठिकाणी गाय मारण्याचा कोणी प्रयत्न केला तर अशा कृत्याचा मुख्य उद्देश सामाजिक शांतता भंग करणे हाच असल्याने त्यावर प्रतिबंधात्मक कारवाई शासनसंस्था करते आणि तशी करण्यासाठीही गोमांसभक्षण बंदीचा कायदा आवश्यक मानता येत नाही. भूतकाळात हिंदू समाज घटकांस चिथावण्यासाठी गाय मारण्याचे प्रकार झाले आहेत व स्वातंत्र्यपूर्वकाळात या प्रकारांस राज्यकर्त्यांचा छुपा अगर उघड पाठिंबा मिळाल्याचेही आढळून येईल. असे प्रकार तेव्हाही गर्हणीय होते आणि आजही ते तसेच मानावे लागतात. गोहत्येबाबतच्या नवीन कायद्याने शेती आणि पशुपालन करण्याच्या व्यापारी आर्थिक व्यवहारांवर बंधने येतात; पशूंचे मांस लोक राजीखुशीने खातात; पशूंच्या कातडीपासून विविध उपयोगी वस्तू बनवल्या जातात. या दोहोंची देशांतर्गत आणि निर्यात बाजारात मोठी उलाढाल होते. शेतीसंवर्धन किंवा पशुपालनास मदत करणे इष्ट आहे अशी शासनाची भूमिका असली व ती रास्त मानली तरी त्यासाठी गोमांस साठवणूक व विक्री या सर्व व्यवहारांवर या उद्देशाने (शेतीसंवर्धन किंवा पशुपालन) बंदी आणणे समर्थनीय ठरत नाही. हा मुद्दा धर्माशी संबंधित नाही असा शासकीय युक्तिवाद असला तरी या बंधनास अनुकूल असणारे जनमत गायीबाबत पूज्य भाव असण्यातून साकारते याबाबत मतभेद नसावेत. अलीकडेच मुंबई उच्च न्यायालयाने गोमांस साठवण्यावरील बंधने रद्द ठरवली असली आणि साठवलेले मांस गोमांसच आहे हे सिद्ध करण्याची जबाबदारी शासनाची आहे असा निर्णय दिला असला (नवीन शासनसंमत कायद्यात ही जबाबदारी साठवणूकदाराची होती.) तरी हा मुद्दा कायमचा निकालात निघाला आहे असे मानता येत नाही. महाराष्ट्र शासनातर्फे हा मुद्दा कदाचित सर्वोच्च न्यायालयासमोर आणला जाईल आणि तो निकाल राज्य सरकार विरोधात गेला तरी सरकार कायद्यात आणखी बदल करत आपला हेका चालू ठेवण्याचा प्रयत्न करण्याची शक्यता कायम राहते. या सर्व प्रकारात बहुसंख्य असलेल्या हिंदू भावनांची कदर करण्यासाठी ही बंधने आणण्याचे शासनाचे प्रयत्न रास्त ठरतात असा – केवळ बहुसंख्याकवादाच्या आधारावर बिनतोड ठरणारा – मुद्दा अध्याहृत असतो. हा मुद्दा राष्ट्रवादाच्या स्वरूपाशी निगडित असल्याने त्याचा थेट विचार करणे प्राप्त ठरते.

आधुनिक राष्ट्र आणि शासनव्यवस्था

विशिष्ट प्रदेशात राहणाऱ्या लोकांचा समुदाय म्हणजे राष्ट्र ही कल्पना अलीकडील काळातील असून तिचा संबंध

आधुनिक शासनसंस्थेच्या विकासाशी संबंधित आहे. राष्ट्रवादाबाबत जो नवा तत्त्वविचार आहे, त्यानुसार राष्ट्र म्हणजे कल्पनेतील समाज (imagined community) असे मानले जाते. विशिष्ट प्रदेशात राहणाऱ्या व एकत्र राहण्याची इच्छा असणारा समाज म्हणजे राष्ट्र. या कल्पनेला प्रत्यक्षात उतरवण्यासाठी आणि राबवण्यासाठी शासनसंस्थेची गरज असते. अशा शासनसंस्थेच्या अस्तित्वाशिवाय राष्ट्र ही कल्पना प्रत्यक्षात आणता येत नसल्याने राष्ट्रवादी विचाराची सुरुवात बहुतेक वेळा नवीन शासननिर्मिती करण्याच्या उद्दिष्टाने होताना आढळते. स्वतंत्र राष्ट्राची प्रथम कल्पना मांडली जाते व नंतरच या विचाराला सार्वत्रिक पाठिंबा मिळवण्याचे आणि तो मिळाला की स्वातंत्र्यांची चळवळ सुरू होते आणि अनेकदा त्याचे रूपांतर सशस्त्र लढ्यात झालेले आढळेल.

आधुनिक राष्ट्रवाद हा राष्ट्रशासन या स्वरूपात विकसित झाला आहे. एका विशिष्ट प्रदेशात राहणारे आणि एकत्र राहण्याची इच्छा, तयारी असणारे ही जशी एक राष्ट्रीयत्वाची भावना विकसित होण्यास आवश्यक ठरणारी बाब आहे त्याचप्रमाणे या प्रदेशावर नियंत्रण ठेवण्याचा रास्त अधिकार असणारी एक शासनयंत्रणा असणेदेखील आधुनिक काळात तेवढेच आवश्यक ठरले आहे. युरोपमध्ये शासन राष्ट्र या कल्पनेचा विकास झाला आणि दुसऱ्या महायुद्धानंतर युरोपीय देशांच्या आफ्रिका आणि आशियाई खंडातील विविध वसाहती स्वतंत्र होताना तिथे स्वतंत्र शासनव्यवस्था निर्माण झाल्या. तसे होताना त्या प्रदेशातील जनतेच्या इच्छा व आकांक्षा यांचा प्रत्येक बाबतीत विचार झाला असे नव्हे. नवीन राष्ट्राची निर्मिती होताना अमेरिका, ब्रिटन, रशिया इ. देशांच्या हितसंबंधांना प्राधान्य मिळाल्याने पुढील काळात विविध समस्या निर्माण झाल्या. या समस्यांचा विचार प्रस्तुत संदर्भात गरजेचे नाही; मात्र राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेत शासनसंस्थेच्या निर्मितीचे महत्त्व यावरून नोंदवता येईल. तसेच शासनसंस्थेची निर्मिती ही आधुनिक राष्ट्रउभारणीस एक आवश्यक बाब असली तरी फक्त तेवढे होणे पुरेसे नाही हे विसाव्या शतकाच्या अखेरीस युरोपच्या राजकीय नकाशात झालेल्या बदलांवरून स्पष्ट होते.

शासनराष्ट्र या कल्पनेचा इतिहास जवळपास दोनशे वर्षांचा मानला, तरी भूतकाळातही समूहकल्पना अस्तित्वात होत्या. कुल किंवा वंश, भाषा, धर्म, रहिवास (प्रदेश) यातील समानत्वाने रहिवाशांत सामूहिक जाणीव निर्माण होणे सहज असे आणि आहे. कुटुंबव्यवस्थेत नैसर्गिक प्रेम आणि ममता यांचे महत्त्व कमी न लेखताही ती स्थिरावण्यात कुटुंबप्रमुखाचे महत्त्व, अधिकार मान्य होणे या बाबी महत्त्वाच्या ठरतात हे मान्य होईल. कुटुंबातील व्यक्तींचे परस्परांवरील प्रेम, एकमेकांसाठी त्याग करण्याची तयारी, माता/पिता यांबाबत आदर/प्रेम असणे याबाबी राष्ट्राबाबत वापरल्या जातात हे लक्षणीय आहे. राष्ट्रप्रेम, राष्ट्रभक्ती, राष्ट्रहितासाठी सर्वस्वाचा त्याग करण्याची तयारी या सर्व गोष्टी प्रथम कुटुंबाच्या संदर्भात विकसित झाल्या. भटके जीवन जगणाऱ्या टोळ्यांतही समूहभावना निर्माण होते; पण एका टोळीतील लोकांचे नातेसंबंध असणे किंवा नंतर स्थायी जीवनाला प्रारंभ झाल्यावरही एका गावा/प्रदेशात राहणारे लोक परस्परांशी कुटुंबसंबंध किंवा टोळीसंबंध असणारे असण्याची शक्यता विचारात घेतली तर विविध प्रकारच्या समूहभावनांतील साम्य लक्षात येते. वाहतुकीची साधने मर्यादित असताना समूहभावनेचा प्रादेशिक आवाका मर्यादित असणे सहाजिक होते. राष्ट्र/राष्ट्रके किंवा तत्सम शब्द जुने असले तरी आज भारत देश या नावाने जो विस्तीर्ण प्रदेश दर्शवला जातो तो पूर्वी अभिप्रेत नव्हता. आर्यावर्त हा प्रदेश हा मुख्यत: उत्तर आणि वायव्य भारत यापुरता मर्यादित होता. धर्माने संघटित रूप धारण केल्यावर हिमालय आणि तिन्ही बाजूंनी समुद्राने वेढलेला भूभाग हा एकत्रित स्वरूपात पाहण्यास (कल्पिण्यास) सुरुवात झाली. शासनव्यवस्था मुख्यत: एक राजा आणि त्याच्या अधिपत्याखालील छोटासा प्रदेश यापुरती होती. यापैकी काही राज्यांचा विस्तार झाला आणि त्यांचे रूपांतर साम्राज्य म्हणता येईल एवढे विस्तृत बनले. दक्षिणेत तर या राज्यविस्ताराच्या मोहिमा भारताच्या सागरी सीमापार गेलेल्या आढळतात. शासनकर्त्या राजाचा धर्म तो जनतेचा धर्म ठरत असे. कालांतराने जैन आणि बुद्ध धर्म उदयाला आल्यावर राजाने विशिष्ट धर्म स्वीकारला की त्याच्या राजवटीत तो धर्म महत्त्व पावणे साहजिक बनले. राजा अशोकाने बुद्ध धर्म स्वीकारल्यावर बुद्ध धर्म अधिक प्रभावशाली बनला. पण ही राजवट संपल्यानंतर बुद्ध धर्म प्रभाव कमकुवत झाला. बुद्ध धर्म अधिक संघटित होता आणि या धर्माचा प्रसार काही काळ भारतव्यापी बनला

होता. पुढे भारतात बुद्ध धर्माचा प्रभाव कमी झाला तरी इतर देशांत त्याचा परिणाम कायमस्वरूपी ठरला.

बुद्धमताचा प्रतिवाद करताना हिंदू धर्मही अधिक संघटित झाला. भारताच्या चार दिशेला मठ स्थापना होण्यातून त्याचा विशाल प्रादेशिक विस्तार अधोरेखित झाला. शासनव्यवस्था विविध स्थानिक राजांची असली तरी तात्त्विक पातळीवर समान दैवते, रामायण, महाभारत असे धर्मग्रंथ आणि तीर्थस्थाने हा समूहजीवनाचा एक आविष्कार ठरला. जैन, बुद्ध, चार्वाक अशी भिन्न मते/पंथ पारंपरिक-सनातन-धर्मापेक्षा निराळी असली तरी इस्लाम आणि ख्रिस्तीधर्माचा संपर्क आल्यानंतर एत्तदेशीय धर्म अधिक ठळक स्वरूपात समाजमनात प्रविष्ट झाला असावा. पण विसाव्या शतकात निर्माण झालेला 'हिंदुत्व' विचार हा मुख्यत: राजकीय विचार आहे. या विचारसरणीने अखिल भाराताला एकत्र ठेवणारा एक घटक असे हिंदू धर्माचे स्वरूप मांडले असले असले तरी तो भूतकाळाचा वर्तमानसंदर्भात घेतलेला शोध होता. व्यक्तिगत जीवनात धर्म महत्त्वाचा असला तरी सामूहिक स्तरावर त्याचा फार परिणाम होता असे दिसत नाही. मुसलमान राजांच्या सेवेत हिंदू सरदार आणि हिंदू राजांच्या पदरी मुसलमान अधिकारी असणे ही बाब सामान्य होती हे वेगळे नमूद करण्याची गरज नाही. राजनिष्ठा ही विविक्षित राजा किंवा राजवंश यांच्या संदर्भात होती; त्याचा धर्माशी फारसा थेट संबंध नसे. राजा आणि प्रजा यांचा धर्म समान असला तरी राजाशी गद्दारी शक्य असे व तशी होतही असे.

धर्मनिष्ठा ही स्वतंत्र कल्पना परधर्मीय राजवटींच्या संदर्भात अधिक विकसित झाली असेल पण धर्मनिष्ठेचे स्वरूप मुख्यत: वैयक्तिक आचरणाच्या संदर्भात उत्पन्न होई. वर्णाश्रमयुक्त धर्मव्यवस्थेत धर्मनिष्ठा म्हणजे व्यक्तीचे आचरण. धर्मनिष्ठा मुख्यत: धर्मशास्त्रप्रणीतनिहित कर्तव्ये पाळण्याच्या संदर्भात उत्पन्न होई. देवपूजा, धार्मिक कृत्ये इ. बाबींचा जसा यात समावेश होई, त्याचप्रमाणे जातिव्यवस्थेच्या उतरंडीत जे कर्म आपल्या वाट्यास आले त्याचे पालन करणे हादेखील धर्मनिष्ठेचाच भाग बनला होता.

धर्मनिष्ठा आणि राजनिष्ठा यांत विरोध निर्माण होण्याचा प्रसंग शक्यतो टाळणे हे चांगल्या राजव्यवहाराचे महत्त्वाचे लक्षण होते. आपली राजवट स्थिर आणि टिकाऊ ठरायची असेल तर रयतेच्या धर्मव्यवहारांत दखल न देण्याचे धोरण बव्हंशी पाळले गेले असे म्हणता येते. कडवे मुस्लीम धर्मनेते मुस्लीम सत्ताधीश असलेल्या राजवटींबाबत समाधानी नव्हते. कारण त्यांच्या मते कित्येक वर्षे राज्य करूनही इस्लामचा प्रसार पुरेसा वेग धारण करत नव्हता आणि इस्लामचा प्रसार हेच प्रधान ध्येय मानणारे मुल्ला-मौलवी शासनसंस्थेने मुस्लिमेतर प्रजेबाबत सहिष्णुतता न दाखवता राज्यव्यवहार इस्लामी तत्त्वानुसार चालला पाहिजे असा दबाव आणत असत. अगदी औरंगजेबाच्या कारकिर्दीचा विचार केला तरी राजा जयसिंग आणि इतर राजपूत मानकरी त्याच्या युद्धमोहिमांत सामील होत यावरून औरंगजेबाचे इस्लामचा प्रसार करण्याचे धोरण हिंदू शासनकर्त्या वर्गास आपल्या धर्मनिष्ठेशी विरोधी वाटत नव्हते किंवा ते राजनिष्ठेच्या आडही येत नसे असे मानता येते.

इस्लामचा उपदेश सर्व जगासाठी उपयुक्त असल्याने या तत्त्वांचा सर्व जगभर प्रसार करणे हे या धर्माच्या सर्व अनुयायांचे कर्तव्य मानले गेले. त्यामुळे निदान तात्विक पातळीवर हा धर्म प्रादेशिकतेशी संबंध असलेल्या राष्ट्रवादाच्या चौकटीत सामावला जाणे कठीण होते. हे फक्त इस्लामबाबत खरे नसून सर्व संघटित धर्मांबाबतही लागू ठरते. सैद्धान्तिक भूमिका काहीही असली तरी व्यवहारात राजसत्तेचा प्रभाव/मर्यादा टाळणे धर्माधिकाऱ्यांना शक्य होत नाही. आणि धर्मप्रसारकांचे प्रयत्न धर्म हा एकमेव घटक लोकांच्या स्वत:कडे पाहण्याचा त्यांच्या अस्मितेचा एकमेव घटक ठरावा अशी प्रबळ इच्छा असली तरी प्रदेश, भाषा, जात किंवा वंश या कल्पना धर्माच्या बरोबरीने किंवा त्यांच्या चढाओढीत मानवी मनावर परिणाम करतात. ब्रिटिश राजवटीला प्रारंभ झाल्यावर मुस्लीम सत्तेचा प्रभाव कमी होत जाऊन ख्रिस्ती राजवटीस सुरुवात झाली असे कांहीना वाटले. तर परकीय सत्तेच्या विरोधात आपसांतील धर्मभेद विसरून सर्व एत्तदेशीयांनी एकत्र आले पाहिजे या पुकाऱ्यातून धर्म भिन्न असले तरी वतन, देश याविषयीचे समान प्रेम हा धागा महत्त्वाचा मानला गेला. कुटुंब, टोळी, वंश या अंगाने विकसित होणारी समूहभावना नंतरच्या काळात कधी समान देव/धर्म मानणारे लोक, मग ते कोणत्याही प्रदेशाचे रहिवासी असोत – या रीतीने विकसित झाली तर कधी एका प्रदेशात राहणारे, तिथले अन्न, पाणी

वापरणारे समान मातृभूमी असणारे जणू एका मातेची लेकरे असलेले लोक – मग ते कोणत्याही धर्मपंथाचे असोत त्यांच्या बोली/भाषा भिन्न असल्या तरी – या पद्धतीने.

राष्ट्रवादी विचाराचा आधार भाषा, प्रदेश किंवा धर्म असा कोणताही असला, तरी ते मुख्यत: राजकीय तत्त्वज्ञान असते. विशिष्ट कार्यक्रमासाठी लोकमत संघटित करणे, मग लोकांना एकत्र आणण्यासाठी समान भाषा किंवा धर्म या घटकांचा आधार घेतला तरी किंवा एका विशिष्ट प्रदेशात राहणाऱ्या लोकांचा समान भूगोल हा एकत्रीकरणाचा आधार मानला, तरी या सर्व प्रकल्पांचा उद्देश नवीन शासन निर्माण करणे किंवा अस्तित्वात असलेल्या शासनसंस्थेवर प्रभाव गाजवणे हा असतो. जुन्या काळी विविध देशांत शासनसंस्थेचा नैतिक अधिकार या शासनास देवाचा/धर्माचा पाठिंबा आहे यातून सिद्ध होई. पण आधुनिक काळात हा आधार पुरेसा नव्हता. तसा तो न वाटणे ही आधुनिकतेची सुरुवात मानली पाहिजे.

ब्रिटिश अमलात हा आधार शोधण्याचे प्रयत्न झाले. दादाभाई नवरोजींनी सामान्य जनतेच्या दारिद्र्याचा संबंध ब्रिटिश राजवटीशी जोडत राष्ट्रवादी विचारास भौतिक/आर्थिक परिमाण पुरविले, तर फुले, आगरकर यांनी त्याला सामाजिक सुधारणांची जोड दिली. त्यातून जात, धर्म, भाषा किंवा लिंग यातील भेद विचारात न घेता प्रत्येक व्यक्तीला सर्वांगीण विकासाची संधी मिळाली पाहिजे. असा समाज निर्माण करणे हाच स्वराज्याचा पाया असला पाहिजे हा विचार पुढे आला. अशा नवसमाज निर्मितीच्या कल्पनेच्या विकासात फ्रेंच, अमेरिकन आणि रशियन क्रांतीला प्रेरणा देणाऱ्या विचारांचा प्रभाव पडला यांत नवल नाही. याबरोबरच ब्रिटिश राजवटीविरोधात जनमत संघटित करण्यासाठी कथित देदीप्यवान भूतकाळाचा आधार घेणाऱ्या हिंदू संघटनांवर भर देणारी सत्ताधारी हिंदुत्ववादी विचारधारा जशी निर्माण झाली, त्याचप्रमाणे मुस्लीम राजवट समाप्त करून ब्रिटिश अंमल सुरू झाल्याने सत्ताधारी राजवटीपूर्वी मुस्लीम राजवट असल्याने मुसलमान समाजाचे सत्ताधीशत्व कायम कसे राहील ही मुस्लीम उच्चवर्गीयांची समस्या मुस्लीम लीगच्या राजकारणातून आविष्कृत झाली. हिंदू आणि मुस्लीम या जनसमूहांची एकी होऊ नये असेच ब्रिटिश राज्यकर्त्यांचे प्रयत्न असत. यातून मुस्लीम बहुसंख्या असलेल्या प्रदेशाचे निराळे राष्ट्र अस्तित्वात येऊन भारताची फाळणी झाल्यावर उर्वरित देशात हिंदू बहुसंख्या असल्याने ते हिंदू राष्ट्र असले पाहिजे असा काहींचा विचार असला तरी १९५० साली स्वीकृत भारतीय संविधानाने स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांवर आधारित प्रौढ मतदानावर आधारित व्यवस्था स्वीकारली आणि आधुनिक भारतीय राष्ट्रीयत्वाचा पाया रचला. या लोकशाहीपद्धतीत बहुसंख्येच्या आधारे निर्णय व्हावेत असे अभिप्रेत असले, तरी धर्माच्या आधारे बहुसंख्याक आणि अल्पसंख्याक अशी कायम विभागणी कल्पिणे ही बाब भारतीय संविधानाशी प्रतारणा करणारी ठरते हे विसरता येत नाही. भारतासारख्या वैविध्यपूर्ण समाजस्थितीत अल्पसंख्यत्व आणि बहुसंख्यत्व अनेक प्रकारे प्रकट होत असल्याने विविध स्थितीत धर्म किंवा भाषा याआधारे विविध गट अल्पसंख्य/बहुसंख्य ठरत असल्याने व्यक्ती विकासाची समानसंधी ही बाब आधुनिक भारतीय राष्ट्रवादाच्या केंद्रस्थानी असली पाहिजे. व्यक्तीचे हक्क, तिचे स्वातंत्र्य, तिच्या विकास शक्यता वाढवणे ही बाब राष्ट्रवादी विचारास मध्यवर्ती असली पाहिजे. अशी व्यवस्था सर्व लोकांना आपली वाटून गरज पडली तर तिच्या रक्षणासाठी एकत्र येतील.

बहुसंख्याकवाद आणि राष्ट्रवाद

भारतात हिंदूंची बहुसंख्या असल्याने या संख्याधिक्याच्या आधारे सत्ता मिळवण्याचा प्रयत्न करण्यात काय वावगे आहे? हा प्रश्न नव्याने उत्पन्न करण्याचे प्रयत्न चालू आहेत. घरवापसी, गोपालन, गोमांसभक्षण विरोध हे व यासारखे सर्व कार्यक्रम अशा बहुसंख्याकवादाच्या पुरस्काराचे विविध प्रकार आहेत. आधुनिक राष्ट्रवादाची भारतीय संविधानांतर्गत व्यवस्था जनमानसात अद्याप पुरेशी रुजली नसल्याने कुटुंब, वंश अगर धर्म या संकल्पनावर आधारित समूहकल्पनांचा नव्याने 'शोध' लावण्याचे प्रयत्न यातून दिसतात. भारतमाता, राष्ट्रधर्म, राष्ट्रभक्ती अगर राष्ट्रप्रेम या कल्पनांत माता, धर्म, भक्ती आणि प्रेम या कल्पनांचा आधुनिक राष्ट्राच्या संदर्भात कसा आविष्कार व्हावा हे सुस्पष्ट नाही. राष्ट्रवादाचा प्रखर आविष्कार बहुधा एखाद्या बाह्य शत्रुघटकाच्या संदर्भात होतो व तसा होणे सहज, आणि सोपे असते. हा बाह्य शत्रू निश्चित असला म्हणजे या शत्रूचा नायनाट करण्यासाठी कोणताही त्याग करण्यास तयार असणे, प्रसंगी जीव देण्यास आणि गरज असेल

तर जीव घेण्यास तयार असणे ही राष्ट्रप्रेम व राष्ट्रभक्ती यांची चरमसीमा मानता येते. पण तसे बाह्य शत्रू नसतील, तर राष्ट्रप्रेम व राष्ट्रभक्ती कशाला समजायचे ही सोपी बाब नाही. कुटुंबातील व्यक्तींचे परस्परांवर सामान्यत: प्रेम असते; कुटुंबासाठी स्वार्थत्याग करण्यास बहुतेक लोक तयार असतात त्यामुळे राष्ट्राच्या संदर्भात राष्ट्रला आईची उपमा देणे किंवा देशाला मातृभूमी किंवा पितृभूमी असे संबोधत व्यक्तिगत हिताच्या पलीकडे विचार करण्यासाठी लोकांना प्रवृत्त करताना भूतकाळात उपयोगी ठरले असले तरी आज त्याचा वर्तमान संदर्भ काय हा प्रश्न महत्त्वाचा आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात जवाहरलाल नेहरू भारतमाता की जय ही घोषणा देणाऱ्या त्यांच्या श्रोत्यांना भारतमाता कोण असा प्रश्न विचारून भारतमाता म्हणजे भारतातील सामान्य जनता – जी अज्ञानी, गरीब आणि असहाय आहे, या जनतेचा जय व्हायचा असेल तर ती सज्ञानी, सक्षम झाली पाहिजे असा विचार मांडत असत. आताही भारतमाता हा शब्द उच्चारल्यावर बहुतेकांसमोर सालंकृत मुकुटधारी किंवा सशस्त्र मुकुटधारी देवतेची प्रतिमा येत असेल तर आणि त्यामुळे ती वंदनीय समजली जात असेल तर राष्ट्र या कल्पनेबाबतची आपली समजूत अजूनही प्राथमिक अवस्थेत आहे असेच म्हणावे लागेल. एवढेच नव्हे तर 'भारतमाता की जय' असे म्हणण्यास जे विरोध दर्शवितात त्यांची समजूत अशाच प्राथमिक स्वरूपाची राहिल्याने भारतमातेचा जयजयकार करणे हा मूर्तिपूजेचाच एक प्रकार असे वाटल्याने कदाचित त्यामुळे त्यांना तो त्याज्य वाटत असावा. ब्रिटिश साम्राज्याच्या विरोधी लोकसंघटन करताना बंगालमध्ये भारतमाता या प्रतिमेचा वापर होऊ लागला. 'आनंदमठ' या कादंबरीत वंदे मातरम या गीतातील मातेचा संदर्भ देवतास्वरूप आहे. १९०५ मध्ये झालेल्या बंग-भंगविरोधी आंदोलनात बंगमाता/ भारतमाता हे प्रतीक वापरले गेले. यांत माता मुख्यत: देवीरूपात कल्पिली असली तरी त्याला अपवादही होतेच.

पण केवळ जवाहरलाल नेहरूच नव्हे, तर अवनीन्द्रनाथ ठाकूर यांच्या कल्पनेतील भारतमाताही देवीसमान स्त्रीची नव्हती; त्यांनी रंगवलेल्या चित्रात भारतमाता भगवी वस्त्रे धारण केलेली बंगालमधील बाउल प्रकारची सामान्य स्त्री आहे. तिच्या चार हातात शस्त्रास्त्रे नाहीत तर, एका हातात शेतातील पीक, दुसऱ्या हातात हातमागावरील शुभ्र वस्त्राची घडी, तिसऱ्या हातात पुस्तक/पोथी आणि चौथ्या हातात जपमाळ आहे. तिचे देवत्व दर्शवणारी प्रभा (वलय) सोडली, तर ती सामान्य स्त्रीच्या रूपात आहे. तिच्या हातातील पीक आणि कापड यावरून तिचे कष्टकरी वास्तविक रूप दिसते तर पुस्तक आणि जपमाळ यातून ज्ञान आणि अथक प्रयत्न हे भविष्यातील आदर्श रूप दाखविले असावे.

ब्रिटिश राजवटीविरुद्ध जनतेला एकत्रित आणताना लोकांसमोर राष्ट्र ही अमूर्त संकल्पना मांडताना भारतमाता या किंवा राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत अशा प्रतीकांचा वापर होणे सहज मानले, तरी वर्तमानकाळात या प्रतीकांबाबत आदर दर्शवणे ही केवळ राष्ट्रप्रेमाचीच नव्हे तर नागरिकत्वाची कसोटी आहे असे मानणे हा बहुसंख्याकवादाचा प्रच्छन्न पुरस्कार मानावा लागतो. भारतमाता की जय असा घोष करण्यास नकार देणाऱ्याना भारतात राहण्याचा अधिकार नाही; त्यांनी पाकिस्तानात चालते व्हावे. भविष्यांत शिक्षणक्रमासाठी प्रवेश घेताना प्रवेशेच्छुकांना त्यांच्या अर्जावर भारतमाता की जय असे लिहावे लागेल ही व अशी विधाने राज्याचे मुख्यमंत्री आणि सत्ताधारी पक्षाचे ज्येष्ठ नेते करतात, तेव्हा ही बाब अधिकच गंभीर बनते. भारतीय जनता पक्षाचे सरकार केंद्रस्थानी सत्तारूढ झाल्यानंतर भारतात हिंदूंना विशेषाधिकार असावेत अशी इच्छा असणाऱ्या लोकांचा आवाज बुलंद झाला असला, तरी हा विचार भारतीय संविधानाच्या विरोधी जातो ही बाब निवडणूक जिंकल्यावर संसदभवनात प्रवेश करताना या इमारतीच्या पायरीवर नतमस्तक झालेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या ज्येष्ठ पक्ष सहकाऱ्यांच्या निदर्शनास आणणे जरूरीचे ठरते.

भारतात हिंदूंना विशेषाधिकार असावेत या कल्पनेला संवैधानिक आधार नाही. कारण संविधान हिंदू (किंवा मुसलमान) अशा कोणत्या गटास मान्यता देत नाही. या व्यवस्थेत भारतीय नागरिकांचे अधिकार, जे सर्व नागरिकांना समान आहेत, मान्य केले आहेत. फक्त काही विशिष्ट जाती आणि जमातींचे (SC आणि ST), त्यांच्या ऐतिहासिक मागासलेपणाच्या संदर्भात गट नमूद केले आहेत. केवळ या गटाच्या सभासदांना, केवळ त्यांचे मागासलेपण जलद गतीने दूर करण्याच्या उद्देशाने

निवडणुकांत, सरकारी नोकरीत आणि शिक्षणप्रवेशांत राखीव जागांची तरतूद केली आहे. शिवाय राज्यस्तरावर भाषिक अल्पसंख्य गटाना शिक्षणसंस्था स्थापन करणे आणि चालवणे यासाठी विशेष तरतुदी केल्या आहेत. १९८० नंतर नोकरी आणि शिक्षणसंस्था प्रवेश याबाबत राखीव जागांच्या धोरणाचा विस्तार करून त्यात इतर मागासवर्गीय गटाचा समावेश करण्यात आला. या गटाची व्याख्या आणि मोजणी करण्याचे काम राज्य स्तरावर विशिष्ठ प्रशासकीय यंत्रणेमार्फत करण्यात येते. याच आधारावर स्त्रियांना समान हक्क आणि अधिकार मिळण्याबाबत स्त्री हा गट विशिष्ट संदर्भात विचारात घेतला जातो. हे सर्व गट आणि त्यांचे विशिष्ट स्थान सर्व नागरिकांचे स्थान समानतेच्या स्तरावर यावे यासाठी केलेल्या उपाययोजनांच्या संदर्भात विचारात घ्यावे लागते. या सर्व गटात हिंदू धर्मीयांची संख्या किती आहे ही बाब (त्यांची संख्या बहुसंख्य वा लक्षणीय असली तरी) गौण ठरते.

फक्त विवाह, घटस्फोट आणि वारसाधिकार याबाबतचे निराळे कायदे भिन्न धर्मीयांसाठी अस्तित्वात आहेत. पण सर्व नागरिकांना समान नागरी कायदा अस्तित्वात आणणे हे मार्गदर्शक तत्त्व घटनेत समाविष्ट केले आहे. या तत्वाची अंमलबजावणी अद्याप झालेली नाही ही बाब निराशाजनक आहे असे मान्य केले तरी त्याधारे हिंदू बहुसंख्याकवादाचे समर्थन होऊ शकणार नाही. वंश, धर्म, जात, प्रदेश वा लिंग या सर्व भेदांचा विचार न करता सर्व नागरिकांना समान अधिकार मिळून त्यांच्या आर्थिक आणि सामाजिक प्रगतीचा मार्ग खुला राहील अशी समाजरचना निर्माण करण्याचे उद्दिष्ट हिंदू बहुसंख्याकवादातून साध्य होऊ शकत नाही.

हिंदू बहुसंख्याकवादाचा जे पुरस्कार करतात ते भाजपाप्रणीत विविध गट ही धार्मिक कल्पना नाही असे प्रतिपादन करत असतात. हिंदुत्व ही राजकीय कल्पना आहे हे स्पष्टच आहे कारण हिंदुत्वाचा पुरस्कार करण्यामागे जनतेला मोक्षप्राप्ती किंवा हिंदू धर्मग्रंथप्रणीत तत्सम उद्दिष्ट प्राप्त व्हावे असा उद्देश आहे असे कोणीच मानत नाही. पण अजूनही धार्मिक मनोवृत्तीच्या असलेल्या जनतेच्या भावनेला हात घालण्यासाठी भारतमाता, राम मंदिर यासारखी प्रतीके वापरली जातात. यावरून राजकीय उद्दिष्टासाठी धर्म किंवा धर्मसादृश्य कल्पना आणि कार्यक्रम (उदा. घरवापसी, गोमांस भक्षणबंदी) यांचा जाणीवपूर्वक वापर होण्यातून राजकीय हिंदुत्वाची रणनीती स्पष्ट होते. याचे समर्थन अनेकदा सांस्कृतिक राष्ट्रवाद अशा पद्धतीने करण्यात येते.

पण सांस्कृतिक स्तरावर विचार केला तर भारतात हिंदू संस्कृती अशी भारतव्यापी एकजिनसी बाब आढळत नाही. संस्कृतीच्या बहुआयामी कल्पनेत धर्माचा एक धागा असला तरी त्याला भाषा, प्रदेश ही तेवढीच महत्त्वाची परिमाणे असल्याने भारतीय संस्कृतीचा आविष्कार भिन्न प्रदेशातील भिन्न समुदायांत भिन्न प्रकारे होतो. बहुविविधता हे भारतीय समाजाचे आणि संस्कृतीचे मुख्य वैशिष्ट्य आहे. ते मान्य केले, तर राजकीयदृष्ट्या सोईची ठरणारी बहुसंख्य आणि अल्पसंख्य अशी सरळसोट विभागणी करता येत नाही. महाराष्ट्रासारख्या एका राज्याचा विचार केला तरी त्यात कोकण, मराठवाडा, विदर्भ असे भिन्न सांस्कृतिक थर आढळतात. भाषिक पातळीवर जे सांस्कृतिक निराळेपण आहे आणि ज्या अस्मितेचा हुंकार सर्वत्र उमटत होता तिचा अखिल भारतीय राष्ट्रवादाच्या विकासाला पूरक ठरेल अशा पद्धतीने आविष्कार होण्यासाठी एक भाषिक राज्ये निर्माण झाली. आणि आता एक भाषिक प्रदेशातील प्रादेशिक अस्मिता महत्त्वाच्या ठरत असल्याने याच आधारावर आता एक भाषिक राज्यांची विभागणी होताना आढळते. या पद्धतीने एक राष्ट्रीयत्वाच्या भावनेस विसंगत न ठरता विविध अस्मितांचा आविष्कारास वाव दिला जातो. प्रदेश, भाषा ही जशी अस्मितांची परिमाणे आहेत, तसेच धर्म हे एक निराळे परिमाण आहे आणि त्याचा रास्त आविष्कार एक राष्ट्रीयत्वाच्या भावनेशी विसंगत ठरेल असे मानण्याचे काही कारण नाही. रास्त आविष्कार म्हणजे जो इतर अस्मिता किंवा गट यांच्या विरोधावर आधारलेला नसेल.

लोकांच्या धार्मिक समजुती आणि परंपरा यांच्याबाबतचे प्रेम व श्रद्धा यांचा उपयोग करण्यासाठी राजकीय हिंदुत्वाच्या कार्यक्रमात धर्मसादृश्य कल्पना आणि प्रतीके यांचा खुबीने वापर करण्यात येतो. उदा. भारतमाता, गोरक्षण, धर्मस्वातंत्र्य किंवा समान नागरी कायदा. हे धर्मसादृश्य कार्यक्रम निधार्मिक पद्धतीने मांडण्याचा प्रयत्न केला जातो. उदा. गोरक्षणाचा कार्यक्रम शेती विकासाशी जोडला जातो आणि समान नागरी कायद्याचा कार्यक्रम मुस्लीम महिलांच्या अधिकारांच्या संदर्भात मांडला जातो.

या सादरीकरणाला पद्धतीच्या पातळीवर विरोध असण्याचे कारण नाही. पण शेतीसंवर्धनाच्या अनेक परी आहेत आणि गोहत्याबंदीला शेतीव्यवस्थेवर भाकड जनावरांचा भार सहन होणार नाही या भूमिकेतून अनेकांनी विरोध केला आहे. असे असताना गोहत्याबंदीसाठी कायदयाची मदत घेण्याचे समर्थन होऊ शकत नाही. ऐच्छिक पद्धतीने गोरक्षणाचा प्रसार कोणालाही करता येईल करता आला पाहिजे. गोहत्या बंदीचा शेतीव्यवस्थेवर सुपरिणाम होईल हे निर्विवादपणे मानता येत नसताना त्याच्या अंमलबजावणीस कायद्याचा आधार देण्याचे समर्थन फक्त बहुसंख्येचा पाठिंबा किंवा बहुसंख्य जनतेच्या भावनांचा आदर अशा युक्तिवादावरच होऊ शकते. अशा युक्तिवादाचा उघड किंवा छुप्या पद्धतीने वापर केला जातो. खरोखर बहुसंख्य जनतेचा (किंवा बहुसंख्य हिंदू जनतेचाही) गोहत्या बंदीला किंवा गाय/बैल यांचे मांस खाण्यावर बंधने घालण्यास पाठिंबा मिळेलच असे मानता येणार नाही. प्राचीन काळात हिंदू गोमांस खात नव्हते, हे प्राचीन वाङ्मयाच्या आधारे सिद्ध करण्यातही अडचणी येत असल्याने शेवटी बहुसंख्याक जनतेच्या भावनांचा आदर ही भूमिका घेण्यात येते, जी मुखत्वे राजकीय स्वरूपाची ठरते. आणि बहुसंख्य जनतेला गोहत्या बंदीचे शेतीवरील संभाव्य दुष्परिणाम किंवा प्राचीन धर्मग्रंथात गोहत्येबाबत किंवा गोमांस भक्षणाबाबत काय भूमिका घेतली आहे याबाबत पुरेशी माहिती नसल्याने बहुसंख्याक जनतेच्या भावनांचा आदर ही भूमिका सामान्य हिंदू जनतेस समर्थनीय वाटू शकते. किंवा या आधारावरच अशी भूमिका घेतली जात असावी. 'भारतमाता की जय' ही घोषणा देण्याचा मुद्दा ज्या पद्धतीने पुढे रेटला गेला, त्यावरून राष्ट्रप्रेमाचे एक प्रतीक असलेली ही घोषणा राष्ट्रप्रेमाची नव्हे, राष्ट्रनिष्ठेची एकमेव आवश्यक कसोटी ठरवण्यातून राष्ट्रवादी विचारांचा प्रसार होण्याऐवजी मुस्लीम समूहाच्या राष्ट्रप्रेमावर प्रश्नचिन्ह निर्माण केले जाते. समान नागरी कायद्याचा मुद्दाही यांच पद्धतीने मुस्लीम विशेषाधिकार रद्द करण्याच्या संदर्भात मांडला जातो. पण या कायद्याला विविध लोकसमूहांचा पाठिंबा मिळवण्याचा प्रयत्न झालेला दिसत नाही. मुस्लीम व्यक्तिगत कायद्यात सुधारणा करून मुस्लीम स्त्रियांचे हक्क प्रस्थापित करता येतील ही शक्यता नेहमीच दुर्लक्षित राहिली आहे. समान नागरी कायद्याचा मुद्दा आज वर दुर्लक्षित राहिला आहे, पण तो केवळ न्यायालयांना सोडविता येणार नाही. राजकीय स्तरावर या लोकजागृती किंवा लोकसंघटन झाले तर ते हा प्रश्न सोडवण्यास उपयुक्त ठरेल. पण राष्ट्रवादाच्या संदर्भात हा मुद्दा निर्माण झाला की तो मुस्लीम विरोधाचे प्रतीक बनतो.

राष्ट्रवाद बव्हंशी बाह्य शत्रूच्या संदर्भात लोकांत एकजूट निर्माण करण्यास उपयुक्त ठरतो. एक भाषा, एक ध्वज ही प्रतीके उपयुक्त ठरतात. पण असे बाह्य शत्रू नसतील तर राष्ट्रवादी भावना काहीशा मंदावतात. बाह्य शत्रूंच्या अभावी राष्ट्रवादी भावना चेतावणे सोपे नसते. बाह्य शत्रू नसले की अंतर्गत सुधारणा, किंवा बदल घडवून आणण्यास आविष्कार मुख्यत: लोकशिक्षणाच्या स्वरूपात उपयुक्त होऊ शकतो. पण राष्ट्रवादाचा असा आविष्कार फारसा शौर्यरसपूर्ण, भावना उद्युक्त करणारा असू शकत नाही. पण बाह्य शत्रू निर्माण केले की ही अडचण येत नाही. राजकीय हिंदुत्ववादी कार्यक्रम मुसलमान आणि ख्रिश्चन यांना बाह्य शत्रुत्व बहाल करून लोक जागृती किंवा लोकसंघटन करण्याचा प्रयत्न करण्याचा असतो. त्यामागे मुख्यत: निवडणुकांत बहुमताचा पाठिंबा मिळवणे हा उद्देश असतो. त्यामुळे कल्पित बाह्य शत्रूच्या संदर्भात समाजात धर्माच्या नावे फूट पाडण्याचा प्रयत्न केला जातो. इतर धर्मीयांचा द्वेष करवण्याचा हा कार्यक्रम यशस्वी झाला तर निवडणुकांत यश मिळते. जात्याच सर्व अल्पसंख्य गट त्यांच्या अस्मितेबाबत जास्त जागरूक व अतिसंवेदनशील असतात. त्या मानाने बहुसंख्य आपल्या अस्मितेबाबत फारसे जागरूक असत नाहीत. त्यामुळे 'आपला' धर्म संघटित बनविण्याचा 'त्यांच्या'सारखा बनण्याचा कार्यक्रम बनवला जातो. एका देशाच्या नागरिकांत भेदभाव निर्माण करण्याचा असा कार्यक्रम भारतीय घटनेतील नागरिकत्व आणि राष्ट्रकल्पनेशी फारकत घेणारे आहे. त्याला भारतीय राष्ट्रवाद म्हणता येत नाही आणि अशा कथित राष्ट्रवादाचा पुरस्कार करणाऱ्यांना राष्ट्रवादीही म्हणता येणार नाही. त्यांनी 'भारतमाता की जय' ही घोषणा दिली तरीही.

भारतात जनमताच्या पाठिंब्यावर निवडून आलेले सरकार सत्तास्थानी असताना राष्ट्रवादी कोण आहे हे सिद्ध करण्याची गरज नाही. आणि घोषणा देणे किंवा राष्ट्रीय प्रतिमांचा आदर करणे यातूनच राष्ट्रप्रेम सिद्ध होते असे

(पान ४५ वर)

शिक्षणाचे प्र.जा.तंत्र

जयदेव डोळे

उघड आहे, नवे केंद्रीय शिक्षणमंत्री प्रकाश जावडेकर यांच्या नावाच्या आद्याक्षरांवर केलेली ही कोटी आहे. त्यांनी इ-राणी यांच्याकडून खाते घेतल्यानंतर संघाला शिक्षणात काय अपेक्षित आहे हे स्पष्टपणे सांगून टाकले. त्यामुळे देशाचे शिक्षण मनु'स्मृती'कडून प्र.जा.सत्ताकाकडे पाठवून आणि मुळात ते कसे बदलून टाकता येईल, त्याची वाटा-वळणे संघ ठरवतो आहे. जणू इराणीबाईंकरवी आराखडा करवून घेतला, त्याची अंमलबजावणी जावडेकरांकरवी होणार! जावडेकर पुणे पदवीधर मतदारसंघामधून विधानपरिषदेवर निवडून गेले होते. त्यावेळी त्यांनी शिक्षण, शैक्षणिक तत्त्वज्ञान, ज्ञानाची प्रक्रिया, पौर्वात्य-पाश्चात्त्य शिक्षण असे काही वैचारिक मंथन केल्याचे आठवत नाही. त्यांनाही आपण देशाचे शिक्षणमंत्री होऊ याची कल्पना नव्हती. पण देशाचा प्रधानमंत्री जरी कोणी झाला, तरी तो प्रथम स्वयंसेवक असतो आणि संघाची शिकवण प्रकटत राहतो, हे आपण रोज ऐकतो, वाचतोच. तसे जावडेकर काय म्हणाले ते प्रथम पाहू: ''नवी दिल्ली, जुलै १२ : मानवी संसाधन विकासमंत्री प्रकाश जावडेकर यांनी आज त्यांच्या ९२ वर्षांच्या प्राथमिक शिक्षिका आईचा उल्लेख करीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला अभिप्रेत असलेल्या शिक्षककेंद्री शिक्षणाची पुष्टी केली. शिक्षण शिक्षककेंद्री असावे असे (मुकुल) कानिटकरजी जे म्हणाले, ते मला मान्य आहे. पाठ्यपुस्तके शिकवणे हे काही शिकवणे नाही. मानवी मूल्यांचा प्रसार करणे खरे शिक्षण असे त्यांनी 'भारत नीती' आणि 'भारतीय शिक्षण मंडळ' या संघप्रणीत संस्थांनी आयोजित केलेल्या चर्चासत्रात सांगितले. तत्पूर्वी 'भाशिमं'चे संघटन सचिव कानिटकर यांनी शिक्षककेंद्री व्यवस्थेचा आग्रह धरला होता. ते म्हणाले होते की प्राचीन काळी आचार्य थेट शिकवत नसत, तर शिक्षणाचे एक वातावरण तयार करीत.''

ईमेल : djaidev1957@gmail.com

''एक शिक्षकतज्ज्ञ म्हणाले, मंत्रिमहोदयांचे भाष्य विद्यमान विद्यार्थी व पाठ्यपुस्तकआधारित व्यवस्थेला निरोप देणारे वाटते. मंत्र्यांना गुरुकुल पद्धती म्हणावयाची असावी. तीत विद्यार्थ्यांचे अध्ययन व भवितव्य यांबाबत शिक्षक जबाबदार असे.'' प्रोफेसर रामजनम शर्मा हे एन.सी.ई.आर.टी.त भाषाविभागाचे प्रमुख असून ते म्हणतात की, प्रचलित व्यवस्थेत शिक्षक व पाठ्यपुस्तके मुलांच्या शिक्षणातील सौकर्यकर्ते (फॅसिलिटेटर) आहेत.'' (ओपन एंडेड जावडेकर इन गुरुकुल कॉलेज, बसंतकुमार मोहांती, द टेलिग्राफ, कलकत्ता, १३ जुलै २०१६.)

मात्र भाषणात जावेडकरांनी नव्या शैक्षणिक धोरणासंदर्भात अन्य विचारांची बाजूही ऐकून घेणार असल्याचा हवाला दिला होता. त्यांनी तिथे एक किस्सा सांगितला होता. त्यांची आई जिथे शिकवीत असे, त्या शाळेतच जावडेकर शिकत. चौथीच्या वर्गाच्या उत्तरपत्रिका त्यांच्या आईने तपासल्या होत्या आणि त्यांना आईने दोन गुण कमी दिले होते. प्रकाश आईवर रागावले, त्यांना दोन गुण कमी दिले म्हणून. त्यावर आई म्हणाल्या की, मुलाला जास्त गुण दिल्याचा आरोप कोणी करू नये म्हणून त्यांनी दोन गुण कमी दिले होते. 'अशा मूल्यांवर माझी वाढ झाली' असे जावडेकर म्हणाले! त्यांनी ज्या नव्या शैक्षणिक धोरणाचा उल्लेख या भाषणात केला; त्यावर ३१ जुलैपर्यंत नागरिक, तज्ज्ञ, सरकारे वगैरेंकडून प्रतिक्रिया व सूचना मागवण्यात आल्या होत्या. अशा सूचनांचा वा दुरुस्त्यांचा काहीही उपयोग होणार नाही. कारण एक आडमूठ, हट्टी, अहंकारी अन् निखालस जातीयवादी संघटन या धोरणामागे आहे. कधी नव्हे ते बहुमताचे सरकार चालवायला मिळालेला संघ परिवार भारताची शिक्षणव्यवस्था आपल्याला हवी तशी करवून घेण्याचे थोडेच सोडणार आहे? शिक्षण अन् शिकवणे संघाला अत्यंत प्रिय. का? ब्राह्मण तेच तर करीत असत! चातुर्वर्ण्यात ज्ञान आणि विद्वत्ता यांचा साठा ब्राह्मणांत सारा करून ठेवलेला होता. गुरू म्हणजे कोण हो? ज्ञान देण्याचा अधिकार कोणाकडे होता? ना संविधान, ना स्वातंत्र्य, ना लोकशाही, ना प्रजासत्ताक; कशावरही विश्वास नसणारा संघ कोणत्या गतवैभवाचे अन् कोणत्या उच्च परंपरांचे पुनरुज्जीवन करू मागतो आहे? शिक्षककेंद्री, गुरुप्रधान शिक्षण म्हणजे कोणत्या व्यक्तीसाठी अवघे शिक्षण जखडबंद करायचे आहे? शिक्षणपद्धती बदलून टाकण्यापूर्वी हे लोक बघा गोडवे कशाचे गातात ते :

''भारताने शिक्षणाला सदैव मानाचे स्थान दिलेले आहे. प्राचीन भारतात जी शिक्षणव्यवस्था विकसित झाली, ती वैदिक पद्धती म्हणून ओळखली जाते. प्राचीन भारतातील शिक्षणाचे उद्दिष्ट ज्ञान या जगातील व्यवहारांची तयारी अथवा परलोकाची तयारी यासाठी नव्हते, तर संपूर्ण आत्मज्ञान हे होते. गुरुकुल पद्धतीने गुरू व शिष्य यांच्यात एक बंध तयार केला आणि गुरुकेंद्री व्यवस्था उभी केली. त्यामध्ये शिष्याला कठोर शिस्तीत वागावे लागे व त्याच्या/तिच्या शिक्षकाठायी बांधील राहावे लागे.'' (प्रास्ताविका, सम इनपुट्स फॉर ड्राफ्ट नॅशनल एज्युकेशन पॉलिसी, २०१६, मानवी साधनसंपत्ती विकास खाते, भारत सरकार, प्रकरण एक, पृष्ठ ३.) हा नव्या शैक्षणिक धोरण मसुद्याचा चक्क पहिला परिच्छेद आहे! म्हणजे आतील आशय कोणत्या दिशेने जाणार याची चुणूक यायलाच हवी. जावडेकर जे बोलले ते आणि या मसुद्याच्या आरंभाला जे म्हटले आहे ते इतके सारखे आहे की जणू तो मसुदा त्यांनीच तयार केला असे वाटावे. पण ते तर जुलैत मंत्री झाले. मसुदा तयार झाला इराणींच्या काळात. मग इतके साधर्म्य कसे? उत्तर कानिटकर यांनी जे प्रास्ताविकावरील बातमीत केले, त्यात दडलेले आहे. भारतीय शिक्षणमंडळाचे प्रतिनिधी म्हणून त्यांनी ज्याचा आग्रह धरला, त्याचेच तर प्रतिध्वनी या मसुद्यात उमटलेले आहेत. म्हणजे उघडपणे संघ यात सामील होता.

प्राचीन भारत, वैदिक काळ, परलोक, आत्मज्ञान, गुरू-शिष्य हे केवळ शब्द नसून त्या संकल्पना आणि विशिष्ट विचार आहेत. त्याचे कोडकौतुक असेल संघाला, असेल ब्राह्मणांना; बाकीच्या 'वर्णां'नी काय करावे? मुख्य म्हणजे या प्रकारच्या ज्ञानग्रहणात शूद्रांना स्थानच नसे. स्त्रियांनाही हे ज्ञान दिले जात नसे. जी शिक्षणव्यवस्था गुरुशिष्य स्वरूपाची असते ती गुरूच्या आवडीनिवडींवर आणि त्याच्या निकषांवर ठरलेली असते. आत कोणाला घ्यायचे व नाही हे तो ठरवतो. शिक्षण घेणे हक्क असतो, हे या गुरुशिष्य परंपरेत बसत नाही. कोणी काय शिकायचे हेही तो गुरूच नक्की करणार. म्हणजे जातिव्यवस्था पक्की करण्याचाच कार्यक्रम. आज्ञा व त्यांचे पालन हे गुरुशिष्य परंपरेचे सर्वात ठळक वैशिष्ट्य. एकदा का आज्ञाभंग झाला की त्या शिष्याचे संपलेच शिक्षण! म्हणजे या

गुरुशिष्य नात्यातून अवघे शिक्षण दहशत, असुरक्षितता, स्वातंत्र्यदिनता आणि चापलुसी या वातावरणात चालणार. शिवाय तो शिक्षक ज्या विचारांचा असेल, तशी शिष्यमंडळी तो मारूनमुटकून घडवणार. प्रश्न-प्रतिप्रश्न वाद-प्रतिवाद, स्वतंत्र संशोधन यांना वावच नसणार. शाळा, पाठ्यपुस्तके, विद्यार्थीकेंद्री शिक्षण, शिक्षकांच्या नेमणुका, परीक्षापद्धती इ. साऱ्या गोष्टी राज्यघटना-कायदा यांनी बद्ध आहेत. लोकशाही व प्रजासत्ताक, स्वातंत्र्य-समता-बंधुता आदी संकल्पनांनी विद्यमान शिक्षणपद्धती जन्मास घातली आहे. संघ परिवाराने प्रयत्नपूर्वक या विचारांच्या समांतर शिक्षणव्यवस्था, मूल्यव्यवस्था आणि व्यवहार यांची उभारणी केली आहे. आता सत्ताप्राप्ती झाल्याबरोबर त्याला आपल्या 'व्यवस्था' रुजवायच्या आहेत. भावी हिंदुराष्ट्र निर्मितीसाठी शिक्षण आपल्या तत्त्वसिद्धान्तांप्रमाणे दिले तरच संघाला हवा तो नागरिक प्राप्त होणार आहे. म्हणजे त्याची तशी स्वप्ने आहेत. संस्कार ही संघाची कमालीची प्रिय प्रक्रिया. धर्म, राष्ट्रभक्ती, संस्कृती यांसाठीच सारे शिक्षण असले पाहिजे असे संघ मानतो. यासाठी तो इंग्रजांनी भारतात आणलेल्या शिक्षणपद्धतीवर नेहमी हल्ला करतो. मिल-मेकॉले यांच्यावर तो नेम धरतो. संघाचा इंग्रजांवरचा राग गुलामी, पारतंत्र्य, शोषण, वसाहतवाद याबद्दल मुळीच नसतो. तो असतो हिंदू समाजव्यवस्था, धर्मकारण, शिक्षण - यांत त्यांनी हस्तक्षेप केला म्हणून. सतिप्रथेला बंदी, शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण, पाठ्यपुस्तक निर्मिती, शिक्षकांच्या परीक्षा अशा काही ढोबळ दुरुस्त्या इंग्रजांनी केल्या. त्या काही आमूलाग्र परिवर्तनशील नव्हत्या, पण त्यांनी ही ब्राह्मणी पकड सैल झाली. लोकहितवादी, जोतीराव फुले, आगरकर, आंबेडकर आदींनी ब्रिटिश शिक्षणपद्धतीचे स्वागत का केले? जातीय कचाट्यातून शिक्षण तिने बाहेर उघड्यावर आणले व खुले केले यासाठी. सर्वांना समान शिक्षण देण्याचा त्यांचा प्रयत्न हिंदू ज्ञानव्यवस्थेतील वंचित-उपेक्षित यांना लाभाचा ठरला. संघाची काय भूमिका आहे शिक्षणासंबंधी?

''या देशातील राष्ट्रप्रेमी समाज आपल्या इतिहासाला, संस्कृतीला आणि सभ्यतेला संपूर्णपणे विसरावा यासाठी इंग्रजांनी प्रदीर्घ काळापासून पद्धतशीर प्रयत्न केले हे आपल्याला विसरता येणार नाही. किंबहुना हा उद्देश साध्य करता यावा यासाठी यांनी एका शिक्षणपद्धतीचाही विचार केला होता. या योजनेचा मूळपुरुष असे म्हणाला होता की आम्हाला या देशात काळे इंग्रज निर्माण करायचे आहेत. त्याने निर्माण केलेली ती स्वत्वहीन शिक्षणपद्धती दीर्घकाळ आपल्याकडे सुरू राहिली... आमचे जीवन परानुकरणाच्या दुष्चक्रात फसत गेले. केवळ 'स्व'चे विस्मरणच झाले असे नव्हे, तर आम्ही त्याला नावेही ठेवू लागलो. आमची राहणी, आमचे चारित्र्य, कर्तव्यांचा आम्हाला असणारा बोध, वैचारिक भूमिका या सर्वच आघाड्यांवर आज एक विवेकशून्य असे अंधानुकरण सुरू असल्याचे लक्षात येते आहे... जाणकार मंडळींकडून असे ऐकावयास मिळते की, शिक्षण हे रोजगाराभिमुख व्हायला हवे. शिक्षणाने माणूस आपल्या गरजांची पूर्तता करतो, पैसे कमावतो. याचा अर्थ असा की, शिक्षण हे माणसाला पैसा कमावण्यासाठी सक्षम बनवते. शिक्षणाचा हा अर्थ निकृष्ट मानला पाहिजे... वास्तविक पाहता माणूस शिक्षणाच्या साहाय्याने उत्तरोत्तर प्रगती करीत असतो. जीवनातील सर्वश्रेष्ठ लक्ष्य गाठीत असतो. शिक्षणाचा अर्थ आहे मानवाला जीवनातील हे अंतिम लक्ष्य गाठण्यासाठी तयार करण्याचे, तिकडे त्याचे लक्ष वेधायचे. परंतु या अंतिम लक्ष्याच्या प्राप्तीसाठी मानवात अनेक प्रकारचे सद्गुण असण्याची गरज आहे. हे सद्गुण असे सहसा येत नाहीत. त्यासाठी प्रयत्न करावे लागतात. या गुणांसाठीचे संस्कार लहानपणापासूनच आपल्या जीवनावर करत राहावे लागतात.'' (समग्र श्रीगुरुजी, खंड ५, ध्येयनिष्ठ शिक्षणपद्धती, भारतीय विचारसाधना पुणे प्रकाशन, पृ. १६५-६६.)

मा. स. गोळवलकर यांना गुरुजी, श्रीगुरुजी असे मुद्दाम संबोधले जाई. संघाद्वारे जे साध्य करावयाचे होते, त्याचे सार वरील उद्धरणात आले आहे. परानुकरण, अंधानुकरण, 'स्व'चे विस्मरण अशी ते ब्रिटिश पद्धतीची निंदा करतात. शिवाय 'नावे ठेवू लागलो' असे सांगण्यातून स्वतंत्र विचारशक्तीचा, मतभिन्नतेचा हक्क गोळवलकर नाकारतात हे स्पष्ट होते. आमचे, आमची, कर्तव्य या शब्दांतून त्यांनी हिंदू संस्कृतीचा उल्लेख केलेला आहे. गुरुजी शिक्षणामुळे माणूस आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होतो हेच अमान्य करत आहेत. कौशल्ये व कमाई यांना ते तुच्छ समजतात. शेवटच्या काही ओळींमधून गुरुजींमधील सरसंघचालक कसा प्रकटतो? माणसे वापरण्याची कला संघ या प्रकारच्या 'जीवनाचे अंतिम लक्ष्य' आणि त्यासाठी

आवश्यक असलेल्या 'सद्गुणांच्या संस्कारां'चा आग्रह धरण्यातून व्यक्त करत असतो. म्हणजे सामान्य माणूस त्याच्या गरजा-अपेक्षा यांनुसार शिकतो व मार्गी लागतो. गोळवलकरांना शिक्षणाचे असे सामान्यीकरण मंजूर नाही. कारण असा सामान्य शिक्षित माणूस संघाला उपयुक्त नाही. पण संघाकडे मुले व तरुण वळवायचे कसे? तर उच्च ध्येय, अंतिम लक्ष्य यांच्या बाता करून! स्वातंत्र्यप्राप्ती व त्यासाठी तुरुंगवास हे संघाचे उच्च ध्येय मग का नव्हते? स्वातंत्र्यासाठी देहत्याग करणारे गुरुजींचे किती शिष्य आपल्याला ठाऊक आहेत? शून्य! मग उच्च ध्येय कसले, तर हिंदुराष्ट्रनिर्मितीचे, धार्मिक पुनरुज्जीवनाचे आणि एकचालकानुवर्ती राज्यव्यवस्थेचे. संघाला शिष्य कशासाठी हवे आहेत, तर त्यांना विशिष्ट साच्यात घडवायला, त्यांचे यंत्रमानव बनवायला. थोडक्यात, हिंदू जिहादी तयार करायला! अवघे शिक्षण गुरुजी आपल्या संकुचित, धोकेबाज उद्दिष्टपूर्तीसाठी ताब्यात ठेवू पाहत आहेत. नुसते पूज्य नव्हे, तर परमपूज्य हे विशेषण गोळवलकरांसाठी वापरले जाई. वाढवलेले केस, दाढी यांतून प्राचीन ऋषींचा आभासही गोळवलकरांच्या व्यक्तिमत्त्वातून होत असे.

जावडेकरांना जे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राबवायला शिक्षण खाते सोपवले ते संपूर्णपणे इंग्रजीत - २३० पानांत - आहे. जो मसुदा जाहीर केला, त्याची सर्व ४३ पाने इंग्रजीत आहेत. याचा अर्थ हाच की इंग्रजी न जाणणाऱ्या भारताला तो समजूच नये. त्याला सूचनाच करता येऊ नयेत. संस्कृत भाषेचा कमालीचा पुळका अन् इंग्रजांचा तेवढाच द्वेष करणाऱ्या संघ परिवाराकडून अशी घोडचूक कशी होईल? तर इंग्रजीचा वापर मुद्दाम केलेला आहे हे उघड आहे. मसुद्यात 'सामाजिक समरसता' हा खास संघी शब्दसुद्धा उगाच आलेला नाही. तो इंग्रजीत 'सोशल कोहेजन' असा आलेला आहे. म्हणजे राज्यघटनेत 'इक्वालिटी'पुढे मान तुकवायची अन् शैक्षणिक धोरण मात्र समरसतेचे! हा संघाच्या कावेबाजपणाचा पुरावाच. या धोरणात राज्यपातळीवर शिक्षक भरतीसाठी एक स्वतंत्र आयोग उभारण्याचाही प्रस्ताव आहे. याचा अर्थ आयोगाचे सारे सदस्य संघ परिवारातील असणार आणि तो नव्याने निकषही पैदा करणार. मुळात सबंध शैक्षणिक धोरण चार निवृत्त नोकरशहा आणि एन.सी.इ.आर.टी.चे एक माजी संचालक यांच्या हातून लिहवून घेण्यात आले आहे. एकटे जे. एस. राजपूत सोडले तर शिक्षणाचा कोणाशी कसलाही संबंध नव्हता. म्हणजे हे मंडळ एक देखावा असून प्रत्यक्ष रचनाकार वेगळेच होते असा संशय येणारच. बरे, हे रचनाकारसुद्धा फार बडे शिक्षणतज्ज्ञ होते असेही नसणार. ते गुरुजींचे शिष्य असणार. त्यामुळे पुन्हा एकदा गुरुजी काय म्हणतात ते पाहू :

''प्राथमिक शाळेपासूनच विद्यार्थ्यांना योग्य दृष्टिकोन दिला जावा. त्यांची मने सुसंस्कृत केली पाहिजेत. ज्यात श्रेष्ठ राष्ट्रीय महापुरुषांचे आणि त्यांच्या जीवनातील घटनांचे वर्णन आहे अशा आपल्या प्राचीन आणि आधुनिक साहित्य भांडारावर आम्हाला अवलंबून राहिले पाहिजे. आम्ही ऋषिमुनींचे वंशज आहोत याचा अभिमान हृदयात धारण केला पाहिजे. याची शिक्षणात व्यवस्था केली जावी. आम्हाला हिंदूंप्रमाणे राहिले पाहिजे आणि हिंदूंप्रमाणे दिसले पाहिजे. साऱ्या जगाने आम्हाला हिंदू म्हणून ओळखले पाहिजे... खरोखर जगाची अशीच इच्छा आहे की आम्ही आपले वास्तविक स्वरूप प्रकट करावे. कुणा सोम्यागोम्याची कार्बनकॉपी बनू नये.'' (समग्र श्रीगुरुजी खंड ९, पृ. १४५-४६.) गोळवलकर स्वतः विज्ञानाचे पदव्युत्तर पदवी मिळवलेले विद्यार्थी होते. मात्र त्यांच्या लिखाणात वा बोलण्यात विज्ञान कधीही येत नाही. वरील उद्धरण अंदाजे साठच्या दशकात केलेले असावे. तोवर भारताची विज्ञानामुळे झालेली प्रगती गोळवलकर पूर्णपणे दृष्टिआड करतात. नेहरू-गांधी यांचे ते इतके अंधद्वेष्टे आहेत की ते सतत अवघा भारत व भारतीय शिक्षण मागे मागे ढकलत न्यायला आतूर झालेले दिसतात. किती मागे? थेट ऋषी-मुनी यांच्या काळात. म्हणजे चक्क ब्राह्मण्याच्या परंपरेत जाऊन बसायला गुरुजी अनावर झाले आहेत, असेच वाटते. हिंदुत्व शिक्षणामधून प्रकटले पाहिजे हे ते येथे स्पष्टपणे सांगून टाकतात. ते करताना त्यांना शूद्रांना नाकारलेले शिक्षण, स्त्रियांना मिळालेला नकार व शिक्षणावरचा ब्राह्मणांचा एकाधिकार दिसत कसा नाही? धर्मांध झाल्यावर काय दिसेल म्हणा!

अरे, ते तिकडे राजस्थानात काय दिसते आहे? संघाचे तंत्र तिकडच्या शिक्षणात लागूही झाल्याचे दिसते आहे. मग आताचे प्र.जा. तंत्र करणार काय? त्याला बहुधा महाराष्ट्र बदलायला सांगितलेले आहे. जा, बाळा, जा. तो फुले-शाहू-आंबेडकर यांचा शैक्षणिक पुरोगामी महाराष्ट्र

बदलून पालटून टाक. जा-राडे-कर! तर राजस्थानात काय चालले आहे तेही पाहू. वसुंधराराजेंच्या मंत्रिमंडळात शिक्षणमंत्री आहेत वासुदेव देवनानी. ते ६८ वर्षांचे पक्के स्वयंसेवक आहेत. त्यांनी श्रीगुरुजींचे शिष्यत्व पत्करलेले असल्याने त्यांचे हात शिक्षणाचे भगवेकरण करायला नुसते शिवशिवत नाहीत, तर काही करूनही दाखवतात. बघा त्यांनी कोणते कार्य आरंभले आहे ते : ''१ जुलै २०१५ पासून शाळांमध्ये प्रार्थनेवेळी योग, प्राणायम, वंदे मातरम, सूर्य नमस्कार व ध्यान अनिवार्य; वसंत पंचमीवेळी सर्व सरकारी-बिगर सरकारी शाळांत सरस्वतीपूजा अनिवार्य; प्रत्येक शाळेत विद्यालय विकास समिती स्थापन झाली असून दर अमावास्येला तिची बैठक अनिवार्य; अभ्यासक्रमात भगवद्गीता जोडलेली असून त्याखेरीज सरकारी शाळांमधील ग्रंथालयांत गीता, भगतसिंहांची जेलडायरी. एकात्म मानव दर्शन, सामाजिक समरसता इ. विषयांवरील पुस्तके ठेवण्यात आली आहेत; सर्वोत्कृष्ट ठरणाऱ्या विद्यार्थ्याला एकलव्य पुरस्कार तर विद्यार्थिनींना मीरा पुरस्कार देणार; केंद्र सरकारतर्फे चालविल्या जाणाऱ्या मॉडेल स्कूल्सचे नामांतर विवेकानंद शासकीय मॉडेल स्कूल करण्यात आले असून प्रत्येक शाळेत विवेकानंदांची मूर्ती आणि प्रवेशद्वारावर एक बोधवाक्य अनिवार्य; अनमोल वचनांची सीडी शाळांनी रोज पाच मिनिटांसाठी ऐकवण्याची सक्ती; प्रत्येक शनिवारी होणारी बालसभा नव्या नावाने संस्कारसभा झाली असून तीत राष्ट्रभक्तीपर गाणी, नाटके व कथा ऐकवल्या जातील; विवेकानंद जयंतीस प्रतिवर्षी शिक्षण सशक्तीकरम अभियान; स्टेट ओपन स्कूलमध्ये संस्कृत भाषा जोडली असून त्या इमारतीचे नाव एकलव्य भवन आहे. पुढील वर्षी सिंधी भाषा जोडण्यात येईल; माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांत संस्कृत विषय समाविष्ट व त्यासाठी शिक्षकांची पदे जाहीर.'' (बदलने लगी 'शिक्षा', इंडिया टुडे, ३ ऑगस्ट २०१६, पृ. २१.)

हे देवनानी सिंधी असल्याने त्यांनी २०१७ पासून सिंधी भाषा शाळांत शिकवायची सोय केली आहे. बाकी सारा बदल हिंदुत्वाच्या प्रभावाखाली होत असल्याचे स्पष्टच आहे. 'ब्रेनवॉशिंग' यालाच म्हणतात. महत्त्वाचे म्हणजे हा खटाटोप देशाच्या संविधानातील मूल्यांविरोधात उघडपणे राबवला जातो आहे. शिक्षण केंद्र व राज्ये यांच्या सामायिक यादीत समाविष्ट केल्याचा दुरुपयोग संघ परिवार कसा करतो याचा हा नमुना. धर्मांधता हे विशेषण अलीकडे मुसलमानांबद्दल उच्चारले जाते. राजस्थानात यापेक्षा वेगळे काय चालू आहे? आयएसआयएस आणि आरएसएस हे धर्मशिक्षणाबाबत समांतर वाटचाल करीत नाहीत काय?

गोळवलकरांची शिक्षणाबद्दलची एकतर्फी, एकांगी व एकसाची दृष्टी किती भयंकर आहे हे ती वाचतानाच आपल्या लक्षात येते. म्हणूनच महाराष्ट्र त्या दृष्टीच्या मोहिनीला कधी भुलला नाही. तो निरनिराळे प्रयोग आधुनिक, वैज्ञानिक आधारांवर शंभर वर्षांहून जास्त वर्षे करत होता. गुरुजी १९४० साली सरसंघचालक झाले. त्याआधी १९३६ साली बालमानसशास्त्र, शैक्षणिक मानसशास्त्र, अध्यापनशास्त्र याबाबत एक अत्यंत रंजक पण उद्बोधक पुस्तक मराठीत प्रसिद्ध झाले होते. त्याच्या एकूण तीन आवृत्त्या निघाल्या. त्यात काय म्हटले होते ते बघू :

''इंदूला इतिहास मात्र पहिल्यापासूनच आवडत असे. जेव्हा पाहावे तेव्हा तिच्या हातात ऐतिहासिक गोष्टींची पुस्तके दृष्टीस पडत... शिवाजीचा स्वदेशाभिमान, त्याचे नैतिक पावित्र्य, संभाजीचा कट्टा धर्माभिमान, दादोबाचा सत्याभिमान, त्या ब्राह्मणाची अपूर्व स्वामीनिष्ठा वगैरे गुणांचा इंदूच्या मनावर अतिशय मोठा परिणाम झाला होता... मी तिला सहज विचारले, 'त्या मुसलमनाने नुसती गायच मारली; शिवाजीने तर त्या मनुष्याची हत्या केली. तेव्हा त्या मुसलमानापेक्षा तुझा तो शिवाजीच जास्त पातकी नाही काय?' पोर गोंधळली व तिला उत्तर देता येईना. गाय मारण्यापेक्षा मनुष्य मारणे हे केव्हाही काय वाईटच आणि म्हणून शिवाजीने हे चांगले काम केले नाही असे तिलाही आता पटू लागले. पण शिवाजीच्या धर्माभिमानाची तिच्या बालमनावर जी एक कायमची पकड बसली होती, ती काही दूर होईना व शेवटी ती मोठ्या काकुळतीला येऊन म्हणाली, 'असं काय हो नाना, शिवाजीच खरा मोठा, आणि त्याने केलं तेच चांगलं!' हाच प्रकार संभाजीच्या त्या बाणेदारपणाच्या उत्तराचा. वस्तुस्थिती अशी होती की परिस्थितीचे सूक्ष्म अवलोकन करून योग्यायोग्याचा निर्णय करता आला पाहिजे हे ते इतिहासाच्या अध्ययनाचे खरे ध्येय ते बाजूला सारून आपले पूर्वज, आपला देश, आपला धर्म, वगैरेचे फाजील स्तोम माजवून त्यासंबंधी भलता अभिमान उत्पन्न करणे असे एककल्ली ध्येय विद्यार्थ्यांच्या

डोळ्यांपुढे ठेवण्यात येते आणि मुलांची अंतःकरणे या 'पूज्य' गोष्टींच्या अभिमानाने भारून टाकण्याचा प्रयत्न करताना शिक्षक असा काही रंगून जातो की विचाराला न पटणाऱ्या कितीतरी गोष्टी तो मुलांना खऱ्या भासवतो. इंदूचे इतिहासाचे शिक्षक मोठे जाज्वल्य देशाभिमानी म्हणून प्रसिद्ध होते... कितीतरी गोष्टी ते मोठ्या उत्साहाने करीत व या सर्वांचा परिणामही मोठा चांगला होई... पण या चांगल्या परिणामांबरोबरच भावनावश मनावर एक विपरीत परिणामही झाल्यावाचून राहत नसे; आणि तो म्हणजे त्यामुळे कधीकधी सत्यासत्याचा किंवा शक्याशक्यतेचा विचार करण्याचे भान न राहून मन अत्याग्रही किंवा दुराग्रही बनण्याचा संभव फार असे... शिवाजीच्या धर्माभिमानाच्या गोष्टींबरोबरच औरंगजेबाच्या धर्माभिमानाच्या गोष्टीही सांगाव्या लागत असत. इंग्रजांच्या राज्यलोभाबरोबरच मराठ्यांच्या राज्यलोभाचे प्रदर्शनही तिच्यापुढे करावे लागे. नाना फडणवीसाच्या चातुर्याच्या गोष्टींबरोबरच त्याच्या मनाचा क्षुद्रपणा भासवणाऱ्या गोष्टीही सांगाव्या लागत... माझ्या या प्रयत्नांना फळ येऊन इंदूची दृष्टी व वृत्ती तिच्या वयाच्या इतर मुलांच्या मानाने पुष्कळच उच्च व उदार बनली आहे.'' (आमच्या इंदूचे शिक्षण, ना. म. पटवर्धन, केशव भिकाजी ढवळे प्रकाशन, मुंबई, १९४८, पृष्ठे ८०-८१-८२.)

हे पटवर्धन सोलापुरातील होते आणि एम.ए.एल.टी. झालेले अध्यापक होते. सदर भारी पुस्तकात आचार्य अत्रे, वि. द. घाटे, सी. रा. तावडे, भा. धों. कर्वे, वा. म. जोशी या शिक्षणतज्ज्ञांच्या प्रस्तावना आहेत. म्हणजे पाहा, गोळवलकरांच्या काळातच त्यांचे विचार खोडून काढणारे शिक्षण व त्यासंबंधी विचार करणारे लोक महाराष्ट्रात होते. पटवर्धन व गोळवलकर यांचा कधी संबंध आलेला नव्हता. परंतु फरक किती तर एकाला अंधभक्त हवेत, तर दुसरा समदृष्टी निर्माण करू पाहणारा. एकाला प्रत्येक शिष्य आक्रमक, हिंस्र, अनुदार हवा तर दुसऱ्याला विशाल मनाचा व सदसद्विवेकबुद्धी जागी ठेवणारा हवा. ऐंशी वर्षांपूर्वीचे पटवर्धन यांचे विचार आजही अनुकरणीय आहेत. त्यांचे स्वयंसेवक प्रकाश जावडेकर तेच तंत्र राबवणार यात मग काय शंका?

(पूर्वार्ध)

●

(माधव दातार / पान ३९ वरून)

समजणे बालिश ठरेल. भारतीय शासनव्यवस्थेस असा कोणताही बाह्य/शत्रू धोका नाही, ज्याच्या रक्षणासाठी जनतेने बलिदान करण्याची गरज आहे. भूतकाळात ज्यानी त्याग केला व स्वातंत्र्यचळवळीत स्वत:स झोकून दिले त्याची आठवण ठेवणे अशा व्यक्तींबाबत आदर बाळगणे स्पृहणीय असले, तरी ती राष्ट्रप्रेम वा नागरिकत्वाची कसोटी असू शकत नाही. आजही मोठ्या संख्येत भारतीय नागरिक गरिबीत आणि अज्ञानात खितपत आहेत, त्याची कारणे बाह्यघटकात कल्पिणे निरर्थक ठरते. आजच्या परिस्थितीत राष्ट्रवादी असणे म्हणजे देशाचा एक रहिवासी आणि नागरिक म्हणून ज्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्ये पाळणे अभिप्रेत आहे त्याची काटेकोर पद्धतीने अंमलबजावणी करणे. जे या जबाबदऱ्या पार पाडतात ते खरे राष्ट्रवादी. जे असे करत नाहीत त्यांनी भारतमातेचा कितीही उच्चरवाने जयजयकार केला तरी त्यातून त्यांच्या कर्तव्यच्युतीची भरपाई होणार नाही हे समजून घेणे गरजेचे आहे.

मुळात राजकीय हिंदुत्वाचा कार्यक्रम हिंदू धर्माचे स्वरूप अधिक संघटित, एकजिनसी बनविण्याचे आहे. मुसलमान अधिक संघटित आहेत, ते काटेकोरपणे धर्मपालन करतात. त्याच धर्तीवर हिंदू संघटित करता आले तर राजकीय हिंदुत्वाचा कार्यक्रम यशस्वी होऊ शकतो अशी त्यामागची रणनीती आहे. हा कार्यक्रम भारतीय राष्ट्रवादाशी तर सुसंगत नाहीच, पण हिंदू समाजाच्या हिताचाही असणार नाही. शुद्ध इस्लामी जीवन आणण्याचा कार्यक्रम राबवण्यासाठी कोणतेही कृत्य निषिद्ध न मानणाऱ्या संघटना प्रत्यक्षात मुख्यत: इस्लामी जनतेची हत्या करत आहेत हे सर्वांनी लक्षात ठेवणे जरूरीचे आहे. संघटन, कडवे धर्मप्रेम याबाबत इस्लामी संघटनाचा आदर्श समोर ठेवणाऱ्या राजकीय हिंदुत्व समर्थकांना ते कठीण जाणार नाही अशी आशा वाटते. पण राजकीय हिंदुत्वाचे पुरस्कर्ते झोपेचे सोंग घेत असले, तरी सामान्य नागरिकांनी ही बाब लक्षात घेतली तर आणि तरच राजकीय हिंदुत्वाचा प्रभाव कमकुवत होईल.

●

संकरातून संस्कृतिसंवर्धन

नविना नजात हैदर
अनु. : **प्रकाश बुरटे**

अनेक जीवनप्रवाह सामावून घेणारी भारताची एकसंध प्रतिमा प्रदीर्घकाळ होती. ती अलीकडे विस्कटत चालली आहे. तिची जागा जात, धर्म, भाषा यांनी तडे गेलेली भारताची प्रतिमा घेते आहे. गतकाळ मात्र विविधता सामावून घेणाऱ्या भारतीय कलांनी महत्ता प्राप्त केल्याचा संदेश देतो आहे. सर्व मानवांना समान मानणाऱ्या समताधिष्ठित समाजमनास तो हळुवारपणे ताजेतवाने करतो आहे. चित्रकार, संगीतकार, नर्तक, साहित्यिक, कवी, विणकर कलावंत, वास्तुविशारद, विविध माध्यमांवर काम करणारे शिल्पकार, दागिने बनविणारे आणि खाद्यसंस्कृती जोपासणारे कलाकार अशा अनेक क्षेत्रांतील आणि शेकडो वर्षांतील कलावंतांच्या सर्जनशीलतेतून एकसंध परंपरांचा भारत हा चैतन्यशील देश विणला गेला आहे. त्यात विविध देश, विदेश, प्रदेश, धर्म–जात यांच्याशी निगडित परंपरा आणि त्यांचे रंग बेमालूमपणे उतरले आहेत. मुघल काळातील आणि शैलीतील चित्रांपैकी विशेष दखल घेतलेल्या पाच चित्रांचा या लेखात विचार केला आहे. त्यात आढळणारा विविध चित्रसंस्कृतींचा संगम या चित्रांच्या महत्तेला कारणीभूत आहे. या समावेशकतेचे महत्त्व आपण स्वीकारणार, का आज पसरत चाललेली असहिष्णुता कळीची मानणार हा प्रश्न सतत नजरेसमोर ठेवला पाहिजे. शेकडो वर्षांच्या सर्जनशीलतेने काल्पनिक भूतकाळातील एकसाची संस्कृती नाकारली आहे. तिचेच अनुकरण करत मुघल काळाने अनेक प्रदेशांतील आणि विविध धर्मांचे निष्णात सर्जनशील कलावंत एकत्र आणले. त्यांनी निर्मिलेल्या कलांनी प्रेक्षकांमध्ये या कलांबाबत आपलेपणाची भावना निर्माण केली आणि सोबत कलाशिक्षण व मनोरंजनही केले आहे. प्रस्तुत लेखासाठी निवडलेली चित्रे आजच्या काळातील आस्वादकांपर्यंत त्याच भावना पोहोचवतील अशी आशा आहे.

ईमेल : burte.burte@gmail.com

१. गोवर्धन पर्वत उचलणारा श्रीकृष्ण

(सोदाहरण हरीवंश कथानकासाठी); वर्ष १५८५.

अकबर बादशहाच्या कारकीर्दीचा काळ १५५६ ते १६०५ या वर्षांदरम्यान. त्याने १५७४ साली राजधानी फतेहपूर-सिक्री येथे महत्त्वपूर्ण ग्रंथांच्या नोंदी आणि त्यांतील निवडक ग्रंथांची भाषांतरे करण्याची अशी कामे करणारे स्वतंत्र खाते उभारले. हिंदू परंपरेतील महत्त्वाच्या ग्रंथांची सुंदर चित्रांनी सुशोभित केलेली पर्शियन भाषेत रूपांतरे करणे, हे या खात्याचे उद्दिष्ट होते. त्यासाठी विद्याविभूषित मुल्ला आणि पंडित नेमले. त्यांनी अनेक वर्षे एकत्र काम करून विष्णुपुराण आणि कथा सरित्सागरसारख्या अनेक प्राचीन संस्कृत ग्रंथांची पर्शियन भाषेत रूपांतरे साकारली. संस्कृतमधील महाभारत पर्शियन भाषेत 'रज्मनामा' या शीर्षकाने भाषांतरित झाले. भाषांतरित रामायणाच्या चार प्रती काढल्या. तीन मुघल राजघराण्यातील व्यक्तींसाठी आणि एक राजपूत राजघराण्यासाठी. सोळाव्या शतकाआधी चित्ररूप रामायणाच्या रचना उपलब्ध नव्हत्या. परिणामी हे ग्रंथ चित्रांनी सजविणाऱ्या कलावंतांना प्राचीन काळाकडून मार्गदर्शन मिळणार नव्हते. अशा स्थितीत हिंदू तसेच मुस्लीम वाचकांच्या पसंतीस उतरतील अशा प्रतिमा उभारणे हे हिंदू, मुस्लीम आणि युरोपियन स्त्री-पुरुष चित्रकारांसाठी एक आव्हान होते.

निवडलेले पहिले चित्र हरिवंशकथा या ग्रंथातील इंद्राच्या कोपापासून सामान्य ब्रिजवासी जनतेचे संरक्षण करण्यासाठी कृष्णाने गोवर्धन पर्वत उचलण्याचा प्रसंग रेखते आहे. *(निसर्गदेवतांना मंत्र आणि आहुत्या देऊन खूष करून त्यांच्या कृपेची याचना करण्याकरीता वैदिक काळातील यज्ञसंस्कृती भारतीय उपखंडात पसरली होती. इंद्र ही पर्जन्यदेवता. तिला खूष करून मुबलक पाणी मिळविण्यासाठी यज्ञांत हवी दिले जात. महाभारत किंवा कृष्णलीलांचा काळ पुढचा; भक्तिचळवळीचा. ब्रिजग्रामी कृष्णाचे महत्त्व वाढत असल्याचे पाहून इंद्र कोपतो आणि ब्रिजवासी कृष्णभक्तांना हैराण करण्यासाठी धो धो पाऊस पाडतो. ब्रिजवासी जनतेचे कृष्णाने संरक्षण करणे अपेक्षित आहे. कृष्ण चक्क गोवर्धन पर्वत एका करंगळीवर उचलण्याचा चमत्कार करतो. त्याने इंद्र वरमतो, अशी ती कथा आहे.* - तिरपा ठसा अनुवादकाचा.) सोबतच्या गाजलेल्या पेंटिंगमध्येदेखील पर्जन्यदेवता इंद्राच्या कोपापासून सामान्य ब्रिजवासी जनतेचे संरक्षण करण्यासाठी कृष्णाने गोवर्धन पर्वत उचललेला आहे. त्या पर्वताखाली चित्राच्या मधोमध गडद निळ्या रंगातील पितांबरधारी कृष्णाची उभारण्याची ढब मुघलकाळातील परंपरेला साजेशी आहे. हिंदू परंपरेप्रमाणे त्याच्या मुकुटात मोरपीस खोवलेले आहे आणि गळ्यात वैजयंतीमाळा रुळताहेत. डोक्यावरील गोवर्धन पर्वत इराण-चीन असा (कला)प्रवास करत आलेला सुशोभित आणि वृक्षांनी पूर्ण झाकलेला रेखीव असा एकच एक खडक आहे. तेथे पक्षी उडत असून, निवांतपणे हरणे चरत आहेत. पर्वताखाली कृष्णाच्या आजूबाजूला ब्रिजवासी गोतावळा त्याच्या अनेक बारकाव्यांसह संवेदनक्षमतेने चितारला आहे. गोतावळ्यात वृद्ध पुरुष, तरुण मुले, मुघलांच्या दरबारी पेहरावातील तीन व्यक्ती आणि उजव्या भागात तर युरोपातील मॅडोन्नाची आठवण जागवणारी ब्रिजधामी आलेली एक स्त्री दिसते आहे. गोधन हा ब्रिजवासी जीवनाचा अविभाज्य भाग. त्याशिवाय गोकुळाची कल्पनादेखील अपुरी ठरते. संवेदनक्षमतेने चितारलेले स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाचे सुरक्षित गोधन त्याची साक्ष देते. अनेक मंदिरांच्या शिल्पांतून कृष्णाने करंगळीवर पर्वत तोललेला आढळतो. परंतु या चित्रकारांना महाबलीपुरम येथील सातव्या शतकातील शिल्पांची जाण असावी असे दिसते. येथे करंगळी नव्हे, तर कृष्णाच्या हाताचा सपाट तळवा पर्वत तोलताना दिसतो. हिंदूकथांवर आधारलेल्या मुघलकालीन चित्रांच्या शैलीतील जादुगिरी चित्रकलेच्या विकासातील अकबराचे पाठबळ अधोरेखित करत असल्याचा पुरावाच जणू उभा करते.

२. मुस्लीम आणि हिंदू यात्रेकरूंची भेट

(अमीर खुस्रो देहलवींच्या नावे अस्तित्वात असलेल्या खाम्सा संग्रहातून; मुघल चित्रशैली सोळावे शतक; चित्रकार – बसवन.)

सूफी परंपरेतील अमीर खुस्रो हे संतकवी तेराव्या शतकातील. त्यांच्या रचनांसाठी सोळाव्या शतकात मुघलकालीन चित्रकारांनी चित्रे काढली आहेत. त्यात बसवन या महान चित्रकाराचा समावेश आहे. अबुल फजल यांच्या जगप्रसिद्ध आईन-ए-अकबरी या ग्रंथांत बसवन यांचा आदरपूर्वक उल्लेख आढळतो.

या चित्रात बसवन यांनी अमीर खुस्रो यांच्या रचनेत वर्णन केलेला हिंदू ब्राह्मण आणि मुस्लीम यात्रेकरू यांच्या भेटीचा प्रसंग चितारला आहे. लोटांगणे घालत चाललेल्या ब्राह्मण यात्रेकरूला मुस्लीम यात्रेकरू विचारतो, की तुम्ही पायी चालत का प्रवास करत नाही. त्यावर त्या ब्राह्मण यात्रेकरूने उत्तर देतो, 'मी मोठ्या श्रद्धेने माझ्या हृदयाचे पाय बनविले आहेत. त्या पायांनीच तर मी ईश्वराकडे चाललो आहे.' ब्राह्मण यात्रेकरूची भक्ती मुस्लीम यात्रेकरूला स्पर्शून जाते. तोही आपल्या वहाणा त्यागून आपल्या वाटेने ईश्वराकडे अनवाणी पायांनी चालू लागतो.

आजच्या 'अशक्त' शब्दांना एकमेकांच्या मनातील भावनांची एकमेकांना समजून घेण्याची 'ओझी' पेलवत नाहीत. मुखत्वे भावनाविरहित अलंकरणाचे काम शब्दांवर सतत पडल्याने त्यांचे अर्थवाहित्व पंगू झाले आहे. अशा काळात निवडलेली रचना, चित्रशैली, त्यातील अक्षर सुलेखन आणि या चित्रामागील मुघल दरबाराची प्रेरणा हे सारेच घटक दोन संस्कृतींचा समागम समर्थपणे दाखवितात. या चित्राचे आजच्याही काळात संस्कृतिसंकराचा अर्थ पोहोचविण्याचे अप्रूप भव्य आहे.

३. शिवाचे भैरवीदेवीपूजन *(पायग यांचा चित्रकार म्हणून उल्लेख; मुघल शैली; वर्ष सुमारे १६३०)*

हिंदू पौराणिक कथांसाठी चित्रे रंगविण्याचा प्रकल्प सतराव्या शतकात शहाजहान यांच्या कारकिर्दीतदेखील (वर्ष १६२८-५८) सुरू राहिला. प्रसिद्ध मुघल चित्रकार पायग यांनी काढलेल्या चित्रांपैकी सोबत दिलेले शिवाचे भैरवीदेवीचे पूजन रेखाटणारे चित्र १६३० मध्ये काढल्याचे सांगितले जाते.

रुंडमाळा आणि मुघलकालीन मोजके दागिने ल्यालेली शस्त्रधारी भयप्रद देवी भैरवी आणि उपासक भक्ताच्या रूपातील भस्मचर्चित आधुनिक शंकर हा चित्राचा विषय आहे. चित्राच्या मध्यभागी केस मोकळे सोडलेली देवी स्मशानात मुक्त पद्मासन घालून बसली आहे. तिच्या मुखातून रक्त ओघळते आहे. भोवताली सात चिता जळत आहेत. इतस्ततः मानवी हाडे आणि प्रेते पडलेली आहेत आणि खालील डाव्या कोपऱ्यात काही कोल्ह्यांचा वावर चितारला आहे. चित्राच्या डाव्या बाजूला मध्यभागी बसलेल्या उपासक शिवाने (जणू निवृत्त होऊन) जमिनीत स्वतःचा त्रिशूळ रोवला असून त्याला डमरू लटकवला आहे. त्याच्या मुखातून मंत्रोच्चाराचे प्रतीक असलेला अग्नी बाहेर पडतो आहे. प्रस्तुत चित्राचा बारकाव्याने अभ्यास केल्यावर लक्षात येते की पायाग या चित्रकाराने येशूला क्रुसावर चढविलेल्या सतराव्या शतकातील प्रतिमांचा आधार घेतला आहे. त्यातून त्याने चित्रसंकल्पना आणि दृश्य मानवी प्रतिमा साकारताना सखोल वास्तववादी वातावरणनिर्मिती केली आहे. या चित्राआधी मुघलकालीन

शैलीतील देवी महतमातांच्या प्रतिमांची मालिका घडली होती. या मालिकेच्या विकासातून प्रस्तुत चित्रातील देवीची प्रतिमा उठावदार केली आहे. विशेष म्हणजे मालिकेचा हा वारसा असला, तरी देवीच्या प्रतिमेतील अनेक बारकावे अभूतपूर्व म्हटले पाहिजेत. मुघल चित्रकलेने विविध चित्रशैलींचा संगम आणि सर्जनशीलता यांच्या संकरातून अलौकिक शक्तीयुक्त हिंदू देवीची प्रतिमा प्रचंड ताकदीने निर्माण केल्याचा प्रत्यय आल्यावाचून राहत नाही.

४. अंबर संस्थानाचे मिर्झा राजे जयसिंग यांच्या तंबूसाठी निर्मिलेला कलमकारी पडदा *(बहुतेक बुऱ्हाणपूर येथील, वर्ष १६६५ किंवा थोडा आधी)*

सोबत दिलेल्या चित्रातील वेलीच्या एकाच देठावर रेखलेली विविध आकारांतील पाने आणि भिन्न रंगातील आणि आकारांतील फुले पाहताच सतराव्या शतकातील या कलमकारी पडद्यावरील वेल वास्तवातील नसून काल्पनिक असल्याचे सहज कळते. कलात्मक काल्पनिकता आणि विस्मयकारकता हे विजापूर, गोवळकोंडा, अहमदनगर, बिदर आणि बेरार (म्हणजेच अकोलाच्या जवळचे अचलपूर) या सध्याच्या महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्र प्रांतातील त्या काळाच्या शाह्यांनी पुरस्कृत केलेल्या दख्खनी कलाशैलीचे सहीसही विशेष या चित्रात अवतरल्याचे दिसते आहे. वरील प्रदेशांतील दख्खनी शैलीचा पाठपुरावा त्या काळाच्या पांच शाह्यांनी केला, हे खरे आहे. परंतु तो फक्त त्यांनीच केला, असे म्हणणे मात्र ऐतिहासिकदृष्ट्या अपुरे होईल. मुख्यतः वरील पाच सुलतान शाह्यांचा (आणि जमलेच तर नुकतेच बाळसे धरू लागलेल्या मराठेशाहीचादेखील) पाडाव करण्यासाठी दखनी भागाच्या उत्तरेकडे मुघल आणि राजपूत सरदार सतराव्या शतकाच्या सुरुवातीस ठाण मांडून बसले होते. त्यांनीदेखील या कलमकारीचा शाही तंबूच्या पडद्यांसाठी वापर केला आणि त्यानिमित्ताने या कलेला उत्तेजन दिले. मुघलांच्या सेवेतील अंबरचे महाराज मिर्झा राजे जयसिंग (कारकीर्द १६२२-६७) यांच्या शाही तंबूचा भाग असणाऱ्या कलमकारी केलेल्या कापडाने प्रस्तुत चित्रासाठी विषय पुरविला आहे. विविध प्रदेशांतील भौगोलिक-सामाजिक विशेष, भिन्न श्रद्धा आणि संस्कृती यांच्या संकरातून सुंदर कलमकारीची निर्मिती झाली आहे. हा संस्कृतीसंगम दख्खनेतील पाच शाह्यांचा पाडाव करण्यासाठी दिल्लीतील शाही महालातील आयुष्य सोडून महाराष्ट्र आणि कर्नाटक येथे शेवटी तंबूत (शाही असले म्हणून काय झाले?) बरीच वर्षे आयुष्य घालविणाऱ्या औरंगजेब बादशहाच्या मोहिमांच्या वातावरणात त्याच्या संमतीने घडत होते. या शाह्यांचे मुघल साम्राज्यात विलीनीकरण शेवटी १६८७ या वर्षी होऊ शकले.

प्रस्तुत चित्राची शैली मुघल, राजपूत आणि दख्खनी यांच्या शैलीतील देवाणघेवाणीतून साकारली आहे. अशी रेखीव फुले १६४० या वर्षापर्यंत अनेक मुघलकालीन कलाजगात म्हणजे भव्य वास्तूमधील सुशोभीकरणापासून ते शाही वापरांतील अनेक वस्तूंपर्यंत राजपूत आणि दख्खनी अमलाखालील प्रदेशांत पोहोचली होती. या फुलांचा आणखी एक विशेष म्हणजे ती स्पष्टपणे चिनी शैलीतील ढगांच्या कमानीखाली आहेत. मिर्झा राजांनी कलमकारी केलेले पडदे खरेदी केल्याच्या नोंदी अंबर आणि जयपूरच्या तोषखान्याच्या नोंदवहीत सापडतात. एवढेच नव्हे, तर दक्षिणेत जेथे मिर्झा राजांचा मृत्यू झाला, तेथे त्यांचे स्मृतिस्थळ उभारण्याचा जो करारनामा झाला होता. तोदेखील या चित्रातील सौंदर्यकल्पनांचा वापर केलेल्या कलमकारी वस्त्रावर झाला होता. यातून स्पष्ट होणारी एक गोष्ट म्हणजे त्या काळातील सौंदर्याची भाषा आणि कलाशैली विविध श्रद्धांच्या समाजस्तरांनी स्वीकारली होती; तीमध्ये आजच्या काळातील श्रद्धांवर आधारित आग्रह अथवा पूर्वग्रह यांची सावली नव्हती *(शहाजीराजे ते छत्रपती शिवाजी आणि संभाजी महाराज यांच्या पेहरावावर असणारा मुघल पेहरावाचा ठसा मराठी वाचक आणि इतिहासतज्ज्ञ यांनी स्वीकारला आहे. –*

तिरपा ठसा अनुवादकाचा).

५. मेण्यात बसलेले बादशहा औरंगजेब

(मुघल शैली, वर्ष १७०० च्या जवळपास, चित्रकार भवानीदास)

मुघल बादशहा औरंगजेब यांच्या प्रदीर्घ कारकिर्दीतील (वर्ष १६५८ ते १७०७) शेवटची पंचवीस एक वर्षे दक्षिणेतील पाचही सुलतानशाह्यांचा बिमोड करण्यात गेली. मोहिमेत बादशहाला यश मिळाले, परंतु तोवर तो खूप वृद्ध झाला होता. त्यापायी बादशहाला दक्षिण भारताच्या उत्तर भागात तंबूत ही वर्षे घालवावी लागली.

बाजूचे चित्र भवानीदास या हिंदू चित्रकाराने काढले आहे. चित्राच्या मध्यभागी खुल्या आकाशाखाली लाल रंगाचा वेश ल्यालेल्या सेवकांनी आणि हिरव्या वेषातील मोजक्या शाही अधिकाऱ्यांनी खांद्यावर घेतलेल्या मेण्यात वृद्ध बादशहा बसलेला दिसतो आहे. या चित्रातील नाट्यमय डोंगराळ पार्श्वभूमी आणि खडकाळ जमीन चित्रातील प्रदेश उत्तर भारतातील नाही, प्रदेश दक्षिणेतील असल्याची साक्ष देतोय.

बादशहाला मानाचा मुजरा करणाऱ्या महत्त्वाच्या व्यक्तींमध्ये त्याचा मुलगा बहादुरशहा (पहिला) आणि बादशहाचा नातू असावा. पेंटिंगच्या अगदी पुढील भागातील हिरव्या पेहरावातील शिकाऱ्यांची उपस्थिती शाही शिकारीची जय्यत तयारी चालू असल्याचे संकेत देते आहे. चित्रकाराचे भवानीदास हे नाव पर्शियन लिपीमध्ये लिहिल्याचे स्पष्टपणे दिसते आहे. चित्रकाराची पर्शियन लिपीमधील सही मात्र मुघल प्रथेनुसार लहान आकारात आणि हिरव्या गवतात कळेल-न कळेल अशा बेताने लपविली आहे.

औरंगजेबाच्या कारकीर्दीचा काळ सध्या अनेक पूर्वग्रहांनी आणि विकृतींनी व्यापला आहे. परंतु हे महत्त्वाचे चित्र मात्र सांगते आहे की त्याच काळात चित्रकलेने ऐतिहासिक विषय, वास्तवाची नेमकी निरीक्षणे, शाही व्यक्तींच्या प्रतिमा आदी गोष्टी हाताळण्यासाठी लागणारी प्रगल्भता कमावली होती. तिने समंजस प्रौढत्वाची उंची गाठली होती. भवानीदास यांनी १७१९ पर्यंत मुघल दरबारी कलावंत म्हणून कार्य केले. या काळात मुघल शैली आत्मसात झाली. नंतरच्या काळात त्यांनी किशनगड येथील राजपूत दरबारी आपली रुजू केली. या काळात त्यांनी साकारलेल्या भक्तिपरंपरेतील चित्रांवरही मुघल शैलीचा प्रभाव आढळतो.

स्वतःमध्ये अनेक कलाप्रवाह सामावून घेत मुघलकालीन चित्रकलादेखील विकसित झाली आहे. अनेक प्रदेश, श्रद्धा, परंपरा, रिवाज, जगण्याची मूल्ये आणि अभिव्यक्ती माध्यमांतील कलाप्रवाह यांच्याशी देवाणघेवाण करत आणि संकर घडत एखाद्या नदीप्रमाणे कला विकसित होत असते, हे कलाजगतातील एक वैश्विक सत्य आहे. सर्जनशीलतेचा उगम अशा संवादी संकरात असतो. भारतीय उपखंडाचा इतिहास याला साक्ष आहे. कोणे एकेकाळचे काल्पनिक 'शुद्ध रूप' जपणारी 'सोवळ्या'तील कला थिजून जाते, कालबाह्य होते. उरते फक्त रखरखीत वाळवंट. जगाने असल्या आत्मघातकी 'शुद्धीकरण' मोहिमांचा अनुभव घेतला आहे. भारतातील सध्याचे राजकारण तोच कल्पित 'शुद्धतेचा आग्रह' धरू लागले आहे. अशा आग्रहापायी भारतीय कलाइतिहासातील उच्चप्रतीची सर्जनशीलता पुसली जाईल. मुघल काळातील वरील उत्कृष्ट कलाकृती संकाराविना संस्कृती अशक्य असल्याचे वैश्विक भान जपण्यास मदत करतील अशी आशा आहे.

●

(नविना नजात हैदर या भारतीय कलाइतिहासाच्या अभ्यासक आहेत. त्यांनी 'किशनगड चित्रशैलीचा सामाजिक आणि धार्मिक इतिहास १६५० ते १८३०' हा विषय त्यांच्या डॉक्टरेटसाठी (ऑक्सफोर्ड विद्यापीठ, लंडन) निवडला. अभ्यासासाठी अजमेर जिल्ह्यातील तिलोनिया या गावी राहून त्यांनी हा अभ्यास पूर्ण केला. सध्या त्या न्यूयॉर्कमधील मेट्रोपॉलिटन संग्रहालयाच्या प्रमुख (क्युरेटर) आहेत. विशेष म्हणजे या वर्षीच्या एप्रिल महिन्यात आपल्या संग्रहालयात त्यांनी तीन महिन्यांच्या प्रदीर्घ कालावधीसाठी Sultans of Deccan India, 1500-1700: Opulence and Fantasy या शीर्षकाखाली प्रदर्शन भरविले होते. त्यानिमित्ताने त्यांनी प्रस्तुत लेख लिहिला आहे.)

वैश्विक जननिष्ठ जाणिवेची लेखिका : महाश्वेतादेवी

किसन पाटील

अभिजन वर्गात जन्माला येऊन समाजाच्या तळागाळापर्यंत पोहचण्याची क्षमता असलेली लेखिका म्हणून महाश्वेतादेवी आगळ्यावेगळ्या ठरतात. त्यांचा जन्म १९२६ सालचा. ढाक्का येथे त्या जन्मल्या. वडील सरकारी नोकरीत होते. त्यामुळे वडिलांच्या नोकरीच्या वेगवेगळ्या ठिकाणी त्यांना शिक्षण घ्यावे लागले. ढाक्का, मदिनपूर, कोलकाता, शांतिनिकेतन अशा काही ठिकाणी त्यांचे शिक्षण झाले. त्यांनी एम. ए. इंग्रजी असे पदव्युत्तर शिक्षण घेतले. काही काळ प्राध्यापकाची नोकरीही केली. त्यांना ब्रिटिशांची गुलामगिरी, सरंजामशाहीची शोषणाची वृत्ती आणि प्रशासनातील अन्याय लादणारी प्रवृत्ती याबद्दल खूप चीड होती. त्या अस्वस्थतेतून त्यांची संवेदनशीलता, बंडखोर कार्यकर्ती आणि लढाऊ बाण्याची लेखणी यांना एक प्रकारची सर्जक शक्ती प्राप्त झाली. केवळ हस्तिदंती मनोऱ्यातून आणि आलिशान महालात बसून लेखन करणाऱ्या तथाकथित अभिजनवादी लेखक त्या कधीही नव्हत्या, तर प्रत्यक्ष बंगाल आणि परिसरातल्या वंचितांच्या, आदिवासींच्या वाड्या-पाड्यांपर्यंत जाऊन त्यांनी त्या विदीर्ण जीवनाची अनुभूती घेतली होती. म्हणजेच त्यांचं 'जगणं' आणि 'लिहिणं' एकरूप झालं होतं. जनाजनात त्या मिसळल्या, त्यांच्या मनामनांत विरून गेल्या. आदिवासींच्या घरातलं दुःख त्यांनी प्रत्यक्ष पाहिलं आणि भोगलं. जननिष्ठा आणि संवेदनशील 'माणूस' म्हणून त्या जगल्या होत्या, म्हणून त्यांचे साहित्य जनांचं आणि मानवतेचं, न्यायाचं आणि हक्काचं, वंचितांचं आणि त्यांच्या पुनरुत्थानासाठी लढण्याचं बळ घेऊन आलेलं आहे. देशी जाणिवा आणि देशीत्वाचं सांस्कृतिक संचित हाच त्यांच्या लेखनाचा केंद्रबिंदू ठरतो.

त्यांचा विवाह बिजन भट्टाचार्य या डाव्या विचारांच्या बंगाली नाटककाराशी झाला. हा विवाह सहविचारचारिणी असा होता. डाव्या

ईमेल : pwatsaru@yahoo.com

विचारांतून क्रांतीचे स्वप्न त्यांनी पाहिले होते. परंतु त्यांनी काही काळाने बिजनबाबूंपासून घटस्फोट घेतला. त्यांचा दुसरा विवाह असीम गुप्त या परिवर्तनवादी लेखकाशी झाला. आपल्या सभोवतालच्या समाजातील विषमता, दारिद्र्य, शोषित-वंचितांचे प्रश्न, दैन्य-दुःखाची विदारकता अनुभवताना त्यांनी आपल्या अभिजनत्वाची वस्त्रे टाकून दिली आणि साधी राहणी, आदिवासींच्या सान्निध्यात बंडखोर विचारसरणी घेऊन त्या जगू लागल्या. त्यांची गर्भनाळ भारतीय संस्कृतीच्या आदिमतेशी जुळली गेली. एकदोन सुती साड्या, पायात साधी स्लीपर असे साहित्य आणि लेखनाची सामग्री सोबत घेऊन त्यांनी अखंड कर्मयोग्याचे जीवन स्वीकारले. त्यांना जेव्हा एका आदिवासी झोपडीत ताटात थोडासा भात, कोरडी चटणीची बुकटी आणि सोबत चिमूटभर मीठ हा जेवणाचा मेनू भेटला तेव्हाच त्यांचे आंतरबाह्य असे हृदयपरिवर्तन आणि आचारसंहिता निश्चित झाली. ज्यांच्यासोबत राहायचं, त्यांची संस्कृती जाणून घ्यायची, त्यांच्या दुःख-वेदना पचवायच्या, त्यांना वाचा फोडण्यासाठी कृतिशील जगायचं आणि तेच लिहायचं हे समोर घडतं आहे. अशी धारणा घेऊन आदिवासी बोली, बंगाली संस्कृती आणि बंडखोर लेखणीच्या त्या धनी झाल्या. गरिबी, दारिद्र्याने शोषित लोकांना शिक्षण, रोजगार आणि न्याय्य हक्क कसे मिळतील यासाठी त्यांनी आपले जीवन व्यतित केले.

'झाशीर राणी', 'अमृतसंचय', 'अंधारमाणिक' या त्यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. १८५७ च्या स्वातंत्र्यलढ्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेलं हे त्यांचं लेखन स्वातंत्र्य आणि ब्रिटिश काळातील जुलुमांच्या विरोधात बंड पुकारणारं लेखन आहे. त्यानंतर त्या कम्युनिस्ट चळवळ आणि आदिवासी चळवळीच्या कार्यकर्त्या म्हणून जगल्या. 'हजार चौराशिर माँ', 'अरण्येर अधिकार', 'वानप्रस्थ', 'ऑपरेशन बसाई टू डू', 'हरिराम महातो', 'सरसानित्य', 'द स्टॅच्यू', 'द फेअरी टेल ऑफ मोहनपूर' अशा अनेक ग्रंथांची संपदा त्यांनी निर्माण केली. त्यांच्या कथासाहित्यावर आधारित 'रुदाली', 'हजार चौराशीर माँ', 'माती माँ' असे नामांकित चित्रपट आले. त्यामुळे भारतीय जनतेला संवेदनशील विचारांसह मानवतेचा खरा अर्थ कळू लागला. त्यांच्या साहित्यातील पात्रे-व्यक्तिरेखा अशीच गरिबी-दारिद्र्य झेलणारी आहेत. साधी माणसं (स्त्री-पुरुष), आर्थिक, दुर्बल, कनिष्ठ मध्यमवर्गीय जाणिवांची माणसं, आदिवासी-दलित-वंचित घटकांतील जीवनातली जनता हीच त्यांची पात्रे दिसून येतात. अत्यंत खडतर जीवन जगणारी, व्यथावेदना भोगणारी, सरंजामी आणि दुःशासनाला बळी पडलेली, अन्याय-अत्याचाराविरोधात बंड करू पाहणारी ही माणसं हाच त्यांच्या साहित्यचिंतनाचा विषय होता.

त्यांच्या कथेचा नायक 'इत्वामुंडा' हा अनाथ बालक, वेठबिगार म्हाताऱ्या आजोबांसोबत राहतो. तो शाळेत जाऊ लागतो तेव्हा मालक मोतीबाबू अडथळे आणतो. हा शिकला तर आपल्या परंपरागत वेठबिगारीचे काय होईल, असा प्रश्न त्याला पडतो. अशा रीतीने निर्दयी श्रीमंत सरंजामदार आणि आदिवासी वंचित घटकांचा संघर्ष कथेत उमटतो. 'बिरसामुंडा' हे आदर्श प्रतीक असून 'इत्वामुंडा' हा त्याच्या पुढच्या पिढीचा स्वातंत्र्य आणि हक्कांसाठी लढणारा वारस ठरतो. हा जीवनसंघर्ष आणि शोषणमुक्तीचा-आदिवासी पुनरुत्थानाचा संदेश

वार्षिक वर्गणीचे नवे दर

आपली वर्गणी वाटसरू कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवताना नाव, पत्ता, फोन नंबर व ई-मेल इत्यादी तपशील कळवावेत. वर्गणीची रक्कम रोख/मनिऑर्डर/चेक/डीडी/ऑनलाईन यांपैकी कोणत्याही मार्गाने पाठवू शकता. चेक अथवा ड्राफ्ट **'परिवर्तनाचा वाटसरू'** या नावाने असावा. वर्गणी ऑनलाईन भरण्यासाठी आमच्या www.pvatsaru.com या संकेतस्थळाला भेट द्या.

- १ वर्षासाठी वर्गणी : ₹ ४५०
- ३ वर्षांसाठी वर्गणी : ₹ १२००
- १० वर्षांसाठी वर्गणी : ₹ ३५००
- सॉफ्ट कॉपीसाठी वार्षिक वर्गणी : ₹ ३५०
- सॉफ्ट + छापील अंकाची वार्षिक वर्गणी : ₹ ६५०

● कार्यालयाचा पत्ता ●

व्यवस्थापक, परिवर्तनाचा वाटसरू,
द्वारा : द युनिक अॅकॅडमी,
चौथा मजला, गुरुकृपा कॉम्प्लेक्स,
११७९/४, शिवाजीनगर,
पुणे ४११००५.

देणारं साहित्य महाश्वेतादेवींनी लिहिलंय. त्यांच्याच साहित्यातील द्रौपदी (डोपडी) ही नक्षलवादी विचारांमुळे पोलिसांनी पकडलेली तरुणी बंडखोर नायिका म्हणून येते. तिच्यावर पाच-सहा पोलिसांनी बलात्कार केलेला असतो. ती पोलीस स्टेशनमध्ये अंगावरचे सर्व कपडे फाडून टाकते. विवस्त्र होऊन अधिकाऱ्यांना आव्हान देते. 'या करा... करा माझ्यावर बलात्कार.' अशी ही आधुनिक द्रौपदी म्हणून बंड करणारी नायिका असते. भारतीय पुराणे, दंतकथा, लोककथा, परंपरागत घटना यांचे संदर्भ घेऊन त्याच्या इतिहासाला नव्या काळातील समकालीन वर्तमानाशी जोडून प्रतीकात्मक लेखन करण्याची त्यांची वास्तवशैली खूप हृदयद्रावक आणि अंतःकरणाला पीळ पाडणारी ठरते. सरंजामी प्रवृत्ती, शेटजी-भटजी वृत्ती आणि दुःशासनातील सत्तेचा दुरुपयोग करणारी सत्ताशाही वृत्ती यांच्या संदर्भात जाणीव जागृती करणारं आणि मानवतेचा पुरस्कार मांडणारं त्यांचं साहित्य 'अक्षर' साहित्य ठरतं. स्वातंत्र्याचा नारा, अस्पृश्यता निवारण, जातिभेद निर्मूलन आणि वंचितांना आत्मभान देण्यासाठी त्यांनी आपली वाणी आणि लेखणी झिजवली.

त्यांनी कम्युनिस्टांच्या डाव्या विचारांची क्रांतिकारी चळवळ केली. नक्षली चळवळीतील न्याय आणि हक्कांच्या मूलभूततेची परिवर्तनशील विचारधारा जाणून घेतली. या चळवळी उभ्या असतात, त्या राज्यकर्त्यांच्या विरोधात जुलुमांना आवर घालण्यासाठी असे त्यांचे मत होते. ब्रिटिशांनी इथल्या व्यवस्थेतल्या सरंजामदारांना आणि प्रशासनाला हाताशी धरून राज्य केले. त्यानंतर काँग्रेस राजवट आणि कम्युनिस्टांची राजवट आली. त्यांनीही सरंजामी लोकांनाच पुढारीपण बहाल केलं. प्रशासनाचं दुःशासन तेच राहिलं. राजवटी बदलल्या तरी दलित-आदिवासी वंचितांचं, वेठबिगारांचं शोषण करणारी व्यवस्था तीच राहते. म्हणून स्वातंत्र्यातही एक पारंपरिक गुलामी या व्यवस्थेत कशी रुजलेली असते, त्याचे विदारक चित्रण हा महाश्वेतादेवी यांच्या लेखनाचा विषय होता. आमूलाग्र परिवर्तन, समाजाला घटनेच्या संवैधानिक हक्काचं जगणं मिळत नाही त्यासाठी स्वातंत्र्यातल्या या पूर्वापार चालत आलेल्या गुलामीशी झगडा करण्याची चळवळ हाच त्यांचा जगण्याचा उद्देश होता. जुलमी शासनाच्या विरोधात आदिवासींच्या हक्कांचा लढा उभारून स्वातंत्र्य प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी लढा दिला. कामगार, दलित, वंचित घटकांचे शोषण करणारे धनाढ्य लोक आणि दुःशासनास त्यांनी जबाबदार धरले. हे शोषणकर्ते जेव्हा कम्युनिस्ट सरकार आलं, तेव्हा रात्रीतून त्या पक्षात कसे मागच्या दाराने प्रवेशित झाले याचं विदारक वास्तव चित्र त्यांनी लेखनातून निर्माण केलं. वरून शांत, परंतु आतून सतत धगधगती अशी त्यांची वृत्ती होती.

त्यांनी पद्मश्री आणि पद्मविभूषण ह्या सन्मानाने सन्मानित करण्यात आलं. त्यांची समाजसेवा आणि साहित्यसेवा त्यामुळे त्यांना गौरविण्यात आलं. त्यांना भारत सरकारने 'ज्ञानपीठ' पुरस्काराने सन्मानित केले. त्या कार्यक्रमासाठी नेल्सन मंडेला यांची उपस्थिती लाभली होती. मंडेला यांच्या हस्ते हा गौरव म्हणजे जागतिक नोबेल पारितोषिकाच्या तोडीचा हा सन्मान होता. त्यावेळी नेल्सन मंडेला म्हणाले होते, 'शी होल्डस अ मिरर ऑफ द कन्डिशन्स ऑफ द वर्ल्ड ॲज वुई एन्टर द मिलेनियम.' त्यांच्या जीवन आणि साहित्याचा हा गौरव म्हणजे मोठा सन्मानच म्हटला पाहिजे. नव्या शतकाच्या उदयाबरोबरच जगाच्या समकालीन वर्तमानाचे वास्तव यथार्थपणाने प्रतिबिंबित करणारा आरसा म्हणजे महाश्वेतादेवी यांचं साहित्य, असाच त्यांचा सार्थ विचार होता. साहित्यनिर्मिती आणि त्याचे मूल्यमापन या संदर्भात महाश्वेतादेवी म्हणतात, 'साहित्याचे मूल्यमापन करताना फक्त भाषा, शैली, आकृतिबंध इत्यादी निकषांवर भर देणे चुकीचे आहे. साहित्याचे मूल्यमापन हे इतिहासाच्या पार्श्वभूमीवर झाले पाहिजे. लेखकाचा लेखनकाळ, त्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी लक्षात घेतली नाही, तर त्याचे स्थान नेमकेपणाने ठरवता येणार नाही.' हे त्यांच्या साहित्यसमीक्षा आणि मूल्यमापनाचे विचार नव्या पिढीला उपयुक्त ठरतील. अशा महाश्वेतादेवी एक सुजाण, समकालीन लेखिका, बंडखोर क्रांतिकारी कार्यकर्ती, वंचितांच्या प्रश्नांना वाचा फोडणारी, लढाऊ लेखणीची शिलेदार, जननिष्ठ जाणिवांची भारतीय संस्कृतीची आणि भाषांची गर्भनाळ ओळखणाऱ्या विचारवंत होत्या. वयाच्या नव्वदाव्या वर्षी त्यांनी जगाचा निरोप घेतला. त्यांची साहित्यसंपदा हीच त्यांची अक्षरगाथा असून त्यांच्या अमरत्वाची ती साक्ष आहे.

संवेदनेपासून संज्ञेकडे : सय्यद हैदर रझा

सुधाकर
यादव

भारताच्या स्वातंत्र्यानंतर भारतीय चित्रकारांची जी पहिली पिढी म्हणून जगासमोर आली, त्यात एम. एफ. हुसेन, के. एच. आरा, एफ. एन. सुझा, बाकरे आणि गाढे हे प्रोग्रेसिव्ह ग्रुपचे कलाकार म्हणून कलाक्षेत्रात जास्तच प्रभाव टाकून होते. यातच एस. एच. रझा हेही महत्त्वाचे आणि आपल्या समकालिनांपेक्षा वेगळे होते. हे वेगळेपण कायमच राहिले.

एस. एच. रझा प्रचलितपणे निसर्गचित्रे काढत होते. इतर निसर्गचित्रकारांपेक्षा त्यांच्यात जे वेगळेपण होते, त्या वेगळेपणानेच ते पारंपरिक निसर्गचित्रणापेक्षा वेगळा निसर्ग रंगवत होते, त्याचाच विस्तार होत होत निसर्गापेक्षाही सृष्टीचेच सौंदर्य रंगवण्यापर्यंत झाला.

रझा यांचे निसर्गचित्रण केवळ समोरचे दृश्य नव्हते. दृश्य असलेच तर फक्त निमित्त असायचे. बाकी रंग, आकार हे फक्त संवेदनशील असायचे. भारतातून रझा पॅरिसला गेले तरी निसर्गचित्रणाची ओढ कायमच होती. संपूर्ण भारतभर फिरून या भूमीची चित्रे काढणाऱ्या रझांना या परक्या भूमीतही वेगळेपण जाणवले. आणि पॅरिसची निसर्गचित्रणे भारतातल्यापेक्षा वेगळी होत गेली. आपल्याबरोबर पॅरिसमध्ये निसर्ग रंगवणारे चित्रकार वेगळेच निसर्गचित्रण करतात. त्यांच्या चित्रात झाडा-फुलांपेक्षा शहरातले एखादे चर्च, रस्ते आणि सभोवताली शहर. रझांच्या चित्रातही चर्च, रस्ते आणि शहर येत गेले. परिणामी इथला मुक्त निसर्ग पॅरिसमध्ये भौमित्तिक आकारात येत गेला. रझा अगोदरच दृश्यापेक्षा संवेदनशीलता चित्रात मानणारे होते, हा बदलही संवेदनशीलतेने स्वीकारला.

रझांच्या निसर्गचित्रणात चर्च, शहर, इमारतीने ती भौमिमिक होती. रंगरचनेचे संपूर्ण स्वातंत्र्य घेणाऱ्या रझा यांच्या चित्रात आगंतुकपणे सूर्य येतो आणि तोही काळा. संपूर्ण चित्राचा तोल सांभाळण्यासाठी रिकाम्या

ईमेल : suya1957@gmail.com

आकाशात एखादा आकार गरजेचा वाटतो. आकाश आकाश आहे, हे दाखवणारा आकार सूर्य हे आपोअपच ठरून जाते. आणि रंगसंगतीचा तोल सांभाळण्यातून तो काळा रंगवला गेलाय हे उशिराने कळते. 'काळा सूर्य' ही विसंगती सोपी नव्हती. त्याच्या समर्थनाची गरज होतीच.

सर्व रंगांची ऊर्जा एकत्रित होते. त्यावेळी सर्व रंग एकदुसऱ्यात मिसळतात. या एक दुसऱ्यात मिसळलेल्या रंगातून होणारा रंग म्हणजे 'काळा' हे रंगशास्त्र सांगते. म्हणजे रंगांची, संपूर्ण उर्जेची जाणीव रझांना झालीच आणि सूर्य तर अर्जावू आहेच. गतीने येणाऱ्या सूर्यप्रकाशात पुन्हा सर्व रंग असतात, परंतु रंगाला गती मिळाल्याने तो पांढरा दिसतो हे विज्ञानशास्त्र सांगते. म्हणून अवकाशातला सूर्य पांढरा असणे आणि चित्रातला सूर्य काळा असणे दोन्हीही शास्त्रशुद्धच म्हणजे निसर्गचित्रण करताना रझा फक्त संवेदनशीलता राखत गेल्याने ते शास्त्रशुद्ध रचना करत होते.

काळ्या सूर्याचा विस्तार पुढे होत गेला आणि चित्राला पोषक नसणारे इतर आकार हळूहळू नाहीसे झाले. आणि उरला फक्त काळा सूर्य, संपूर्ण चित्रभर फक्त एकच एक 'काळे वर्तुळ.' या वर्तुळातही उर्जेची जाणीव होत होती. निसर्गचित्रण करणाऱ्या रझांच्या चित्रात 'सृष्टीचे चित्रण' येत गेले. सर्वच सृजनासाठी उर्जेची गरज असते. ऊर्जा देणाऱ्या सर्वच गोष्टी रझांच्या विचारांचे केंद्र झाल्या. सूर्य ऊर्जा देतो, जमीनही ऊर्जा देते, बीजात ऊर्जा असते. अंतिमतः ऊर्जा देणारा एक सूक्ष्म स्रोत असतो, तो म्हणजे बिंदू.

संवेदनशील चित्रण करणाऱ्या रझांनी आपल्या चित्रांतून ही एक बिंदूची संज्ञाच मांडली आहे. निसर्ग रंगवणारे रझा सृष्टीच रंगवणारे झाले. त्यांच्या चित्राला मग सृष्टीरचनाशास्त्राचाच आधार झाला. अग्नी, वायू, तेज, जल, पृथ्वी हे असे सृष्टीरचनेचे घटक आहेत. रझांच्या चित्रांचे घटक हेच आहेत. यातून जे पहिले सूक्ष्म निर्माण होते ते 'बिंदू.'

वारा पाण्याचा प्रवाह आपल्याबरोबर अनेक गोष्टी प्रवाहात घेऊन प्रवाहाची गती आणि लय राखतो. तसे रझा यांनी आपल्या चित्रप्रवाहात सभोवतालचे साहित्य, संगीत, नृत्य, परंपरा, अध्यात्म हे सारेच सामावून घेऊन आपल्या चित्राची गती आणि लय वाढवली. म्हणून त्यांच्या चित्राच्या विश्लेषणात संपूर्ण सौंदर्यदृष्टी येते. फक्त दृश्यकलेचेच सौंदर्य नाही. संवेदनेने सुरू झालेला एक कलाप्रवास एक संज्ञा देऊनच संपतो.

●

कविता

तुळशी परब / निमित्तबिमित्त

ते जग मलाही हवं होतं
ज्यात तू जगत होतास
प्रतिमांचे साचे उपसून
थोर होता येण्याच्या
शक्यता तरळतात ज्या अंतराळात
नि गांडूपणाला येते झळाळी
आगळिकीची
तो ऐवज घेऊन चिक्कार खेळले मी
कधीच न खेळलेली भातुकली
ते तुझं निर्व्याज की काय म्हणतात
तसं हसणं
देऊन टाकायचं होतंस ना मला
आणि भेटल्यावर कधीही
सहज हातात हात गुंफून घेणं
स्पर्शाच्या वेल्हाळ व्यवस्थेत
तुला सांगायचं राहूनंच गेलं
खरं तर तू कधीच आउटडेटेड झालास
नव्हे तुमची संबंध पिढीच
कंटाळवाणी आउटडेटेड झालीये
विलक्षण दुखू लागतात
आमची बोटं
तुमच्या थोरपणाची
सूक्तं लिहून लिहून
हे दुखणं नेमकं कशाचं आहे
ही तडफड
हे तुटणं
हे अधांतरी तितरबितर
हे छळवाद्यांनो
जगू द्या आम्हाला
आमचा हिंस्र कोलाहल
शांतपणे
बाकी शहादा कार्यकर्ता
कवी असणंबिसणं
कमिटेड
हे सगळं सगळं राहिलंच
सोनेरी पान बनून फडफडत कायमचं
आता तुझ्याच भाषेत सांगायचं तर
एकमेकांना सौंदर्यपूर्ण करण्याच्या
सगळ्या शक्यता निर्घृणपणे नष्ट करत

– प्रज्ञा दया पवार

बहादूर थापा आणि इतर कविता

किशोर सानप

नाशिक जिल्ह्यातील बागलाण तालुक्यातल्या सटाणा गावखेड्याच्या कुशीत जन्मलेल्या कवी संतोष पवारच्या कवितेची नाळ गावकुशीतल्या माणसांशी मुळांपासूनच जुळलेली दिसते. कृषी पदविका मिळाल्यावर जिल्हा परिषदेत ग्रामसेवकाची नोकरी करून, गावाच्या विकासात त्याने हातभार लावल्याचे उदाहरण आहे. पुढे मराठी विषयात एम. ए. झाल्यावर आणि व्याख्याता पात्रता चाचणी उत्तीर्ण झाल्यावर रयत शिक्षण संस्थेच्या पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील मंचर गावी स्थित, अण्णासाहेब आवटे कॉलेजात साहाय्यक प्राध्यापक म्हणून तो कार्यरत आहे. नव्वदोत्तर पिढीत कवितेच्या प्रांतात उमेदवारी करणाऱ्या ह्या कवीने मराठी कवितेला वाहून घेतले.

प्राकृती प्रिंटर्स, सातारातर्फे साहित्य संस्कृती मंडळाच्या नवलेखक अनुदान योजनेत 'कबुली' हा पहिला कवितासंग्रह १९९५ मध्ये प्रकाशित झाला. एल्गार प्रकाशन श्रीरामपूरच्या वतीने 'कविता मला भेटली' ही भित्तीपत्रक कविताही १९९७ मध्ये प्रकाशित झाली. २००३ मध्ये 'भ्रमिष्टाचा जाहीरनामा' ही दीर्घकविता मुंबईच्या अभिधानंतर प्रकाशनाने प्रकाशित केली. 'अभिधा' नियतकालिकाच्या दशकपूर्ती काव्यस्पर्धेत पंचवीस हजार रुपयांचा पुरस्कार दिलीप पुरुषोत्तम चित्रे, सतीश काळसेकर, भुजंग मेश्राम या ज्येष्ठ कविमित्रांच्या परीक्षक मंडळाने या कवितेला बहाल केला. कवी संतोष पवार हे नाव मराठी कवितेच्या क्षेत्रात रुजविण्याचे भाग्य या कवितेच्या सृजनाने संतोषला मिळाले. कविताही गाजली आणि कवीचाही गाजावाजा झाला. पुढे २००८ मध्ये पॉप्युलरने 'पिढीपेस्तर प्यादेमात' हा अनोखा आणि वेगळेपणाची छाप उमटविणारा कवितासंग्रह प्रकाशित केला.

कवीची काव्यसृजनाची चढती कमान आकाराला येत असतानाच,

ईमेल : dr.kishorsanap@gmail.com

पुण्याच्या साधनाने कवीला साथ दिली. दरम्यानच्या काळातील व्यक्तिचित्रणात्मक कवितांना साधनातून प्रसिद्धी मिळाली. २०१५ मध्ये साधना प्रकाशनाने 'बहादूर थापा आणि इतर कविता' हा पंचवीस व्यक्तिचित्र कवितांचा संग्रहच प्रसिद्ध केला. संतोषची कविता छंद-मुक्तछंदाचे विविध प्रयोग करीत, आपल्या भोवतालातील माणसांचं जगणं आणि दुखणं मांडू लागली. कारुण्य हे संतोषच्या कविता सृजनाचं मौलिक अधिष्ठान आहे. खरं तर आपल्या भोवतालातल्या सृष्टीच्या सृजनकळा-दुःखवेणा, व्यवस्थेची दुखणी आणि मरणासन्न अवस्थेला पोहोचणाऱ्या माणसांच्या व्यथा-वेदनांना, संतोषने कवितेच्या शब्दशैली माध्यमातून उजागर केले. कवीच्या कारुण्यशैलीने आपल्याच भोवतालातल्या सजीवांच्या जगण्यातल्या दुःखकळांना आकार दिला. आशयाभिव्यक्तीच्या चिंतनशील लयबद्ध रचनांनी प्रतिभावंत सृजनशीलतेची स्वयंसिद्ध पायवाट संतोषच्या कवितांना मिळू शकली. संतोषच्या कवितेचे वेगळेपण त्याच्या आजवरच्या काव्यनिर्मितीतून सतत जाणवत राहिले. परिणमतः संतोष पद्माकर पवार, ही नाममुद्राही नव्वदोत्तर मराठी काव्य प्रांतात रुजली.

कवीची भूमिका :

जिवंत स्फोटकासारखा आयुष्य जगत आलो...

कवीला, कविता ह्या आपले आत्मचरित्रच वाटतात. व्यक्तीचे जीवन भोवतालातल्या माणसांनी आणि सामाजिक दुखण्यांनी अधिक व्यापलेले आणि अधिकाधिक गुंतागुंतीचे अनाकलनीय होत जाते. भोवतालातल्या माणसांच्या जीवनात दाही दिशांनी रसरसून काठोकाठ जीवनातली पात्रं दुःखांनी भरून वाहताना, कवीसुद्धा दुःखभोगाचाच एक अतूट हिस्सा बनतो. दुःखाशी, व्यथा-वेदना-दुःखकळांशी समरसून झुंजतो. भोवतालातले दुःख सृजनजाणिवांना व्यापून जगण्याच्या दुःखवेणांना कवितेचा आकार देतात; तेव्हाच कवीला आपल्या काव्यनिर्मितीच्या झाडाखाली विश्रांतीने पहुडण्याची जागाही मिळते. कवी म्हणतो, मी चालत्या-फिरत्या जिवंत स्फोटकासारखा आयुष्य जगत आलो... आयुष्याचा कोपरा न् कोपरा कवितांनी व्यापलेला आहे... माझ्या आयुष्यातील सर्वांत सुंदर गोष्ट कोणती असेल, तर माझे कवितालेखन... माझ्या लेखनगुणाने जे माणूसपण मला बहाल केले आहे, त्यासाठी लिहिते राहणे ही माझी

सर्वत्र उपलब्ध

'वाटसरू'च्या वाचकांनी वाचलंच पाहिजे असं
'समकालीन प्रकाशना'चं ताजं पुस्तक



सलोख्याचे प्रदेश | सबा नक्वी
अनुवाद : प्रमोद मुजुमदार

पुरीच्या भगवान जगन्नाथाचा मुस्लिम भक्त
अयोध्येतल्या राममंदिराचा मुस्लिम व्यवस्थापक
सुंदरबनमधील मुस्लिम देवता आणि तिचे हिंदू-मुस्लिम भाविक
मुहर्रम साजरा करणारी आंध्र प्रदेशातली हिंदू सार्वजनिक मंडळं
सर्वधर्मीयांच्या नवसाला पावणारी तमिळनाडूच्या चर्चमधील देवी
एकाच वास्तूत हिंदू-मुस्लिमांना सामावून घेणारं कर्नाटकातलं देवस्थान

अशी अनेक उदाहरणं आहेत धार्मिक सहिष्णुतेची आणि सहअस्तित्त्वाची. चहूबाजूंनी धार्मिक कट्टरतेचा रेटा वाढत असतानाही मानवतेला महत्त्व देणाऱ्या संयुक्त धार्मिक परंपरा सांभाळणाऱ्या भारतीयांची. सबा नक्वी या सुप्रसिद्ध पत्रकर्तीने भारतभर फिरून घेतलेला लेखाजोखा.

किंमत २०० रु.

समकालीन प्रकाशन

अनिवार गरज आहे... एरवी हिंस्त्रताच आहे आतमध्ये भरलेली. व्यवस्थेची म्हणून जी काही दुखणी आहेत, त्यांच्यासाठी माझी कविता तुटून पडते. त्यांच्या शब्दांना कवितेतून जागा मिळवून देते. अनेक दुखणाईतांची कहाणी माझ्या अंतरंगात घुसमटत असते. मात्र फारच कमी दुखणी मलाही मांडता येतात. सर्वांच्याच वेदनांना उद्‌गार देता येत नाही, ही माझी हतबलता मला रात्रंदिन छळत राहते... स्थलांतर, भटकंती, असुरक्षितता, सामाजिक दुखणी, भोवतालातल्या माणसांची जीवघेणी दुखणी; यामुळे मनात कायम वास्तव्य करणाऱ्या अस्वस्थेला आणि व्यक्तिगत जगण्यातील दुःखांना, रागलोभादींना नियंत्रित करण्याचे सामर्थ्य कवीला कवितेतून मिळते. एकुणात, संतोषची कविता जगणाऱ्यांच्या दुःखकहाण्या व्यक्त करतानाच, कवीलाही जगण्याचे आत्मबळ पुरविते. कवीचा कवितेवर अंकुश असतो, परंतु संतोषच्या कवितेचाच त्याच्या जगण्यावर अंकुश आहे. खरं तर हीच प्रतिभावंताची आणि कलावंताची जगण्याची उमेद, प्रेरणा, प्रत्यक्ष असायला हवी. कवी आणि कवितेचे हे अतूट नाते, कवीच्या नैतिकतेलाही परिमाण देत असते.

बहादूर थापा आणि इतर कविता

बहादूर थापा आणि इतर कविता या संग्रहात एकूण पंचवीस माणसांच्या जीवनातील सुख-दुःखांच्या कहाण्या कवीने साने गुरुजींच्या कारुण्यस्वरांनी शब्दबद्ध केल्या आहेत. साधनाने आकर्षक रूपात हा अनोखा व्यक्तिचित्रे असलेला काव्यसंग्रह प्रकाशित केला आहे. नेपाळातून पहारेदारी करायला आलेल्या आणि पैसा कमावून आपल्या कांचीसोबत लग्न करण्याची स्वप्नं रंगविणाऱ्या बहादूर थापाचं प्रतीक गिरीश सहस्रबुद्धे यांनी मुखपृष्ठावर चित्रित करून; निळ्या आभाळाकडे पाहत कांचीच्या भेटीची स्वप्ने पाहणाऱ्या कांचाला रक्तरंजित मार्गावरून चालणे भाग पडत असल्याचं शोकचित्र रेखाटलं आहे. सर्वच करुण कहाण्यांतली बायामाणसं त्यांच्या दुःखांसह अंतरातल्या शोकचित्रांतूनही प्रकटत जातात. व्यक्तिचित्रे साकार करणारी आतली चित्रेही आशयघन आहेत.

आयुष्यभर समाजातील माणसांच्या दुःखमुक्तीसाठी संघर्षरत असणाऱ्या, अलक्षितांच्या जगात वावरणाऱ्या, अनिल अवचटांसारख्या सामाजिक कार्यकर्त्याला-लेखकालाही, इतकी अस्सल माणसं खूप दिवसांनी साहित्यातून भेटल्याचा आनंद होतो. व्यंकटेश माडगूळकरांच्या माणदेशी माणसांची आठवणही ताजी होते. माणदेशी माणसं कथेच्या वळणावर भेटतात, तर या संग्रहातील माणसं कवितेच्या वळणावर भेटतात. मुक्तछंदातही लय आहे परंतु हे लिखाण कधी गद्याकडेही झुकते. म्हणजे गद्य आणि पद्य यांच्या सीमारेषेवरची ही कविता आहे काय? असा निर्मितीबाबत नाजूक प्रश्न प्रस्तावनेतच उपस्थित केला. शिवाय कवीने हा विचार न करता ती लिहिली, हे बरंच झालं. तसे करण्याचा धीटपणा, निरागसता, सहजता त्यात आहे, अशी पाठराखणही केली. शेवटी साठ सालापर्यंतच्या मराठी साहित्यात फक्त मध्यम वर्गीय जीवन व त्यातल्या समस्या येतात; भोवती एवढं प्रचंड जग पसरलं आहे, याची या साहित्याला कल्पनाच नसावी. ग्रामीण व दलित लेखकांनी साठनंतर हे वास्तव मराठी साहित्यात आणले. संतोषची कविता असेच डोळे उघडण्याचे काम करणारी आहे. प्रेमचंदांच्या साहित्यात जमीनदारही अस्सल असतो आणि चांभारही. तसं मराठी साहित्यात आता आता व्हायला लागलंय. संतोषची कविता त्याचाच एक भाग आहे... वास्तव जगातील अलक्षित माणसांच्या जीवनदुःखांच्या कहाण्यांनी संतोषची कविता गद्य-पद्याच्या सीमारेषांना धूसर करणाऱ्या करुणामय सृजनशीलतेतून सृजन पावली आहे.

कवीच्या भोवतालातली माणसं

संतोषच्या कवितेतील उपेक्षित, अत्याचारित, व्यवस्थेत पिचली जाणारी समकक्ष माणसं यापूर्वीही साठोत्तरी मराठी साहित्यात कथा-कादंबऱ्यांतून आपल्याला भेटतच आलेली आहेत. परंतु ती साहित्यातील वास्तव व्यक्त करणारी पात्रे म्हणून भेटत आली. कलावंताच्या साक्षात जगण्याशी निगडित अनुभवाचाच एक अतूट रक्तसंबंध असणारी, भोवतालातील निखळ माणूसपण जपणारी माणसं, कवीच्या जीवनानुभूतीचाच भाग म्हणून बालपणीचे मित्र, जिवाभावाची माणसं, जात, पंथ, लिंग, धर्म आदी सोपस्कारांपेक्षा माणुसकीचा धर्म मानणारी ही माणसंच, कवितेचा सहज-निरागस आकृतिबंध धारण करून, कवितेच्या निमित्ताने भेटतात. भोवतालातल्या रंजल्या-गांजल्या-पिचल्या लोकांत माणुसकीने वागून, खरा तो एकचि धर्म जगाला प्रेम अर्पावे, हे भव्यदिव्यतेचे उदात्त

जगणे कवीला दिसते. तेव्हा कलाकृतीत जिवंत माणसांचे स्वभावधर्म अधोरेखित करण्याचे वेगळेपणच, कवीच्या प्रतिभा सामर्थ्याचे आत्मबळ असल्याचेही जाणवते. रूप-रचना-शैलीचे एकजीव आशयद्रव्य मानव्याच्या अवकाशात कवितेच्या माध्यमातून अंकुरित करण्याची नैतिकताच कवीच्या प्रतिभाधर्माचे सृजनशील-संवेदनशील-करुणामय अधिष्ठान बनते. संतोषच्या कवितेचे वेगळेपण या अंगाने अधोरेखित करता येणे शक्य आहे.

'बहादूर थापा आणि इतर कविता' या व्यक्तिचित्रांच्या कवितासंग्रहात संतोषच्या अनुभवक्षेत्रात कवीच्या सहजीवनाचा भाग बनूनच रभाजी कडलग, गुजाबाई धनगरीन, हिराबाई जाफरमियाँ, कमलबाई भाऊराव भानुसे, चांगू किसन रणमळे, बाळू पिराजी, छबू, कल्ल्या, शैला, सोन्याबापू, तम्मा, ताई, रोडू, धुरपदा, सरूबाई, न्हाईबाबा, सोनी, बहादूर थापा, बुवा, जॉन, मुकी, नागू, बळ्या गारुडी, सोमा, फ्रँकी आपल्याला त्यांच्या दुःखकहाण्या सांगतात. या सर्व कहाण्यांतून कवी ह्या दुःखी माणसांच्या अंतरंगात वसत असलेल्या मानव्याचे उदात्त दर्शन घडविताना, तोही त्यांच्याच जीवनाचा साक्षीदार बनून त्यांच्यातील मानुष निर्मळ झऱ्यात चिंब भिजून जगातल्या सुरक्षित जगणाऱ्या लोकांच्या मुखवट्यांच्या खोट्यानाट्या कृत्रिम भावभावनांनी बरबटलेल्या सुखवस्तू जीवनाला, अस्सल जगण्याचं अमृतदर्शन घडवितात. हीच पिचलेली माणसं ताठ बाण्यानं परोपकार करीत जगतात. संस्कृतीचे संचित जगतात. जपतात. सुख जवापाडे तर दुःख पर्वताएवढे जरी सामोरे आले, तरी दुःखाशी दोन हात करीत आयुष्याच्या अंतापर्यंत झुंजत झुंजत मरतात. जीवनाच्या आखाड्यात छातीला माती लावून मरतील; परंतु दुःखांना धोबीपछाड मारूनच जगण्याची नैतिकता आणि माणुसकीचा जीवनधर्म पार पाडतील. जगण्याच्या आखाड्यात दुःखांनी पराभूत न होता, दुःखांनाच पराभूत करून नैतिक आणि ताठ बाण्याचे जगणे; हेच जगण्याचे सर्वोच्च मूल्य असल्याचे दर्शन जगाला घडविणारा; कवीची नैतिकता जपणारा माणूसही प्रत्येक कवितेत निवेदक-रचिता-निर्माता-मूल्य संरक्षक म्हणून, अमूर्त रूपात प्रकटताना जाणवतो. तो कवी संतोष पवारच असतो.

काळीत पेरलेला होता कायमचा

रभाजी कडलग काळीत पेरलेला होता कायमचा.

'वाटसरू'चे प्रतिनिधी

अहमदनगर : प्रा. विजय ठाणगे : ९८२२६७१८४५
अकोला : डॉ. संतोष कायंदे : ९४२१७४८७८२
अमरावती : डॉ. प्रशांत विघे : ९३२६८७७७४९
औरंगाबाद : डॉ. भारत गोरे : ९४२२४७८०००
उदगीर : बालाजी सूर्यवंशी : ८६००४२१२५६
बारामती : वसंत घुले : ९४२२५११००६
बीड : विशाल गोरे : ९५४५५२८८०२
बुलडाणा : सुरेश साळवे : ९४२०३३६६६७
चिपळूण : प्रा. विराज महाजन : ९४२११४०७६७
धुळे/जळगाव : प्रा. संदीप नेरकर : ९४२३४९४७८०
जालना : प्रा. बळीराम कटारे : ९४०३८४२६५५
कोल्हापूर : सूर्यकांत गायकवाड : ९६७३१६०३७२
लातूर : डॉ. उमाकांत जाधव : ८२७५५९९७७७
परभणी : प्रा. पी. बी. मेणे : ९४२१३९२१३०
गजानन अंभोरे : ९८२३८०४१४१
पालघर : डॉ. चंद्रकांत गायकवाड : ९५०३८१३९५५
मुंबई : प्रा. हर्षद भोसले : ९८६९१२७९७२
नवी मुंबई : प्रा. संदीप घोडके : ९८६९१८५७४७
नाशिक : प्रा. प्रशांत देशपांडे : ९४२२७६०६०४
नंदूरबार : धनराज पाटील : ९९२२०४२१२१
नांदेड : प्रा. राजेंद्र इंगळे : ९४२३३०५८२७
प्रा. सुग्रीव फड : ८९७५४३८७३६
रायगड : प्रा. व्यंकट खटके : ९४२१२५३७१०
सातारा : प्राचार्य सीताराम गोसावी : ९८५०१५६१६६
सांगली : ज्ञानेश्वरी पाटील : ७५८८५८६६७६
सोलापूर : रवींद्र मोकाशी : ९६१९६६६६५६
ठाणे : हर्षल पाटील : ९८२१८६१५६७
वर्धा : डॉ. अरविंद सोमनाथे : ७५८८१८७३०९
यवतमाळ/नागपूर : प्रा. राहुल बावगे :९४२३४०३३०८

नेटानं बारदाणा वाढवला. गावातल्या सार्वजनिक उत्सवात-दिंडीत सहभागी होत नेटानं दिंडीकऱ्यांच्या भाकरी-पिठलं-आमटीची व्यवस्था करणारा. गावातल्या गढूळ राजकारणी दहशतीला कायम विरोध करणारा. रभाजीच्या उदारपणाला त्याचीच बायका-मुलं कंटाळून त्याला म्हातारपणात अडगळीत टाकतात. तुझी बैलजोडी आणि नांगराचा जुपा, तुझ्या हातातून कधी नाही गेला, कोणतंही रान नाही पडू दिलं कधी खाटं, इसाव्याच्या बिगर, राहिलास पेरत-उगवत-पोसत आणि पोसवत... आयुष्यभर काबाडकष्टानं कमावलेली माती उजवत राहणाऱ्या रभाजीच्या नशिबी अखेर एकला चालो रे, ही अवस्था येते. रभाजी तरी वरून ताठ परंतु आतून खचलेला. शेवटी,

शोधाशोध झाली...
तर बरडाच्या वावरात तू मुठीत हरबरे घट्ट पकडून
पाभरीच्या मागं पडून, जीव गेलेला...
आणि तू कधी हैऽऽक म्हणतोस याची वाट पाहत
बैल तिथंच उभे ठाकलेले!

रभाजीची मुकी जीवजित्रांबं जीव लावणारी, तर रक्ताची घरातली माणसं रभाजीच्या जीवनाची मातीमोल किंमत मानणारी. सजीवांच्या भावभावनांतील हा विसंवाद उभारीतच माणसाच्या जीवनाला पोखरत जातो. मुक्या जीवजित्रांबांनी ओवाळलेल्या जीवजाणिवांचे अश्रू डोळ्याच्या आड लपवत, रभाजीसारखी जुनी जाणती माणसं काळ्या मातीतच कष्ट करताना विलीन होतात. काळीत पेरणे, उगवणे आणि समर्पित होणे; हाच तर जगाच्या पोशिंद्याचा जैविक आणि नैतिक धर्म असतो.

गुजाबाई धनगरीन, व्हतीस तू एक गुजाबाई धनगराच्या रानातली, साक्षात जिवंत भुतासारखी... बैलगाडी हाकायची, नांगर धरायची, पेर करायची, सोंगणी करायची, शेतकामाच्या मागं असं लागायची, दहा शेतगड्यांचं काम एकटीच करायची, तुझ्या शेतातली तू महाराणीच होती, आपल्या साम्राज्याची तू मालकीण होती, पण नंतर नंतर कोणीतरी बछडे पळविल्यावर, लोकवस्तीवर चालून जाणाऱ्या वाघिणीसारखी तू चवताळून होती... गुजाबाईच्या धाकात वाढलेले तिचेच जग तिच्यावर उलटले. छंदीफंदी नवटाक पोरं-नातवांनी म्हातारपणात शहरी टग्यांना जमीन प्लॉटसाठी विकली. थकले हातपाय. डोळ्यात पडलं फूल. दिसदहाड आंधळी. शेवटी अख्ख्या महाराणीची भिकारीण होताना पाहणं, कवीच्या वाट्याला येतं. तुला शेवटचं गुजाबाई पाहिलं, सगळी वाचा गेलेली, आंधळी होऊन बसलेली, भिकारीण झालेली... काय हे नव्या पिढीचे क्रौर्य की औदार्य? बदल की परिवर्तन? ग्लोबल युग की ग्लोबल मरणयुग? निकामी अशांना ठार मारण्याचं क्रौर्य भांडवली लोकांच्या मनातून, सर्वहारांच्या नव्या पिढींच्याही मनात आपसुख संचारत गेलं. म्हाताऱ्या अडगळींना बेदखल करून, मृत्युमार्गावर त्यांचं बोट सोडून देणारे बदल, आज मोठ्या प्रमाणावर गावखेड्यातून शहरी वसाहतीत स्थिरावत असल्याचे कटू वास्तव दाहकपणे कवी एकेका व्यक्तिचित्रांतून प्रकट करीत जातो. सुन्न आणि अस्वस्थ करणारे हे सर्व जीवनदर्शन कुण्याही माणसाच्या अंतःकरणाला मानव्याचा-कारुण्य पाझर फोडणारे आहे.

जुन्या म्हाताऱ्या पिढ्यांच्या श्रीमंतीला नतद्रष्ट छंदीफंदी नव्या पिढ्यांची दीठ लागल्याचे सार्वत्रिक दुःख, गावखेड्यातल्या काळीत राबणाऱ्या जाणत्या पिढीच्या वाट्याला आले. कपाळी ईश्वरी बुक्का म्हणून माती लावणारी, जाणत्यांच्या पिढीची मृत्युपंथी घरघर सुरू झाल्याचे, नव्या पिढीचे उतमात करणारे जीवघेणे वास्तव ग्लोबल गावकुसात अस्तित्वात आले. परिणामतः जुनेजाणते मायबाप अकाली शॉकनेच मरू लागले. तर शॉक पचवूनही जगणं असह्य झालेले शेतकरी मोठ्या प्रमाणावर आत्महत्या करू लागले. रभाजी-गुजाबाईच्या जाणत्या पिढीचं हे मरणप्राय वास्तव आकारात असतानाच, शहरी वास्तवात नव्या नतद्रष्ट पिढीलाही भय-दहशतीच्या असुरक्षित जगण्याचे वेडावलेले वास्तवही हळूहळू ग्लोबल युगातच आकारत गेले. जीवनातील जगतानाचे जीवघेणे बदल संवेदनशीलपणे टिपण्याचे सामर्थ्य कवीच्या कवितेनेही कवीला बहाल केले. सोबतच हतबलता-अस्वस्थता-घुसमटही अधोरेखित केली.

आमची भूक तिथं वाजत असती!...

हिराबाई जाफरमियाँ - पाच लेकरं असलेल्या जाफरमियाँला तुळजापूरच्या भवानी मंडपात सापडली. खजुराच्या झाडाला नारळ लटकवावं, तशी तू झालीस हिराबाई, जाफरमियाँची बिवी. रीतसर झालीस तू मुसलमानीन अर्ध्या उमरीत. गेली भरपूर सालं नि पूर वसरलेल्या काडी-कचऱ्यागत उरली हिराबाई नि

जाफरमियाँ. तोही झाला एक दिस पैगंबरवासी नि तुला ज्या मौलवींनी दिल्ती इस्लामची शपथ, तोही नाही राहिला जगती...वीस वर्षांनी हिराबाई तुळजाभवानी समोर सौभाग्याचं कुंकू हिरवे चुडे विकत बसलेली असताना भेटल्यावर-संतोसभाऊ, मला मेल्यावर लोक जाळतील का पुरतील रे? या प्रश्नानं धास्तावलेली. गुण्यागोविंदानं संसार करणाऱ्या माणसांच्या वाट्याला येतात. बेजार करून सोडणारे धर्म आणि व्यवस्थेचे न सुटणारे प्रश्न. जगताना धर्माची गरज नाही, परंतु म्हातारपणात मात्र मरणोपरांत मुक्तीचे आत्मा-परमात्मा प्रश्न माणसाला छळत राहतात.

कमलाबाई भाऊराव भानुसेला समाजात तरण्या मुलीसह जगण्याचे नैतिक-न्याय्य भान बाळगताना, दोघींचीही वाताहत होत जाणंच अखेरीस नशिबी येते. पोलिस, आमदार, समाजातील टगे यांच्या वासनांना बळी पडल्यावरही, गिधाडांच्या गर्दीत तिचा घरंदाज आवाज चिरडला जातो. चांगू किसन रणमळे अचानक गावातून गायब होतो. सरकारदरबारी मयत म्हणून नोंद झाल्यावर, काही वर्षांनी तो अचानक गावात परततो. आपण जिवंत असल्याची नोंद सरकारदरबारी करताना वेडावून बरळायला लागतो, भारत माझा देश आहे, सारे भारतीय माझे बांधव आहेत... सख्या जन्मदात्या भूमीनं तुला कागदावाचून नाकारलं होतं. तुझं एक जिवंत प्रेत होतं, जे माणसासारखं राहत होतं, पण त्यांच्यासाठी नावा-गावाचं कोणी नव्हतं!... असे अनेक चांगू किसन रणमळे भोवतालात जगत असतात. माणसं असतात पण माणसंच त्यांच्याशी माणुसकीनं वागत नाहीत. कायमचं तुटलेपण त्यांच्या वाट्याला येतं.

बाळू पिराजी - दूर तिकडे मिर्झापूरच्या काळ्याकभिन्न डोंगरात खानदानासह राहुटी करतो. बाळू एकटाच असतो



पृ. १९२ □ मूल्य २०० रु.

टेहलटिकोरी म्हणजे मुक्त भ्रमंती. पण प्रज्ञा दया पवार यांची ही मुक्त भ्रमंती हरफन मौलासारखी 'स्व'ला स्वैर सोडून निर्वात पोकळीतील पारलौकिक अनुभूतीची अलौकिक वर्णनं करणारी नाही, तर 'स्व'सह सर्व समाजात रक्तातल्या पेशीप्रमाणे ती संचार करते आणि समाजपुरुषाच्या हरेक अंगाचा कोपरा न् कोपरा तपासते. त्यावर विचार करते, अस्वस्थ होते, प्रखर होते. 'समाजपुरुष' यासारख्या व्याख्यांना मोडीत काढत, धर्म, जात, प्रदेश, भाषा, लिंग यांच्या पल्याड जाऊन माणूसपणाचा शोध घेते. या शोधात - प्रवासात स्वत:चं स्त्रीत्व अभिमानाने मिरवते. ठसवते.

- संजय पवार

टेहलटिकोरी

प्रज्ञा दया पवार

अक्षर प्रकाशन, मुंबई

आईसह. मरतानी बापाने फक्त जायदाद म्हणून दिल्ता आंबेडकरांचा फोटो आणि शिकवलं होतं जयभीम म्हणायला. करू लागला शेळ्या राखण. थोडीफार निरोपानिरोपीची जुनी कामं जी त्याच्याकडे पिढीजात होती जागल्याची... गावात आलेल्या ब्रदरने येशूच्या गोष्टी सांगून कपडे-खाऊ देऊन, भेट म्हणून दिलेला येशू, मरीमातेचा फोटो, बाळूनं बाबांच्या फोटोशेजारी टांगून दिला. गावात बाळू पिराजी किरिस्ताव झाल्याची वार्ता पसरली. लोक कुजबुजू लागले अन् आई शिव्या घालू लागली. भाबडा बाळू घाबरून गेला. फोटोपायी कसली आफत आली म्हणत-बाळूनं देवापाशी देव म्हणून पडक्या मारुतीच्या मंदिरात येशू-मरिमायचा फोटो ठेवून दिला. कुणीतरी मुद्दाम देवापुढं तुटक्या वहाणा नेऊन टाकल्या. गावात दंगा पेटला. विटंबनेच्या नावानं मारहाण, पोलीसकेस झाली. बाळूला अटक झाली. बाळू म्हणाला कोर्टाच्या पुढं, आयुष्यात निघालेल्या पहिल्या-वहिल्या सार्वजनिक आवाजात, साहेब, देवाशेजारी देव ऱ्हाईलं रातभर, त्यांच्यात भांडण नाही झालं, तुम्ही मला कामून धरलं?... भाबड्या माणसांना कष्टानं जीवन जगू न देणाऱ्या व्यवस्थेत, सज्जनाला फास तर दुर्जनाला मोकळा श्वास घेता येतो. धर्म, मंदिरांचा आसरा घेऊन भाबड्या माणसांचे बळी घेणारी ही व्यवस्था वर्तमानातही आकाराला आली. बाळू सुटल्यावर शहरात त्याला दिसतं की सर्वच जाती-धर्माचे देव बाजारात एका रांगेत ठेवून विकणारे दुकानदार कसे गुन्हेगार नाहीत? जी गोष्ट गुन्हा ठरली खेड्यात, तो तर धंदाच होता शहरात! हे वास्तव सर्वहारा माणसांचं जीवन हादरवणारं आहे.

छबू तमासगिर तरुणीचीही वेदना जीवघेणी आहे. पोटासाठी ताठ मानेनं समाज जगू देत नाही. आमचं पोट आमच्या घोट्यावर बांधलेलं असतं, आमच्या हमालीची कोणाला कल्पना नसती, घुंगरू नाही भाऊ, आमची भूक तिथं वाजत असती!... समाज कायम वासनेच्या अंगानं तमाशातल्या बायकांचा उपभोग घेण्यासाठी आसुसलेला असतो. तमाशाची कलाकेंद्र... त्याचीच पुढं धंद्याची जागा झाली. बोर्डावरची बाई पांघरुणात आली, याच्यात कशाची कला राह्यली?... कलावंतिणीचं दुखणं शब्दबद्ध करणारी ही कविता, तमाशा कलाकेंद्राची होत जाणारी वाताहत मांडतानाच कलावंतिणीच्या आयुष्याचाही समाजानं केलेला तमाशा अधोरेखित करते.

कल्ल्याला माणूस असूनही समाजानं हिजड्याचं जगणं जगायला भाग पाडलेलं असतं. कल्ल्या खरं तर समाजाचं रक्षण करणारा निखळ कार्यकर्ताच. हुशार माणूस. अर्धी बाई नि अर्धा पुरुष असतो. तुम्ही कोणाला मान देता यावर तुमचा समाज ठरतो! हे सरळसोट समाजाला तो विचारित असतो. हिजड्यांच्याच भांडणात, खरे हिजडे कोण? यावरून होणाऱ्या लढाईत कल्ल्याला चिरडले जाते. भोवतालातलं हे भोळ्या भाबड्या बायामाणसांचं यातनामय जीवन, सामाजिक आणि आर्थिक सत्ता संगरातून लबाडांनी त्यांना बहाल केलेलं असतं. ही सज्जन माणसं समाजात माणुसकी आणि परोपकारी जीवनाची पेरणी करीतच मरतात. शोषण व्यवस्थेच्या चरकात गोरगरीब माणसंच पिचली जातात.

शोषितांचा कोणताही देश नसतो

बहादूर थापा, शलाम शाब, ऐकताच पटायची बहादूर गुरखा आल्याची वर्दी, मिचमिच्या डोळ्यांचा, ठेंगणा, बसक्या नाकाचा बहादूर, तेवढाच प्रामाणिक आणि कारुणिक चेहऱ्याचा, रात्रभर बहादूर फिरे साथी होऊन, कमरेला कुकरी लावून, खाकी वर्दी असे तसेच जोडे पायी... आपल्या नेपाळी मित्रांसोबत महाराष्ट्रात भरपूर पैसे कमावून कांचीसोबत संसार करण्याच्या स्वप्नपूर्तीसाठी गस्तीसाठी गुरख्याची लाईन पकडतो. आता भरपूर कमवून तिच्याशी शादी करायची होती, आणि तिलाही दिल्त्या आणाभाका... तुझ्यामुळे सुरक्षित होती आमची झोप, आमचे जंगम, आमचे वित्त... घरटी दहा-वीस रुपये गोळा करून, पोटच भागणे मुश्किल होते आणि स्वप्नपूर्ती होती काठमांडूएवढी दूर... कांची भेटायला येणार म्हणून मध्यस्थाला तिच्या प्रवासखर्चापोटी जमा असलेली मोठी पुंजी बहादूर देतो. मध्यस्थ तिला नेपाळातून आणून शहरातल्या कोठ्यावर आण्टीला विकतो. ती आता करीत होती धंदा आण्टीचे पैसे फेडून बहादूरच्या भेटीसाठी... जो नेपाळ देश जगाला शौर्य आणि सौंदर्य पुरवितो अशा मार्गाने; शेवटी, यानेच बहादूरची पुरती सटकली होती नि त्याने पाडला होता त्या मध्यस्थाचा मुडदा भर बाजारात...नेपाळ्यांची लढवय्या जमात आणि गस्तीमुळे सुरक्षित राहण्याचे भाग्य विसरलेले लोकच, नेपाळातील सौंदर्यवतींना फूस लावून कोठ्यांवर धंदा करण्यासाठी

विकतात. माणसांतल्या दलालाचे हे केवढे क्रौर्य?

निरागस माणसे कोणत्याही देशाची, जातीधर्मपंथांची असोत, ती भाबडी आणि शोषणाला बळी पडणारी असतात. अनैतिक, स्वार्थी, संधिसाधू, लबाड-छलकपट करणारी माणसं जगभर असतात. ही माणसं निरपराध, निरागस, सर्वहारा माणसांचं शोषण करीत असतात. जगभर हे आजही सुरू आहे. लबाड जगतात आणि निरागसांना मृत्युपंथी सोडतात. ही माणसं लबाड नाहीत, हाच त्यांचा आयुष्यभर दुःख भोगायला लावणारा गुन्हा असतो काय? नैतिकता, ईश्वर, सत्य यांची चाडच नसते शोषकांना. कवीची टिपणी मौलिक ठरते. तो म्हणतो, शोषण होणारांचा कोणताही स्वतःचा देश नसतो, ना नेपाळ, ना भारत, ना ब्रिटन, ना अमेरिका! खंरय. शोषितांना जगण्यासाठी भूमीच नसते. शोषकांनाच सुखोपभोगाने जगण्यासाठी भूमी, देश, धर्म, जाती, लिंग, वंश, पंथ, सत्ता उपलब्ध असते. हिराबाई जाफरमियाँच्या मनात जसे, दो गज जमीन के निचे तो जगह मिलेगी की नही? असेच मरणोपरान्त प्रश्न सर्वहारा माणसांना कायम हादरे देत राहतात. जॉनसारखे अनेक मिशनरी खूप वर्षांपासून आदिवासी भागात जगभर काम करताना दिसतात. व्यवस्था-प्रशासन-सामाजिक संस्थांच्या ठार आंधळ्या डोळ्यात-मनात मिशनऱ्यांचे कार्य सलत जाते. हे धर्मांतरासाठीचेच कार्य असल्याच्या कंड्या पिकवून, आदिवासींना भडकवून, अनेक मिशनऱ्यांचे आपल्याही देशातल्या विविध भागात, आजवर मुडदे पाडल्याचाच इतिहास ताजा आहे. जॉन, हेही त्याचेच उदाहरण आहे. जॉन हा समाजसेवेचे शिक्षण घेतलेला पदवीधर स्कॉलर. ध्येयवेडा आणि धडाडीचा कार्यकर्ता. ज्या आदिवासी भागात भिल्लांच्या अधिकारांची लढाई लढतो, तिथली बेगडी व्यवस्था त्याचे वर्चस्व नष्ट करण्यासाठी त्याला नक्षलवादी ठरवून, मुडदा पाडण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्नशील असते. जॉन आणि गौरी हे युवादाम्पत्य नेटाने आपला न्याय्य लढा लढतात. जॉनचा मोर्चा आता शेकड्यातून हजारात पोचला होता, आणि तो सलू लागला होता, कंपनीच्या, सरकारच्या, पुढाऱ्यांच्या, गावटग्यांच्या डोळ्यात... जॉन चर्चवाला आहे, काहीच दिवसात तो भिल्लांची धर्मांतरं घडवणार आहे आणि शाळेच्या नावाखाली गायरानात, अमेरिकेकडून पैसे आणून चर्च उभारणार आहे... कंड्या पिकवल्या जातात. शेवटी भिल्ल, पुढारी, कार्यकर्ते, पोलीसयंत्रणा, जमीन खरेदी करणारे कंपनीवाले मिळून, जॉनसह आठजणांची पोलीस गोळीबारात हत्या घडवून आणतात.

जॉन, गौरी ही ध्येयनिष्ठ माणसं असतात. आजही विदर्भातील आदिवासी भागात प्रकाश आमटे, मंदा आमटे, विकास आमटे, अभय बंग, राणी बंग, रवींद्र कोल्हे, स्मिता कोल्हे, आशिष सातव, कविता सातव आणि आणखीही त्यांचा व इतरांचा मोठा समूह, आदिवासींना आरोग्य सेवा पुरवून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य निष्ठापूर्वक करीत आहे. ह्याही महामानवांना व्यवस्थेच्या त्रासाला सामोरे जावे लागले. ही निष्ठावान मंडळी कधीच व्यवस्थेसमोर वाकली नाही. व्यवस्थेतल्या विरोधाचा सामना केला. टिकून राहिले. व्यवस्था-प्रशासन नसले तरी समाज-मीडिया आज त्यांच्या पाठीशी उभा आहे. हे भाग्य मात्र जॉनसारख्यांना लाभलं नाही. जॉनच्या हत्या घडवून आणणारी षड्यंत्र रचणारी व्यवस्था आजही सुखेनैव कार्यरत आहे. मुखवटा घालून सभ्य सरकारी आणि पुढारी मंडळीच्या मार्गदर्शनाखाली ही सर्व असभ्य कारस्थाने सर्रास सर्वत्र जगभर सुरू आहेत. लोकभावनांचा न-नैतिक वापर करणारी ही अमानुष मंडळी दीर्घकाळ सुखांचा भोग घेते, तर नैतिक ध्येयवाद्यांना ध्येय-नैतिक सभ्यतेपायी असभ्य व्यवस्थेच्या दुःख चरकात पिचत आपुले मरण पाहिले म्या डोळा, तो जाला सोहळा अनुपम्य... यालाच सामोरे जावे लागते.

कविता लिहिण्याची बिमारी लागली

फ्रँकी, ही कवी आणि कवितेवर टू बी फ्रँक भाष्य करणारी एक उत्तम आत्मचिकित्सा करणारी कविता आहे. अर्थातच ती फ्रँकी या खानदेशातून नगरमध्ये शिकायला आलेल्या संवेदनशील कवीची कविता आहे. फ्रँकी... ते नावच नव्हते त्याचे, पण बोलताना, लिहिताना, टू बी फ्रँक, म्हणणाराच पुढे फ्रँकी झाला, तिकडून कुठून खानदेशातून आल्ता, नगरमध्ये शिकण्यासाठी, आणि कविता लिहिण्याची बिमारी लागली होती... नुकतीच मिसरूड फुटू लागली, आणि कवितांचे नवेनवे कोंबही उमलू लागले, ते कोंब नुसते कोंब नव्हते, तर आगडोंब होते, एकेका शब्दाखाली आपली वस्त्रे मोकळून, फ्रँकी त्यामागे लपत असे... तरी तो ओळी दर ओळीआड

अधिक उघडावाघडा, अधिक चालू नि मुळात बीभत्स भासत असे... त्याला लिहायची होती त्याचाच खून झाल्याची बातमी... मग कवितेतला मार्ग सापडला नि त्यानं त्याच्यातला कवी कसा मारला गेला, त्याचीच लिहिली एक कविता... कवी फ्रँकी सच्चा ओरिजिनल कवी असतो. कवी मारला गेल्याची कविता लिहिणे त्याला भाग पडते. कवीला कवी म्हणून जगण्यासाठी आणि अस्सल काव्यसृजनासाठी समाजव्यवस्थेत अनुकूल भूमी नाही. तरी कविलोक बिचारे नेमाडे म्हणतात, तसे राणीमाशीच्या मागे मागे धावत धावत कविता लिहितात. कवी म्हणून जगतही राहतात.

फ्रँकी मात्र अचानक गायब होतो आणि पंधरा-सतरा वर्षांनी, पुण्यातल्या सांगवी गावात एका चकचकीत गाडीत, गॉगल लावून बसलेला फ्रँकी, कवीला दिसून आला. फ्रँकीने कवीला ओळख दिली नाही. कवीच्या मते, आजवर जगाने आपल्यातल्या कवीचा खून केला, म्हणणारा फ्रँकी आज, स्वतःच स्वतःचा खुनी म्हणून समोर आला होता, म्हणूनच तर तो कुणाला सापडत नव्हता नि आता सापडणारही नव्हता! फ्रँकी हा जगण्यात-कवितेत अंतर मानत नव्हता. जगणंच त्याची कविता होती. जगातल्या तमाम कवींच्या वतीने तो सांगू इच्छित असे प्रत्येक ओळ, त्याचा प्रत्येक शब्द महाकाव्यासारखा होता त्याच्यासाठी... अनन्यसाधारण प्रतिभेचे कवी असेच असतात फ्रँकीसारखे सर्वगुणसंपन्न मौला-फकीर. जगाचा नाठाळ अनुभव आणि कवितेची थट्टा मस्करी त्यांना खपत नाही. कविता हे व्यक्त होण्याचे, मुक्त होण्याचे साध्यसाधन असते. मानसन्मान पुरस्कार, सभासंमेलनादी त्यांच्या लेखी नसते. असेच अस्सल कफल्लक सनकी असतात कवी. फ्रँकी जगातल्या लोकांनी आपल्यातल्या कवीचा खून केल्याच्या मोबदल्यात, कवितांचाच खून करून मोकळा होतो. उरतो केवळ फ्रँकी. निखळ जगण्यासाठी तग धरणारा एक सर्वसामान्य माणूस.

कवी फ्रँकीच्या निमित्ताने आजच्या कवी आणि कवितेच्या खोट्या कृत्रिम सांस्कृतिक जगावर धारदार टीका करतो. ती संतोषनं केलेली मौलिक टीकाटिपणी मानता येईल. उदाहरणार्थ,

तसे खूप कवी होते त्या काळी
किंवा तो काळच होता खूप कवींनी कविता लिहिण्याचा
कवितेच्या क्षेत्रात तेव्हाही बांध कोरीत होते
एकमेकांचे ग्रामीण म्हणवणारे कवी
एकमेकांच्या कल्पनाच काय, प्रेयसीही पळविणारे
टोळ्या करून पुरस्कारांची शिकार करणारे
प्रस्तावनेच्या नावाखाली मानधन-दारू मागणारे
अभ्यासक्रमात कविता येण्यासाठी दारूच्या पार्ट्या देणारे
गिचमिड चित्र काढून आयुष्यभर चित्रकार म्हणून मिरवणारे
कामगंडाने पछाडलेले आणि भोगाची तृप्ती बाकी असणारे
नियतकालिकाच्या नावाखाली कवींकडून भाड खाणारे
तरुण कवयित्रींना शय्यासोबत मागणारे
तरुण कवींच्या सादरीकरणावर संमेलनात दाद मिळवून
स्वतःचे पोट भरणारे थेरडे त्याही काळात होतेच...
आणि विशेष म्हणजे काहीच न लिहिता
साहित्यिक नि कवी म्हणून मिरविणारे त्याही काळात होते!
फ्रँकी या साऱ्यांपेक्षा खूप वेगळा होता...

खरं तर कवीनं वर्तमान भ्रष्ट-ननैतिक-पतनशील सांस्कृतिक जगाचा समग्र नकाशाच फ्रँकीच्या निमित्ताने समाजासमोर मांडला आहे. अस्सल कवीला आपल्यातल्या कवीचा खून करणाऱ्या व्यवस्थेचा तिटकारा येणे अस्वाभाविक नाही. फ्रँकी मात्र कवीचा खून झाल्यावर कवितांचाही खून करून, कवितेचे बाड जगाच्या उकिरड्यावर फेकून मोकळा होतो. पंधरा वर्षांनंतरही कुणी कवी म्हणून ओळख दाखवताच तो हादरतो. घाबरतो. पुन्हा कवीला-कवितेलाही भेटायचंच नाही, हे मनाशी पक्कं ठरवून गायब होतो. कवी-कवितेच्या जगावर सटीप साक्षेपी भाष्य करणारा फ्रँकी-कवीनं मांडलेलं हे सांस्कृतिक पतनाचं चित्र दुर्दैवानं असत्य नाही. ते सत्य असलं तरी इतकं भयंकर असत्य नाही.

भुईसुरुंगाचे स्फोट

शैला, सोन्याबापू, तम्मा, ताई, रोडू, धुरपदा, सरूबाई, न्हाईबाबा, सोनी, बुवा, मुकी, नागू, बळ्या गारुडी, सोमा, बहादूर थापा, जॉन, फ्रँकी ही सर्वसामान्य माणसं गावखेड्यात आणि स्थलांतरणानं लहानमोठ्या शहरात जगण्याची मोट बांधताना, व्यवस्थेच्या लालफितशाहीत-धर्मजातीपंथांच्या बंधनांनी कायम पिचली जातात. अन्याय, अत्याचार, बलात्कार, वासनापूर्तीला बळी पडत जातात. जगण्याची चिवट झुंज देता देता व्यवस्थेच्या जोखडात मरत राहतात. ही पिचलेली आणि ताठ नैतिकतेनं

माणुसकीचे विधायक पाठ समाजाला देणारी माणसं, कायम व्यवस्थेच्या चरकात चिरडली जातात. जगण्याची जन्मकैद भोगूनही आरोप-प्रत्यारोपातून सतत त्यांच्या जगण्याचं-पावित्र्याचं-चारित्र्याचं हनन करणारी अमानुष माणसं समाजात उजागरीनं जगतात. नाकाच्या सरळ रेषेत जगणाऱ्या सुखवस्तू पांढरपेशा समाजालाही ही ठळक माणुसकीनं जगणारी माणसं न ओळखण्याइतकी अंधता, आजच्या जगात मुखर झाल्याचे करुणामय वास्तव, कवीनं आपल्या व्यक्तिचित्रण करणाऱ्या कवितांतून अधोरेखित केलं आहे. जगण्याची बोलीभाषा आणि दुःखकळांना मांडणारी कारुण्यलय यांच्या मिलनातून कवीच्या कविता, दुःखद शोकांतिका मांडून समाजाला गदगदा हालवून सोडतात. अंतरंगात भुईसुरुंगाचे स्फोट घडवून आणतात. सर्वहारा अलक्षित जुन्या जाणत्या म्हाताऱ्याकोताऱ्या माणसांनाही 'जगवा आणि जगू द्या' हा संदेशही देतात.

सर्वहारा माणसावरही, अस्तित्व आणि अस्सल माणुसकीने जगू न देणाऱ्या सामाजिक व्यवस्थेचा आणि लोकशाहीचा धिक्कार करण्याची वेळ येते. जगण्यासाठी लाही लाही होत भाजून निघणारी ही अलक्षित माणसं, समाजाच्या चेष्टेचा विषय होतात. सर्वहारा माणसाला जगू न देण्यासाठीच जगणारी ही अमानुष व्यवस्था कवी उजागर करीत जातो. ही सर्व माणसं त्यांच्या उदारतेनं आणि माणुसकीनं आणि नैतिकतेनं जगण्यासाठीची गुन्हेगार असतात. व्यवस्थेतील लबाड कोल्हे सभ्यपणे ह्या गरीब-ताठ बाण्याच्या नैतिक माणसांना शोषणाच्या चरकात पिळून, त्यांच्या जीवनाचा चोथा चोथा करून, त्यांच्यातल्या जगण्याच्या उमेदीचं रसायन, आपल्या सुखसमाधानासाठी वापरतात. शोषकांच्या ह्या चरक-संस्कृतीत बळी पडणाऱ्या सर्वहारा दुःखी-पतित-बलात्कारित-कार्यकर्ता-सज्जनांच्या ह्या जीवनदर्शन घडविणाऱ्या व्यक्तिचित्रणात्मक कविता आहेत.

खरंतर कवी सर्वहारा माणसांची कळ आणि कड घेणारा आहे. ह्या सर्वच कविता माणुसकीला आवाहन करून, सर्वहारांच्या दुःखमुक्तीसाठी प्रार्थना करणाऱ्या आहेत. साहित्य समाज प्रबोधनाचे साधन मानले जाते. समाज-धर्म-सत्ता-प्रशासन-शासनव्यवस्थेत बळी पडणारी ही सर्वहारा शरीफ माणसं चिरंतन असतात. ती मरतात आणि पुन्हा आपलेच जगणे आणि दुःखणे नव्या पिढीच्या मनोभूमीत पेरून, समाजाच्या मरुभूमीत पेरलेल्या-उगवलेल्या झाडांच्या पानाफुलाफळाफांद्यांतून, सत्यं-शिवं-सुंदरमचे जगाच्या कल्याणासाठी पसायदान मागून, पुन्हा पुन्हा उगवत असतात. किमान उगवलेले हे जगाच्या कल्याणाचे अंकुर जरी समाजानं विधायकपणे जोपासले आणि व्यवस्थेतल्या दुखण्यांच्या विरोधात त्यांना साथसंगत करून खतपाणी पुरविले; तरी सामाजिक उत्थानांचे बोधीवृक्ष सळसळून आनंदानं, आनंदचि अंग आनंदाचे मानून, डोलू-बहरू लागतील...

संतोषची कविता अस्सल देशीय सांस्कृतिक संचिताचं रक्षण करणाऱ्या आणि कुठल्याही लांड्याचालबाड्या न करता परोपकारी माणुसकीचं जीवन जगणाऱ्यांच्या व्यथा-वेदनांना उजागर करते. ही माणदेशी गावकीतली आणि जुन्या पिढीतली गावकडची माणसं, समाजाच्या आणि व्यवस्थेच्या छद्मी कोलाहलात कायमची विरून जातात. कुणालाच त्यांच्या जगण्याच्या चिंता भेडसावत नाहीत. जिसके हाथ में लाठी, उसकी भैस बडी. अशा ग्लोबल परिवर्तनीय जीवनव्यवस्थेत, त्यांना मृत्यूच्या दाढेत लोटण्याचे कार्य करण्यातच धन्यता मानणारी लबाड व्यवस्था झपाट्यानं वाढत असताना सर्वहारा रंजल्यागांजल्यांना-निरपराधांना-शरणागतांना मारणारी व्यवस्थाच उदयाला आलेली आहे. याची साक्ष देणारी ही काव्यचित्रे आहेत. कवी संतोषला, त्याची कविता आणि करुणामय शब्दांची जीवनलय, समाजातल्या सर्वहारा पिचल्या-गांजल्या-अन्यायित बायाबापड्या-साध्या-भोळ्या-भाबड्यांना जगण्याचं आणि जगवण्याचं मूल्य-संचित पुरवतील, अशी अपेक्षा आहे. कवितेच्या रचनेवर आरूढ असलेली करुणामय गाज, समाजाच्या ठार बहिऱ्या कानांनी अंतरंगात शिरून, मानवतेच्या बंद पडलेल्या वर्तमानातल्या झऱ्याला पान्हा फोडतील; अशी अपेक्षा बाळगायला हरकत नाही...

●

बहादूर थापा आणि इतर कविता
संतोष पद्माकर पवार
साधना प्रकाशन, पुणे, २०१५
पृ. : १४९, किंमत : १२५ रु.